साल अखेर „ ७
किरकोळ अंकास .................६४
नोटिशी बद्दल
१० ओ[illegible]चे आंत रु० १
दर ओळीस........ ६१ ०६
दुसरे खेपेस .... ........६१

Six monthly......... 3.............. 8 as
Single copy .............................. 4 as
Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ...... 1 as
Repetition Per line ... 3 as


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR


VOL XXXI AKOLA MONDAY 2 AUGUST 1897 NO 30
वर्ष ३१ आकोला सोमवार तारीख २ माहे आगस्ट सन १८९७ इ० अंक ३०


नमुना नंबर १४२
दिवाणी कोर्टास सूचना.

अज्ञानाच्या माल मिळकतीच्या वहिवाटीचे सर्टिफिकीट मिळण्या विषयीं अथवा अज्ञानाचे पालन व त्याच्या मालमिळकतीचा कबजा करण्या लायक मनुष्य नेमण्या विषयीं सन १८९० चा आक्ट ८ कलम १० प्रमाणें:—

क्लास १३ अर्जीचा नंबर २ सन १८९७

विद्यमान सि० जज्ज साहेब बहादूर जिल्हा अकोला. यांचे कोर्टांत.

अर्जदार सेख मोहियुद्दीन बापाचें नांव सेखहुसेन जात मुसलमान राहणार आकोला.

वरील अज्ञान उमरावबी जात मुसलमान राहणार तेल्हारे तालुके आकोट जिल्हा आकोला याणें त्याचे पालन व माल मिळकतीचा कबज्या करण्या लायक मनुष्य नेमला जावा ह्मणून अर्ज दिला आहे यास्तव मृत्युपत्राचे आधारे किंवा दस्तैवजावरून किंवा अगदीं जवळचे नातलगपणाचे कारणावरून किंवा इतर प्रकारें ज्या कोणी मनुष्यास सदर्हू अज्ञानाचे माल मिळकतीवर सांभाळ करता या नात्यानें कबज्या करण्याचा हक्क सांगावयाचा असेल त्या सर्वांस या लखानें कळाविण्यांत येत आहे कीं त्यांनीं ता० १४ माहे आगष्ट सन १८९७ इ० रोजीं वरील अर्जाची चौकशी होणार आहे ते वेळीं ह्या कोर्टांत हजर होऊन आपापल्या हकीकती दाखल कराव्या.

ता० २७ माहे जुलाई सन १८९७ इ०

Tukaram Waman
शिरस्तेदार निसबत
सिव्हील जज्ज

---

दि. क्लास १३ मिसल नंबर २
१८९७

विद्यमान सिविल ज्यडज्य साहेब बहादूर जिल्हा आकोला,

सेख मोयुद्दीन वल्लद सेख हुसेन मुकाम ताजनापेठ अकोलें. वादी अर्जदार.

बुगडी मर्द दादाभाई हल्लीं महमद जमाल रोहिला राहणार तेल्हारा तालुके अकोट जिल्हा अकोलें. विरुद्ध पक्षकार

सन १८९० चा अक्ट नंबर ८
प्रमाणें अर्ज

मी शेख मोयुद्दीन कळवितों तें येणें प्रमाणें.

१ माझी साक्षांत बहाण उमरावबी इजला बुगडीबी ही वेऊन गेली.

(ए) उमरावबीची उमर अंदाजा १२।१३ वर्षांची आहे. ती उत्पन्न जाल्याची तारीख दिवस व महिना तिचे आईबाप मरण पावल्यामुळें मजला माहिती नाहीं.

(बी) उमरावबी आज्ञान. इचें लग्न आजपर्यंत जाहलें नाहीं.

(सी) उमरावबी हिचें ताब्यांत हल्लीं कोणतीही जिनगी नाहीं. परंतु दि० मु० नंबर ७६ कोर्टे विद्य — ९६ — भान सि० जज्ज साहेब बहादूर जिल्हे अकोला यांत जो माझा हक्क आहे. व मजला मिळेल यातून उमरावबी हिजलाही हिशा प्रमाणें हक्क मिळेल.

(डि) उमरावबी अज्ञान ही हल्लीं बुगडाबी मर्द दादाभाई हिचे ताब्यांत आहे.

[इ] अज्ञान माझी साक्षांत बहीण असोन या शिवाय दुसरे कोणी नातलग जवळचे नाहीं.

(एफ) आजपावेतों अज्ञानाचे देखरेखी बद्दल आणि जिनगी बद्दल कोणी नेमले गेले नाहीं.

(जी) आजपर्यंत अज्ञानाचे संबंधानें कोणी अर्जही दिला नाहीं.

(एच) अज्ञानाचे देखरेखी बद्दल हा अर्ज आहे.

[आय] अज्ञान ही माझी सख्खी बहीण असोन तिचें योग्य पालण करण्यास मजाशिवाय दुसरे कोणी नाहीं.

(जे) अज्ञान ही माझी सख्खी बहीण असोन मी तिचें पालन पोषण उत्तम प्रकारें करण्यास तयार आहे आणि तिचें लग्नही आपले बिरादरींत करून देईन.

[के] बुगडाबी ही महमद जमाल रोहिला याचे घरांत जाऊन राहिलीं आहे व ती अज्ञानाचें संरक्षण बरोबर करीत नसोन तिजला मार हाण करीत आहे. व खाण्यापिण्यास बरोबर देत नाहीं. या शिवाय तिचें लग्न कोणी रोहिल्या बरोबर करणार आहे.

[एल] वर लिहिलेले सर्व कारणा वरून अज्ञानाचें संरक्षण करण्यासाठीं मीच योग्य आहे आणि मी असतांना बुगडीबी इजला अज्ञानाचें पालण पोषण करण्या विषयीं सरटिफिकीट मिळणें बद्दल हुकूम न व्हावा आणि अज्ञान ही माझे ताब्यांत मिळावी.

ता. २० माहे जुलै सन १८९७ इसवी.

प्रतिज्ञालेख सही अर्जदाराची.

---

नोटीस

रा. रा. गंगाबिसन छोगामल मारवाडी वस्ती जोधपुर राहणार शिवनारायण छोगामल मारवाडी वस्ती जोधपूर यास

हरदेवदास रामदयाल मारवाडी दुकान शेगांव तालुके खामगांव मालक राजाराम वल्लद काशिराम मारवाडी राहणार जोधपूर जिल्हे मजकूर मुकाम शेगांव तालुके खामगांव याजकडून नोटीस देण्यांत कीं राधाकिसन रामदयाल नांवाची दुकान शेगांवास संमत १९३९ चे साला पासून नंबर २चे ह्मणजे शीवनारायण छोगामल याचे व आमचे शराकतींत सुरू करून नंतर त्या दुकानास तुमचे उभयतांचा बाप छोगामल संमत १९४० सालांत मेल्यावर ती भागणी संमत १९४७ पावेतो मागचे शर्तीवर तुह्मी चालविली आणि त्याच सालीं सदर्हू दुकानचें नांव बदलून हरदेवदास रामदयाल असें नांव चाललें. संमत १९५१ चे सालांत तुह्मी मारवाडांत गेले तुमचें काम गुमास्ते करीत आहे. नंबर १ चा गंगा बिसन छोगामल हे व तुह्मी साक्षांत बंधु असोन सर्व कुटुंब एके ठिकाणीं आह्मा सबब तेही नफा नुकसानीस जबाबदार आहेत सदर्हू दुकानचाही हिशोब तुह्मी आह्मास समजून दिला नाहीं व तुमचे बापाचे व तुमचे स्वतःचे नावे ज्या रकमा पडल्या आहेत त्याजबद्दल हिशोब केला नाहीं करिता ही नोटीस पावल्या पासून एकमहिन्याचे आंत हिशोब समजून द्यावा तसे न केल्यास रिती प्रमाणें तजविज केली जाईल व खर्च सुद्धां घेण्यांत येतील या नोटीसीनें तुमची व आमची शराकत बंद झाली असें समजूं नये. शराकत बंद करणें असल्यास तुमचे आमचे दोघाचे विचारानें करण्यांत येतील कळावे तारीख २६।७।९७.

सही
राजाराम वल्लद काशिराम
दस्तुर खुद्द.

---

निजनीचपण प्रकटिशि तूं श्वान भल्यावरीहि भुंकोन. ॥
मोरोपंत.

वि. वि.

अलीकडे कित्येक पत्रांतून शिक्षकांचीं हृदयद्रावक दुःखें कळविण्याची सोय झाल्या पासून आपल्या कृतघ्नपणाची कमाल जगाला कशी दाखवितां येईल हें त्यांनीं व्यक्त केलें आहे, "यजमान दक्ष असला ह्मणजे चुकार, सुस्त व अंग मोडून काम न करणाऱ्या मजुरांना तो विषवत् वाटावयाचाच; पण अशाच धन्याकडून इमानी व अंग मोडून काम करणाऱ्या लोकांस योग्य बाक्षिस मिळाल्या खेरीज रहावयाचें नाहीं." ह्या गोष्टीची अशा शिक्षकांना विस्मृति झालीसें दिसतें.

रा. ब. पटवर्धन ह्यांच्या कारकीर्दीत वऱ्हाड शाळाखात्याची किती सुधारणा झाली ह्याचा शांतपणें विचार केला तर खास असें आढळून येईल कीं, आजपर्यंत इतका फायदा कोणाचेच कारकिर्दीत झाला नव्हता. चैतन्यनष्ट झालेल्या वऱ्हाड शाळा खात्याला असाच जलाल औषध देणारा पाहिजे होता व तसा भेटला ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे.

रा. ब. पटवर्धन विशेष चौकस व व्यवहारज्ञ असून निष्कपटी व भडभडे असल्यानें कित्येक शिक्षकांना ते अप्रिय झाले आहेत. ह्या लोकांना तोंडावर गोड बोलून मागून गळा कापणारे अधिकारी पाहिजे आहेत असें दिसतें पण ही त्यांची निव्वळ कोती समज आहे.

आज मितीस मुंबई इलाख्यांतील कोणतीही चांगली शाळा व हिकडची शाळा ह्यांची तुलना करून पाहिली असतां अभ्यासाचे बाबतींत, विशेषतः अक्षरांत, हिकडच्या पेक्षां तिकडे जास्त सुधारणा आहे असें कोणी सांगेल काय?

ट्रेनिंग कॉलेजची सुधारणा करण्याकरितां रा. ब. ह्यांनीं अश्रांत श्रम केले, हें केवळ स्वार्थैकपरते साठींच ना? उत्तम शिक्षक जितके मिळतील तितके आणण्याचा जो त्यांचा प्रयत्न तोही पण स्वतःच्याच फायद्यासाठीं असेल नाहीं बरें! शिक्षकांचे पगार वाढविण्याकडे रा. ब. यांचें जितकें लक्ष आहे तितकें श्रेय आजपर्यंतच्या कोणत्या तरी अधिकाऱ्यानें जोडलें आहे काय? जे खरोखर मेहनती व विद्वान शिक्षक आहेत त्यांना बढती मिळाली नाहीं असें कोणी सांगूं शकेल काय? त्याचप्रमाणें लब्ध प्रतिष्ठित लोकांना शासन मिळणें हीही गोष्ट न्याय्यच आहे.

रा. ब. आतिशय फिरतात ह्याबद्दल एका गृहस्थानें शुद्धवऱ्हाडींत आपल्या बुद्धीची अत्यंत अनुदारता दर्शविली आहे. ती पाहून ह्याचें डोकें संतापानें भणभणून गेलें आहे असें दिसतें.

पुष्कळ लोकांची बुद्धि विकारवश असते ह्मणूनच खालच्या अधिकाऱ्यांच्या अंतर्वैमनस्याची कोणास प्रायश्चित्तें मिळालीं असतील अगर अन्य कांहीं कारणें कोणाच्या अपकर्षास कारणीभूत झालीं असतील; ह्यांचा, डोळ्यांनीं पाहिल्या खेरीज, निर्णय करणें योग्य नाहीं अशा खात्री असल्यामुळेंच ते इतकी दगदग करितात ह्मणजे त्यांचे शिक्षकांवर अत्यंत उपकार आहेत. सुधारणा व्हावी अशी अंतःकरणापासून त्यांची कळकळ आहे ह्मणून इतका त्रास ते सोसतात. नाहीं तर "होईल तसें होवो" ह्या वचनावर लक्ष देऊन स्वस्थ घरीं बसण्यास ईश्वराची त्यांस परवानगी नाहीं काय?

रा. ब. शी घरीं बोलण्याचा ज्यांना प्रसंग आला आहे ते असें सांगतात कीं मुक्त मनानें घरी बोलण्याची संधी ह्यांच्या इतकी कोणाही अधिकाऱ्यांच्या येथें मिळत नाहीं ह्याचें कारण ह्यांच्या मनाची सरलता व वस्तुस्थितीचें ज्ञान करून घेण्याची इच्छा हेंच आहे.

आतां सर्वगुणसंपन्न असा जगच्चालक्का शिवाय कोणी ही भेटावयाचा नाहीं; त्याप्रमाणें रा. ब. कित्येक ठिकाणीं जास्त कमी करितात असें वाटेल. पण त्या टिकाणीं तेथील शिक्षकांची चांगली मोठी चूक असतेच असतः आपणास जें शासन मिळतें त्याच्या बुडाशी आपली चूक थोड्या फार प्रमाणानें असतेच असा नियम आहे. तसेंच पुष्कळ मनुष्यें आपल्या योग्यते पेक्षां फाजील फलप्राप्तिची इच्छा करून आपणांवर संकटें ओढवून घेतात. गुरुजनांनीं हितार्थ एखाद्या वेळीं जरी राग केला तरी तो सहन केल्यास परत अनुराग होतोच. हा नियम ध्यानांत न ठेवितां सांगितलेली गोष्ट शांतपणानें ऐकावयाची नाहीं व आपल्याला दुराग्रह सोडावयाचा नाहीं अशी ज्यांची कृति त्यांस त्याबद्दल शासन मिळाल्यास वाईट वाटण्याचें कारणच नाहीं.

ह्या सर्व स्थितीचा विचार न करितां ज्यांनीं आपली लेखणी विटाळली त्यांनीं शिरोलिखित मयुरकवीची उक्ति सार्थ केली असें ह्मणावयाचें दुसरें काय? ता. ११।७।९७ उमरावती

आपला क्ष

---

## वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण शुद्ध ४ शके १८१९

---

## * पुण्यास स्वाहाकार

सरकारची शक्ती फार दांडगी आहे. सरकार ह्मणजे जवळ जवळ परमेश्वरी सत्तेला अधिकारी होय. लेफ्टेनंट एअर्स्ट व मि. ऱ्यांड यांचे खून किती जणांस भोंवतील याचा नेम नाहीं. हे खून होऊन नुकतांच सव्वा महिना लोटला इतक्यांत नामदार बाळ गंगाधर टिळक, सरदार बळवंत रामचंद्र नातू, त्यांचे बंधु ताम्रासाहेब नातु, केशव महादेव बाळ, व शंकर वासुदेव केळकर यांस गेल्या मंगळवारीं व बुधवारीं मिळून कैद करण्यांत आलें. नामदार टिळक हे मुंबईस नामदार दाजी आबाजी खरे यांच्या घरीं होते तेथें मंगळवारीं रात्रीं ९ वाजल्या नंतर पोलिसच्या मुख्य मुख्य अधिकाऱ्यांनीं आपल्या लोकांचा गराडा देऊन नामदार टिळक यांस कैद केलें. नामदार टिळक यांनीं सरकारी हुकूम शिरसावंद्य केला आणि आपणच होऊन ते वारंटाला स्वाधीन झाले. इकडे पुण्यास बुधवारीं सूर्योदया पूर्वीं घोडेस्वारांची टोळी बरोबर घेऊन मि. केनडी प्रमुख पोलीस अधिकाऱ्यांनीं सरदार नातू यांच्या बरावर मोर्चा फिरविला, सरदार बळवंतराव व तात्यासाहेब यांस राजद्रोहा बद्दल कैद केलें, इनाम वगैरे जप्त केलीं आणि त्याच दिवशीं पुण्याहून काढून कनिष्ठ बंधूस ठाण्याच्या तुरुंगांत ठेविलें आणि सरदार बळवंतराव यांस अमदाबादेच्या तुरुगांत पोचते केलें. उभयतां सरदारांनीं राजद्रोह केला अशा बद्दल त्यांस पकडण्यांत आलें आहे. न्यायकोर्टीच्या नियमाखालीं या उभय सरदारांस पकडलें नसून सरकारच्या इच्छे प्रमाणें त्यांस कैदेंत ठेविलें जाईल. ‘आर्यभूषण’ छापखान्याचे म्यानेजर रा. रा. केशव महादेव बाळ व ‘पुणे वैभव’ पत्राचे प्रकाशक रा. रा. शंकर वासुदेव केळकर यांसही पकडून बुधवारीं च मुंबईस नेलें आहे. या धराधरीमुळें सर्व पुणे शहर गडबडून गेलें आहे आणि सर्व देश चिंताक्रांत व बेदील झाला आहे.

नामदार टिळक, राजश्री बाळ व केळकर यांच्यावर पिनल कोडच्या कलम १२४ (अ) प्रमाणें आरोप आणिला आहे कीं ‘केसरी’ व ‘पुणे वैभव’ या वर्तमान पत्रांत राजद्रोहाचे जे लेख प्रकाशित केले ते लेख सरकारा विषयीं प्रजेच्या मनांत असंतुष्टता किंवा अराजनिष्ठा उत्पन्न करणारे आहेत. हा खटला मुंबईचे चीफ प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेट मि. स्लेटर यांच्या समोर परवां शनिवारीं चालणार होता. नामदार टिळक यांस जामिनावर सोडण्या विषयीं गेल्या बुधवारीं अर्ज केला होता पण तो नामंजूर करण्यांत आला. नामदार टिळक यांच्या तर्फे मि. रसेल हे बारिस्टर असून शिवाय पुष्कळ मदतनीस हायकोर्ट वकील आहेत.

ही धराधरी व कैद करण्याची धूमाकूळ इतक्यांतच संपली असें ह्मणवत नाहीं. वातम्या ऐकूं येतात त्या भयंकर आहेत आणि या राजद्रोहाच्या सत्रांत कोणाची आहुती केव्हां पडेल याला कांहीं धरबंध नाहीं. जो जो प्रकार अदृष्टांत असेल तो तो हेईपर्यंत काय चालेलें आहे याची उमज पडत नाहीं तेव्हां कांहींच अधीक सध्यां लिहवत नाहीं. पण ही साशंक प्रतीक्षा आमचे जीव कीं प्राण हालवून सोडीत आहे. ईश्वर साधु लोकांचें तारण करो व दुष्टांस योग्य ताडन करो!

---

त्या सर्वांगसुंदर राष्ट्रोत्सवाच्या दिवशीं पुण्यास जे दोन खून झाले त्यांच्या विषयीं मुंबई सरकारचें मत असें स्पष्टपणें दिसतें कीं ते खून कांहीं लोकांच्या कटामुळें झाले असून हे कट करणारे लोक वर्तमान पत्रांतील रोजद्रोही लेखामुळें चिथले व त्यांनीं या चांडलकृत्याची मजल मारली आणि या राजद्रोही वर्तमानपत्रकर्त्यांमध्यें राजश्री टिळक हे अग्रगण्य आहेत. या सरकारी मताप्रमाणें सर्व खलबतें चाललीं आहेत. वीस हजारांचें बक्षीस लावलें, खुनाला मदत करणाऱ्यांस माफीची जाहिरात दिली, जादा पोलीस पलटण ठेवून पुण्यास शोधाची व तपासाची दाणादाण मांडली आणि अद्याप त्या प्रयत्नाच्या दिशेनें यशप्राप्ती झाल्याचें ऐकिवांत नाहीं.

सरकारचा विचार सूड घेण्याचा नसेल किंवा आपल्या पूर्वस्थापित मताच्या ओघानें राजद्रोहप्रवर्तकांवर ही फौजदारी खटल्यांची गदा सरकारनें उचलली नसेल तर नामदार बाळ गंगाधर टिळक आदिकरून गृहस्थांवर गाजविलेली सरकारची सत्ता कशी अन्वर्थक व सद्हेतुक आहे हें कळण्याची आकलनशक्ती प्रस्तुतच्या विद्यमान स्थितींत आमच्या पाशीं नाहीं. ब्रिटिश सरकार ख्रिश्चयन धर्मी असून तें सूड घेणारें नाहीं असा आमचा पक्का ग्रह आहे. लेफटेनंट एअर्स्ट व मि. ऱ्यांड यांच्या खूनांची जी मूळपीठिका सरकारच्या दृष्टीनें निघाली आहे तिच्या परिपक्वतेचे परिणाम ह्मणून नामदार टिळक यांच्या सारख्यावर राजद्रोहाचे आरोप आणिले असतील तर अराजनिष्ठा व असंतुष्टता यांची प्रेरणा वर्तमानपत्रांतील लेखांनीं होऊन हे खून झाले अशा विषयीं संपूर्ण माहिती सरकारापाशीं गुप्तपणें उचंबळत असली पाहिजे असें आह्मी खात्रीनें ह्मणूं शकतों. निव्वळ निराधार संभवावर किंवा कल्पनेच्या लहरीवर मुंबईसरकारा सारखें जागरूक सरकार आपल्या प्रजेपैकीं थोर उदारचरित व नामदार पदवीच्या गृहस्थावर कल्लोळ उसळ देणार नाहीं अशी आमची मनदेवता ग्वाही देते. पण सर्व गोष्टींचा विचार करितांना मन साशंक होऊन द्विधा होतें. ‘केसरी’चे लेख सर्व वाचून पाहिल्या नंतर आमच्या सामान्य दृष्टीला राजद्रोहाचे अस्पष्ट बिम्ब देखील दिसत नाहीं; पण मुंबइ सरकारचे कौंसिलदार सुज्ञ आहेत तेव्हां सरकारचा प्रमाद तरी कसा ह्मणावा याविषयीं कातरता उत्पन्न होते. राजद्रोहाचे किंवा अराजनिष्ठेचे लेख प्रकाशित झाले तेव्हांच त्यांच्या प्रकाशकांवर भडाभड खटले होते तर आह्मास मुंबई सरकारच्या कृती विषयीं शंका आली नसती. पण त्या लेखांचा प्रकाश त्या खूनांवर पडत असला पाहिजे आणि त्या शिवाय प्रस्तुतची कायदेशीर मोंगलाई अशा संकटवेळीं नजरेस पडली नसती. सरकारी बातमीच्या तिजोऱ्या प्रजेला खुल्या नाहींत तेव्हां त्या सर्वज्ञ सरकारच्या सद्बुद्धीवर भरंवसा ठेऊन कालक्रमणा केली पाहिजे. अशा फौजदारी खटल्यांनीं, सरदार नातूंच्या कैदेनें व सरकारी प्रज्वालित तपासानें या खूनांचा मागमूस लागेल व खुनी अपराधी शिक्षा पावतील तर आमच्या देशाची काळोखी जाईल व सरकारचें व आमचें विनसलेले अशुद्ध मन पवित्र होईल. परंतु सध्याचें मार्गक्रमण भलत्या दिशेनें व आड वाटेनें असून वाटसरूंस विहिरींत पाडणोर आहे.

---

राष्ट्रीय सभेनें सर्व देश एकवटला आहे आजकाल पुण्यावर ओढवलेलें संकट सर्व राष्ट्राला दुर्दिन दर्शवितें. नामदार टिळका सारखीं माणसें कितीही चुकलीं किंवा मतिभ्रंशानें चळली तरी तीं आमच्या राष्ट्राची सर्व दौलत आहे. त्यांच्या पुढारीपणावर सर्व राष्ट्राची उभारणी होत जाहे. सरकारनें प्रजेची बाजू लक्ष्यांत घेतली पाहिजे. सरकारानें प्रस्तुत चालविलेलीं फौजदारी प्रकरणें अशा नरश्रेष्ठाला उद्देशून आहेत ही गोष्ट फार वाईट होय. सरकारचें सार्वभौमत्व असल्या फौजदारी खटल्यामुळें विशेष जाणवत असेल असें नाहीं. प्रथमतः सरकारनें दयासागर बनलें पाहिजे. क्षमा, शान्ति, व उदारपणा हीं सरकारचीं मुख्य तीन शस्त्रें होत. यांच्या प्रयोगानें प्रजाजन प्रभाकित व स्वामीपरायण होत असतात हा अनुभव आजकालचा नाहीं. जगाचा इतिहास याच गोष्टी शिकवीत आहे. जोंपर्यंत राज्याला अपाय होण्याचा संभव नाहीं तों पर्यंत राजद्रोहाच्या मिषानें प्रजेचा छळ होणें राजमान्य मार्गाला उचित नाहीं. प्रजेला स्वातंत्र्य इंग्रजींत मिळालें त्याचा प्रभाव ब्रिटिश राज्याच्या चिरायुपणांत दिसत आहे. राज्यकर्त्यांचे दोष दाखविणें किंवा परराष्ट्रीय अंमलामुळें होणारे तोटे प्रदर्शित करणें ह्मणजे कांहीं राजद्रोह नाहीं.

नामदार टिळक प्रभृति लोकांवर राजद्रोहाच्या प्रेरणे बद्दल अपराध लादणें ह्मणजे राज्याच्या प्रमुख स्तंभावर हल्ला करण्या सारखें आहे. इंग्रजी राज्याचा भक्कमपणा शिकलेल्या नेटिव लोकांच्या राजनिष्ठेवर आहे आणि ती राजनिष्ठा अशा फौजदारी प्रकरणांनीं कलुषित करणें मुत्सद्दीपणाला शोभत नाहीं आणि मोठें घातुक होणार आहे. सारांश, सर्व राष्ट्रांचें तनमनधन या फौजदारी प्रकरणाकडे लागलें आहे तर सर्व राष्ट्राला दयेनें व क्षमेनें आपलेंसें करणें सरकारच्या हातीं आहे.

या राजद्रोहाच्या खटल्याचा पुण्याच्या भयंकर खुनाशी कांहीं अर्थाअर्थी संबंध असेल तर सरकारची कृती कांहीं तरी शोभेल आणि जर बादरायण संबंधानें दहशत बसविण्या साठीं ही दारूगोळ्याची सिद्धता असेल तर सरकारची मोठी चूक करीत आहे. प्रजे मध्यें अस्वस्थता, अशांतता व अराजनिष्ठा हीं सरकारच्या प्रस्तुत कृतीनें मात्र जरूर उत्पन्न होतील; आणि त्यांचे दुष्परिणामा बद्दल शिक्षा देखील सरकारच्या बरोबर प्रजाजनांसही भागावी लागेल. या देशाची स्थिती अशी कांहीं विलक्षण आहे कीं ब्रिटिश छत्रा शिवाय कोणताच स्वामी कल्याणप्रद नाहीं आणि ब्रिटिश राज्याच्या खऱ्या अस्तित्वाला व वैभवाला इंडिया सारखें दुसरें राष्ट्र अलम दुनियेंत मिळणार नाहीं. असा निकट समवाय संबंध राज्यकर्ते व प्रजासमूह यांच्या मध्यें जडला आहे. त्या अर्थी सरकारानें पिनल कोडाचा उपयोग होईल तितका कमी करावा आणि सत्यप्रियतेनें व उदारशीलानें प्रजेला संतुष्ट व राजनिष्ठ राखावी यांतच खरें राज्यकर्तृत्व आहे.

---

गेल्या सालीं जो दुष्काळ पडला त्यानें सर्व प्रकारच्या व्यवहारामध्यें घोटाळा करून सोडला आणि मुंबईकडे जो प्लेग धडाक्योंन चालू होता त्यानें वऱ्हाड प्रांताच्या व्यापाराला धक्का बसला. या दोन कारणामुळें सरकारी स्टांपांच्या विक्रीमध्यें देखील उत्पन्न पुष्कळ कमी आलें. सरकारी स्टांपाचे मुख्य उपयोग दोन प्रकारचे आहेत. इंडियन स्टांप आक्टाप्रमाणें लोकांमधील देवघेवी, गहाण विक्री वगैरे व्यवहारास जे स्टांप लागतात ते निराळे असतात आणि कोर्टांत फिर्याद करणें, अर्जी करणें, वगैरे कोर्टाच्या कामासाठीं लागणारे स्टांप कोर्ट फी आक्टाप्रमाणें निराळेच असतात. सन १८९६–९७ सालच्या वार्षिक रिपोर्टावरून कळतें स्टांप खात्याचें उत्पन्न पुष्कळ कमी झालें आहे. १८९५–९६ सालीं स्टांप विक्रीचें उत्पन्न रुपये ९२१०५६––१२ आ १ पै झालें ह्मणजे शेंकडा ४.१ याप्रमाणानें उत्पन्न उतरलें आहे. या उत्पन्नांतून स्टांप खात्याचा खर्च वजा केला असतां बाकी निव्वळ उत्पन्न सरकारास रुपये ८३१७५२

४ आणे —४ पै झालें.

कधीं कधीं एकाच कारणामुळें उलट परिणाम दिसून येतात. दुष्काळामुळें अकोला, बुलडाणा, व वणी तीन जिल्ह्यांत जनरल स्टांपाची विक्री फार कमी झाली याच्या उलट स्थिति इलिचपूर व वाशीम जिल्ह्यांत अगदीं ठळकपणें दृष्टीस पडते. उमरावती जिल्ह्यांत सरासरी पांचशें रुपये उत्पन्न कमी आलें ह्मणजे कांहीं विशेष नाहीं. आणि पश्चिम वऱ्हाडच्या मानानें उमरावतीकडे दुष्काळाचें स्वरूप सौम्य होतें. अकोला जिल्ह्यांत १८९४-९५ सालीं रुपये ८७७८३-८ आणे उत्पन्न होतें तें १८९५-१८९६ सालीं रुपये ९०१४०-८ आणे झालें पण पुनः १८९६।९७ सालीं १८९४-९५ प्रमाणेंच ह्मणजे रुपये ८६८२७-१४ आणे झालें. या परस्पर विरोधी कार्यासंबंधानें इन्स्पेक्टर जनरल क्याप्टन वारन हेस्टिंग्ज साहेब ह्मणतात कीं, दुष्काळाच्या वेळीं कित्येक ठिकाणचे साहु सावकार कुळांस कर्ज सढळ हातानें देत असतील व कित्येक ठिकाणीं ते लोक कर्ज देण्याविषयीं हात आखडता ठेवीत असतील. याशिवाय मुंबईच्या प्लेगमुळें वऱ्हाड प्रांताच्या व्यापाराला मोठा व्यत्यय आला आणि ह्यामुळें जनरल स्टांपाचें एकंदर उत्पन्न रु० ३२९९२३-१३ आणे १ पै असून तें सरासरीं ९३०० रुपयांनीं कमी झालें.

हुंडीच्या स्टांपा मध्यें विलक्षण लबाडी या जिल्ह्याचे डेपुटी कमिशनर यांनीं उजेडांत आणिली हुंडीचा स्टांप ज्या हुंडीच्या कागदाला जोडतात तो त्या हुंडीचें काम आटोपल्यावर दुसऱ्या हुंडीस काढून लावितात असें प्रत्ययास आलें. लबाड लोकांच्या कल्पना कशा धांवतात याचा नेमच नाहीं.

# The Berar Samachar

MONDAY AUGUST 2 1897

The Indian administration is very costly. The expenditure far exceeds the revenue; and the high credit of India lies more in her borrowing powers than in her actual cash balances. This state of things in regard to finances is most undesirable. If it continue a long time enough the exchequer of the Indian Empire will sooner or later run into bankruptcy. The large indebtedness of India and her growing expenditure presented a problem of extreme gravity and utmost importance. The question was how to secure an equilibrium between the finances and expenditure of the Indiaa administration. The Imperial mandate of Her Majesty the Queen Empress appointed a Royal Commission to enquire into the propriety or otherwise of the present expenditure. The general subject of inquiry was however beset with certain limitations and restrictions. Lord Welby is the President of this Commistion and the latter is more known as "Welby Commission." High officials of a long and intimate connection with Indian affairs were examined as witnesses on the various topics of inquiry. The evidence of the English gentlemen was almost in unison with the views of the India Government. Some witnesses were however conspicuous by their free admission of the faults and shortcomings in the Indian administration. It is the statements of these English witnesses that will have due weight will the Royal Commission. The Welby Commission afforded a golden opportunity to Indian witnesses to give a free and full scope to the views of the Indians in this connection. The gentlemen from India are well known throught the whole nation. Their names are a sufficient guarantee for the correctness, moderation and general acceptance of their opinions. They are gentlemen of lead and light. They are the main—stay of the National Congress. Their criticism of the British administration is from the stand—point of the ryots. The official view was already before the Royal Commission through the mouth of the English witnesses. The Royal commission will have now to give its decision. The time is ripe for the complete report of its proceedings.

Our expections are neither high nor encouraging with respect to the final conclusion of the deliberations of the Royal Commission. The Hon'ble Mr. Subramanya Iyer of Madras has told us his mind. He has no great faith in the utility of the Royal Commission from the general attitude of some of its prominent members. Indian witnesses were put to a severe and critical test of a wide cross—examination. All of them did very well. They have proved, on the strength of facts and figures, the rightness of their opinions. The British people did not accept their evidence with an open and liberal heart. It was read in a carping mood. Almost all English papers jumped to the conclusion that the evidence is on the whole *destructive* in its character. But we join issue with them. There was not a tinge of shrewd malvolence. The statements of Indian witnesses were full of loyal and grateful acknowledgements of the blessings of the British rule in India. Their evidence pointed out as well the evil effects of a foreign rule. The bright side of the picture of the British administration was coupled with its black side in the sequel. It serves no man's purpose to hide an unpleasant truth. A wise statesman will try to learn it at first. The Indian mind was rather fully engrossed in suggesting remedies to compensate the disadvantage of the foreign rule. The attempt wat first to advert successfully to what was wanting in the British Administration. The next thought was directed to devise and propose means to remove the grievances of the people. The *destructive* spirit of the criticism of the British policy was the more *constructive* because it aimed at laying down the foundations of the British Empire deeper and on a more solid rock. The British raj is the highest saviour of the Indian nation; and it was for its permanent establishment that Indian witnesses called upon the rulers to respect the high aud legitimate aspirations of the Indian people. Our witnesses told the English people to treat us on the common level of a British subject and to make India a component part of the dominions of Great Britain and Ireland. The whole evidence prescribed a moral tonic to drive away the step—motherly treatment of the Indian nation. We congratulate the Indian witneses on the success they have achieved in pointing out the policy that will weld the Indian Empire into a British nation. We have however learnt to be pessimistic in regard to the result of the Welly Commission. Let us hope that all will be well in course of time.

The Hon'ble Mr. Bhavnagree M. P has made a name for himself in the Parliament on account of his antipathy towards India. He is a weather cock. He advocates the Press gagging Act while in 1878 he expressed his views along with the late Mr. K. P. Telang in the following manner:—

"If there is one circumstance more than another which constitutes the superiority of British rule over former Governments in this country, it is, next to the liberty of speech and thought, the abridgment to the sphere of personal Government, the gradual extension of the reign of Law. Liberty of speech has now, for the first time in a period of peace, been trenched upon by the Act in question. The reign of law has been gradually in process of subtle and indirect curtailment for a considerable number of years. Your petitioners humbly ask your Honorable House to take measures to check this lapse on the part of the Indian authorities from the higher stand—point which British rule in India has hitherto occupied, and which in the eyes of people has in a very great degree made up for some of the inevitable disadvantages of dependency on a foreign power.

Your petitioners believe that the Act in question had been modelled to some extent on a statue passed by the Imperial Parliament for Ireland, being 33 and 34 Vict. c. 9. But your petitioners beg to point out two most essential differences between that Act and the Act passed by the Indian Legislature. In the first place the Imperial statute is expressly made temporary, to be in operation for only a year and a half or thereabouts, while the Indian Act is absolutely without limitation in its duration; secondly, the English—Irish Act gives a remedy to the aggrieved party by way of damages against the executive officer responsible thus giving power to the subject to bring the conduct of such executive officer before the constituted Courts of the land. And the ostentatious exclusion of this constitutional remedy, as your Petitioners need scarcely point out, is the feature of this Act, which, as your Petitioners wish to submit calls for the strongest reprobation on the part of your Hon'ble House. Your Petitioners therefore submit that the above cited Imperial statute does not by any means justify the unconstitutional character of the Indian Act. There is also these further circumstances to be noted, that the necessity for the preservation of peace in Ireland at the time might be held to justify the enactment of the temporary Imperial statute. The newspapers which it was sought to control by the Act had, in so many words, incited tenants to murder their landlords, or called on Irishmen to rebel and war against the State; and the result of those writings as well as other special circumstances had led to a chronic state of disturbauce and crime in Ireland. No such state of things has been or can be even alleged in excuse of the procendings of the Indinn Legislature."

## वऱ्हाड

हवामान- एकंदर पाऊस १० इंचावर झाला थोडा वेळ जोराचा पाऊस पडून उघाडी ही पुष्कळ वेळ राहते त्यामुळें नवीन पेऱ्याचीं रोपें चांगलीं जोरावर आहेत. पारा ७५ पासून ९२ अंशापर्यंत चढतो तथापि मनस्वी उकडत असे आणि पाऊस पडल्यावर कांहीं थंडपणा वाटे. हवेंत आर्द्रपणा विशेष आहे. हवेचा उपद्रव मोठा चालू आहे.

आह्मास लिहिण्यास दुःख वाटतें कीं रा. रा. दत्तात्रय विष्णु भागवत यांचा बारा वर्षाचा द्वितीय चिरंजीव गोविंदा यांस कालऱ्यानें देवाज्ञा झाली. आणि तसेंच रा. रा. दामोदर गणेश पटवर्धन यांच्या गर्भवती पत्नीस ही हवेचा उपद्रव होऊन देवाज्ञा झाली. हे दोघे गृहस्थ आमच्या शहरीं सार्वजनिक कार्यांत प्रमुख आहेत. त्यांच्यावर हा प्रसंग गुदरला ह्मणून सर्वांस वाईट वाटत आहे. मृत्यू सारख्या हानी पुढें शांतवन व्यर्थ !

रा० रा० दामोदर गणेश पाध्ये एम. ए. हे गृहस्थ वऱ्हाडच्या मंडळीस चांगले माहित आहेत. हे हल्लीं मुंबईस गोकुळदास तेजपाळ हायस्कूलचे प्रिन्सिपाल आहेत. मुंबई युनिव्हरसिटीच्या दोन फेलोंची निवड दरसाला प्रमाणें यंदा होणार आहे या निवडणूकीत एका फेलोच्या जागेसाठीं रा० पाध्ये हे उमेदवार आहेत. हे गृहस्थ मोठे विद्वान असून यांचा काल सतत विद्येच्या व्यासंगांत जात आहे. हे कांहीं दिवस इलिफिनस्टन कालेज मध्यें इतिहास विषयाचे प्रोफेसर होते. हे गृहस्थ युनिव्हरसिटींत फेलो नेमले जातील तर त्यांच्या निवडणुकीनें मोठा फायदा होईल अशी आमची खात्री आहे. दोन जागा साठीं एकंदर ७।८ गृहस्थ उमेदवार आहेत. दोन पदवीवाल्यांस या निवडणुकींत मत देण्याचा अधिकार आहे तेव्हां आमची प्रांतस्थ पदवीधर मंडळी राजश्री पाध्ये यांस आपलें मत देतील असें निराळें ह्मणण्याची कांहींच आवश्यकता दिसत नाहीं. राजश्री पाध्ये हे व्यवसाया संबंधानें मुंबईस असतात तेव्हां त्यांचीच निवड होईल तर ते युनिव्हरसिटीची सेवा विशेष चांगली करितील.

अकोल्यास एक बैरागी आला आहे तो विहिरींतलें पाणी तिच्या तोंडावर बसून आपल्या मंत्रसामर्थ्यानें लोट्यांत आणितो. हा चमत्कार पाहण्यासाठीं येथील टप्या हनुमानाच्या देवालयाकडे लोकांची गर्दी होत असते. मंत्रसामर्थ्य ह्मणा किंवा कांहीं ह्मणा, पाणी अदृश्यपणानें लोट्यांत चढतें हा चमत्कार होय!

## आकोला बाजार भाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ९६ रुपये |
| जवारी | १३५ रु० |
| गहूं ( कांठे ) | १४० रु० |
| ,,( बनशी ) | १६० रु० |
| चणे | १२७ रु० |
| तेल | ६॥ रु० मण |
| तूप | ९॥ मण |
| सोनें | २६ तोळ |
| चांदी | ८० |

जाहिरात

आह्मास आमचा जुन्या रुळा प्रमाणें इजारा असलेला गांव मौजे हिरडी प्रगणें डोंगरखेडें तालुके यवतमाळ जिल्हा वणी हा विकावयाचा आहे याचें क्षेत्रफळ ९०१ एकर २७ गुंठे आहे व आकार २३१०१२ आहे. हा गांव कोठेंही गहाण वगैरे नसून यंदा निमे जमीन साऱ्यानें दिली आहे व वरचीं शेतेंही पेरून तयार आहेत. ह्मणून ही संधी घालवूं नये ज्यांची घेण्याची इच्छा असेल त्यांनीं खालीं सही करणारास समक्ष भेटावे अगर पत्र पाठवावें ह्मणजे खुलासा होईल. तारीख २०।७।९७ इ.

सही

पृथ्वागीर हरीगीर यवतमाळ

दस्तुर खुद्द.

## वर्तमानसार

ऑ. टिळकांचे घरून व आर्यभूषण छापखान्यांतून जप्त करून आणलेले कागद व पुस्तकें शनिवारीं म्या. कोर्टांत हजर केलीं. वर्गणीदारांची यादीं नक्कल करून घेण्यासाठीं मात्र परत देण्यांत आली. मि. दावर बॅरिस्टर यांनीं ऑ. टिळकांस जामिनावर खुले करण्यासाठीं कोर्टास केलेली विनंती अमान्य झाली. खटला आजपर्यंत तहकूब आहे. रा. केळकर ( पु. वै. ) यांचे तर्फे मि. काविरुद्दीन बॅरिस्टर यांनींही त्यांस जामिनावर सोडण्यासाठीं केलेली विनंती अमान्य झाली.

✓ खाना स्टेशनावर दोघा हिंदुस्त्रियांवर बलात्कार करण्याचा युरोपियनांनीं यत्न केल्याची कलकत्याची तार विलायतेस प्रसिद्ध झाल्यावरून विलायतेंत गडबड उडाली आहे ही बातमी प्रथम बंगवासी पत्रांत आली. तें पत्र फ्रेंच मुलखांत चंद्रनगर येथें प्रसिद्ध होतें. त्याच्या प्रती जिकडच्या तिकडे पोचत्या करण्याचें इंग्रजी पोष्टानें बंद केलें आहे असें सांगतात ! ! कालची तार सांगते कीं, या खटल्याच्या बाबतींत बंगवासी कर्त्यांच्या पत्रास उत्तर देताना, हा खटला दाबून टाकण्यांत येत नसून त्याची चवकशी चालली आहे आणि तोंपर्यंत असि० सर्जन व पोलीस सर्जन यास दुसरीकडे बदलून सस्पिंड केलें आहे, असें बंगालच्या ले० गव्हनरांच्या प्रायव्हेट सेक्रेटरीनें बंगवासी कर्त्यास लेखी कळविलें आहे. आतां या इन्साफांत काय निघतें पहावें.

तयार झालेले क्यांटोनमेन्ट बिल २२ रोजीं गव्हरनरजनरलांच्या कौंसलांत पास झाले व केलेले नियम १२ अगष्ट रोजीं पास होतील.

व्हॉलेंटियर लोकांस चांगले उपयुक्त स्थितींत राहतां यावें ह्मणून लि मेटफर्ड बंदुका व दारूगोळा मूळ किंमतीस विकत घेण्याचा सरकारानें अधिकार दिला.

✓ पुण्याच्या खुनांचा जो कोणि सुगावा लाऊन देईल तो स्वता खून करणारा नसून खुनास उत्तेजन देणाराही नसल्यास त्यास माफीचें सर्टिफिकिट मिळेल असा जाहीरनामा सरकारनें लाविला आहे.

पुण्यास जादा पोलिसाचा खर्च तूर्त सरकारांतून करण्याचें ठरलें.

निजाम सरकार एक कोट रुपये कर्ज काढीत आहे व निजामाच्या राज्यांतले लोकच ते देण्याची तयारी करित आहेत. फार चांगलें आहे.

लेबोन येथील दंगेखोरांनीं तेथील इंग्रजी तिजोरी काबीज केली व ट्रेझरी ऑफिसर मि० न्युब्रोडर यांस कैद केलें.

बलुचिस्थानांत टोळधाड फार असून त्यामुळें रेलवेच्या गाडीचीहि एके दिवशीं २ तास खोटी झाली.

हांगकांगच्या पोलिसांत कांहीं अव्यवस्था होऊन एक इंग्रज इन्स्पेक्टर सेशन कमिट झाला व ४ सस्पिंड झाले.

वाढलेला धारा भरवत नाहींसा झाल्यामुळें धान्याच्या वसुलाकरितां तंजावर जिल्ह्यांतली १०९ एकर जमीन सरकारानें लिलाव करून विकली, पण गिऱ्हाइक नसल्यामुळें सरकारानेंच ३०३ स विकत घेतली. तसेंच तंजावरपैकीं १६ एकर जमीन ०१४ विकत घेतली!

शिवाजी उत्सवांत व्याख्यानें देणारे व सुधारक पत्रांत लेख लिहिणारे यांस फरग्युसन कालेजाच्या संस्थेंतून काढून टाकावें अशी सूचना होणार असल्याचें सांगतात.

कोल्हापूरकरांनी दुष्काळाकरतां आपल्या प्रजेस तगाई देण्यासाठीं ८९,००० रुपये मंजूर केले असून त्यापैकीं ४६,०७४ रुपये वाटण्यांतही आले.

नशिबाचा जोर— ईश्वरी कृपेचा एक अजब मासला अमृत बझार पत्रिकेच्या बातमीदारानें विश्वसनीय ह्मणून असा कळविला आहे कीं,—उत्तर बंगल्यांत जमालपूर रेलवे स्टेशनावर एक दुष्काळपीडित हिंदु स्त्रीसह अन्नाची कांहीं सोय होईल ह्मणून आला व दैवयोगानें एका बंगल्यांच कारखान्यावर त्याला कामही मिळालें; थोडे दिवस गेल्यावर त्याची बायको गरोदर होती ती बाळंत होऊन तिला मुलगा झाला. दुष्काळाच्या कामावरील बाळंतपण ह्मणजे काय थाट असणार ह्याची कल्पना वाचकांस होईलच. एक दिवस बाप शहरांत गेला व आई मुलाला चादरेंत ठेऊन शेजारीं गेली होती. इतक्यांत एक नागसर्प येऊन त्या तान्या मुलास वेटाळें देऊन वर फणा उभारून बसला, आई शेजारून येऊन पाहते तों नागोबा! तेव्हां तिची बोबडी वळली. शेजारीं पाजारी ही पुष्कळ लोक जमून त्या काळाच्या हातून मुलाची सोडणुक करण्याचे प्रयत्न करूं लागले परंतु तो कांहीं केल्या हालेना; तेव्हां एका भाविकानें देवीच्या पूजेचा नवस बोलण्या विषयीं मुलांच्या आईला सांगितलें. तिणें त्या प्रमाणें नवस करतांच ते नागोबा मुलाला किंवा जमलेल्या लोकाला कांहीं ही इजा न करतां चालता झाला. पुढें ह्या मुलाची राजचिन्हें आहेत असें एका ज्योति[illegible] भविष्य केलें. त्यामुळें तर त्या बालमूर्तीस [illegible] लोकांचे थवे जमूं लागले; कांहीं श्रीमान [illegible] तो मुलगा आपणांस मिळावा ह्मणून त्याच्या आईबापाला मोठाल्या रकमा देत होते; परंतु त्यांणी मुलगा दिला नाहीं. आतां तेथील एका हपिसरानें ह्या कुटुंबास एक मठी बांधून दिली असून त्यांत तीं सुखानें कालक्रमणा करित आहेत. ह्या मुलास पाहण्यास येणाऱ्या मंडळीकडून रोज ४।२ रुपयांचा खुर्दा त्या कुटुंबास मिळतो. ईश्वरी कृपा झाल्यावर काय न होईल? टा० अ०

अमेरिकेंत न जळणारा असा एक धातू सांपडला असून त्यापासून कागद होतात ह्मणतात मग तर त्याचा फारच उपयोग आहे.

आलवार संस्थानापैकीं किसनगड किल्यांत आग लागून दारू पेटली आणि त्या दारूनें शेंकडों मनुष्यें मेलीं. ४० मुर्दे सांपडले, बाकीच्या मुर्द्यांच्या चिंधड्या उडाल्या. किल्लेदार नायब किल्लेदार वगैरे सर्वांची रक्षा झाली.

जर्मनी मध्यें कांचेचीं कौलें तयार करूं लागले आहेत. तीं कौलें जाड व मजबूत असून त्यांतून प्रकाश चांगला पडतो.

यहूद्यांनीं आपल्या तरुण मुली ठेवून आपण देश सोडून जावें असा हुकूम राशियामध्यें सुटल्याचें समजतें. खरें असल्यास कोण हा जुलूम !

काबुलच्या अमिरानें पायळ लष्कराच्या दोन तुकड्यास गिझनीहून निघून हजाऱ्यास जाण्या बद्दल एकदम हुकूम फर्मावला आहे.

टोंकीच्या खाडीवर लष्कर व लष्करी सामान पाठविण्यास सुलभ पडावें, ह्मणून सिंधु नदीवर होड्यांच २० पुल बांधण्या आले आहेत. दी० बं०

नामदार वुडबर्न साहेब हे देशी वर्तमानपत्रांच्या राजद्रोही लेखासंबंधाचा विचार करण्याकरितां पुण्यास गेले आहेत.

मुलकी आणि फौजदारी कामाच्या अधिकाराचें एकीकरण—हा प्रश्न राष्ट्रीय सभेनें एकसारखा हातीं घेतला आहे, परंतु त्याची अद्यापि कांहीं दाद लागत नाहीं. मुलकी आणि फौजदारी कामाचे अधिकार एकाच कामगाराच्या हातीं असल्यामुळें रयतेवर अनेक प्रकारचे जुलूम होतात. ह्यासंबंधानें इंग्लंडांतील "ट्रूथ" वर्तमानपत्राचे एडिटर मि. लाबूशेर हे ह्मणतातः—

एकाच कामगाराच्या हातीं मुलकी आणि फौजदारी कामाचे अधिकार ठेविल्यानें रयतेवर कसे जुलूम होतात ही गोष्ट हिंदुस्थानांतून मजकडे आलेल्या एका प्रकरणावरून चांगली सिद्ध होत आहे. हिंदुस्थानामध्यें कलेक्टरानें आपल्या जिल्ह्यांतील एखाद्या मनुष्याचें नुकसान करण्याचें मनांत आणिलें, तर तें त्याला ह्मटल्या वेळेस करतां येणार आहे. कलेक्टर हा जिल्ह्यामधील सरकारचा मुख्य अधिकारी होय. त्याच्याच ताब्यांत पोलीस, अबकारी वगैरे सर्व खातीं असून त्याला माजिस्त्रेटाचाही अधिकार असतो शिवाय त्याला प्राप्तीवरील कराची आकारणी करण्याचा अधिकार आहेच. इतके अधिकार त्याच्या हातीं असल्यामुळें त्यास वाटेल त्या मनुष्याचा पाहिजे तितका छळ करितां येतो. त्यानें आपल्या अधिकाराचा अतिक्रम केला तर त्याच्यावर कोणी पहाणारा असतो असें नाहीं. परंतु ह्या कामगारास आपल्या अधिकाराच्या बाहेर गेल्याशिवाय लोकांना पाहिजे तितका त्रास देतां येतो. यावरून ही एक गोष्ट उघड होते कीं हे अधिकारी निवडतांना सरकारानें फारच सावधगिरी घेतली पाहिजे. त्यांचा स्वभाव आणि वर्तन योग्य आहेत किंवा नाहीं, ह्याचा पूर्ण विचार होऊन त्यांच्या नेमणुकी झाल्या पाहिजेत. व त्यांच्या नेमणुकी झाल्यानंतर ते आपलें काम कोणत्या रीतीनें चालवीत आहेत हेंही वारंवार पाहण्यांत आलें पाहिजे."

लॅबूशेसारख्या प्रसिद्ध इंग्लिश मुत्सद्याचे हे विचार ज्यांच्यावर हिंदुस्थानच्या राज्यकारकारभाराची जबाबदारी आहे त्यांनीं अवश्य ध्यानांत ठेविले पाहिजेत.

रुपयांची खाण— रावळपिंडी जिल्ह्यांत एक अपूर्व चमत्कार घडल्याची खबर आली आहे. मौजे बाजार लालकुर्ती या गांवांतील एका नाल्यावर ता. ९ जून रोजीं एका गवळ्याची स्त्री पाणी भरण्याकरितां गेली होती. उन्हाळा दिवस असल्या कारणानें त्या नाल्यांत झिरे खोदले होते, त्यांपैकीं एका झिऱ्यावर जाऊन तिनें त्यांतील वाळू पुष्कळशी बाहेर काढिली. इतक्यांत जमिनींतून एक नळ उत्पन्न झाल्या सारखे होऊन त्याच्या वाटे प्रथम माती व रेती येऊं लागली व त्यानंतर त्या नळावाटे रुपये वर येऊं लागले. तिनें दोन रुपये घेऊन सानंदाश्चर्यें करून त्याकडे पाहूं लागली तों तिला असें दिसलें कीं, श्रीरामचंद्र सीतेला अंकावर घेऊन बसले आहेत, व हनुमान त्यावर चवरी वारीत आहे. दुसऱ्या बाजूनें तो रुपया उलटून पाहिला तों त्या बाजूनें श्रीरामलक्ष्मण असे दोघे धनुष्यबाण हातांत घेऊन उभे आहेत असें दिसलें. या मूर्तीच्या भोंवताली त्या रुपयावर हिंदी भाषेंत कांहीं अक्षरें लिहिलीं आहेत असेंही तिच्या दृष्टीस पडलें. नंतर तिनें पुनः त्या झऱ्यांत खूप खोल हात घातला तो मूठभर रुपये तिच्या हातांत आले. मग काय विचारतां तिला विलक्षण आनंद होऊन तिनें आपली पाण्याची घागर रुपयांनीं भरण्यास आरंभ केला.

इतक्यांत धोबी लोकांची आणि दुसऱ्या हलक्या जातीची कांहीं मुले तिकडून जात होतीं त्यांनीं ही बाई पाण्यांतून कांहींसे काढून आपल्या घागरींत भरीत आहे असें पाहिलें. नंतर तेही तेथें आले आणि त्या झऱ्याच्या तळाशीं हात घालून रुपये काढून आपल्या ओंच्या भरल्या. पांचशे रुपये सर्वांनीं मिळून काढिले हा रुपया अष्टधातू मिश्रित आहे व यांत कांहीं शुद्ध चांदीचे ही आहेत. रुपयाची आकृती मुर्ती रुपयाच्या अधेली एवढी व ती सारखीच आहे. त्या हलक्या जातीच्या मुलांनीं पोलीस धरून नेईल अशी शंका घेऊन तेथून पलायन केलें आणि गांवांत येऊन ते रुपये दोन दोन पैशास ह्मणजे अर्ध्या आण्यास विकले. दुसऱ्या दिवशीं त्यांची किंमत दोन आणे व पुढें वाढतां हल्लीं त्या रुपयांची किंमत आठ आणे झाली आहे. असो या रुपयांची बरीच लूट झाल्यानंतर पोलीसास ती खबर समजली व हल्लीं सरकारानें त्या ठिकाणीं पाहारा ठेऊन ती सर्व जागा खोदून त्यांतील खजिना एकदम काढण्याचा विचार चालविला आहे. हा रुपया वजनांत ६ मासे वजन आहे. पुष्कळ लोकांनीं हे रुपये विकत घेऊन त्यावरील मूर्तीची पुजा करून आपल्या देव्हाऱ्यांत मांडले आहेत व कित्येकांनीं आपल्या रुपयांच्या तिजोऱ्यांत ठेविले आहेत. दुष्काळामुळें सरकारास कांहीं नुकसान आली होती ती भरून देण्या करितां ही रुपयांची खाण परमेश्वरानें त्यांस सांपडून दिली. प्रारब्ध जोरावर असलें ह्मणजे असे प्रकार आपले आपण घडून येतात. आतां या खजिन्यांत किती रुपये निघतात कोण जाणे. धन्य इंग्लिश सरकारचें नशीब ! त्या रुपयावर जीं अक्षरें आहेत तीं चारही बाजूंनीं 'राम राम' अशीच फक्त आहेत दुसरें कांहीं नाहीं. न्या सु.

कलकत्ता येथील ट्राम्वेमध्यें एक पारशी स्त्री बसून चालली असतां, एक युरोपियन त्या गाडींत तिच्या शेजारी बसला, आणि त्यानें त्या स्त्रीचें चुंबन घेतलें; याबद्दल खटला होऊन सदरहू साहेबास एका आठवड्याच्या कैदेची शिक्षा झाली.

टोची स्वारीपुढें चाल करीतच आहे. शेराणी व मेझर हीं ठिकाणें उजाड झालेलीं असावीं. कांहीं फौज दाताखेल येथें पो चली.

कोरियांत इंग्लंडचें जें हित आहे त्याकरतां तो देश राशियास जोडला जाणें चालणार नाहीं असें इंग्रजपत्राचें ह्मणणे आहे.

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास ........................ ८४

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस........ ८१ ०६

दुसरे खेपेस .... ........ ८१

Single copy .................................... 4 as

Advertisement

Below 10 lines ...... 2 Rs

Per line over 10 ...... 4 as

Repetition Per line ... 3 as


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR


VOL XXXI — AKOLA MONDAY 9 AUGUST 1897 — NO 31

वर्ष ३१ — आकोला सोमवार तारीख ९ माहे आगस्ट सन १८९७ इ० — अंक ३१


## जाहिरात


आह्मास आमचा जुन्या रुळा प्रमाणें इजारा असलेला गांव मौजे हिरडी प्रगणें डोंगरखेडें तालुके यवतमाळ जिल्हा वणी हा विकावयाचा आहे याचे क्षेत्रफळ ९०१ एकर २७ गुंठे आहे व आकार २३।०।२ आहे. हा गांव कोठेंही गहाण वगैरे नसून यंदा निमे जमीन साऱ्यानें दिली आहे व घरचीं शेतेंही पेरून तयार आहेत. ह्मणून ही संधी घालवूं नये ज्याची घेण्याची इच्छा असेल त्यांनीं खालीं सही करणारास समक्ष भेटावे अगर पत्र पाठवावें ह्मणजे खुलासा होईल. तारीख २०।७।९७ इ.

सही

पृथ्वागीर हरीगीर यवतमाळ

दस्तुर खुद्द.


### नोटीस


मानोजी वल्लद इश्मान पाटील पोहरे राहणार उरळ बुजरुक तालुके बाळापूर जिल्हा अकोलें यांस खालीं सही करणार यानकडून नोटीस देण्यांत येते कीं मयत मिलकी मर्द गोविंदा वागर इर्ने मौजे उरळ येथील तिचे मालकीचीं शेतें सर्वे नंबर २८ सालीम, सर्वे नंबर ३८ यांतील $\frac{1}{2}$ वा हिस्सा, व सर्वे नंबर ९१ यतील $\frac{1}{2}$ वा हिस्सा येणेंप्रमाणें तीन शेतें १३०६ तें १३१० फसली ५ सालांकरितां आह्मास बटाईनें वहीतीस देऊन त्याबद्दल योग्य दस्ताऐवज लिहून नोंदून घेतला आहे. व सदहू शेतें तिनें आमच्या ताब्यांत दिलीं होतीं. मिलकी मयत झाल्यावर तिचे वारस या नात्यानें आपण तिच्या जिनगीची व्यवस्था करण्याचें मनांत आणून आमचे ताब्यांतून सदर्हू शेतें तुह्मी करारांत ठरलेल्या मुदतीचे आंतच अन्यायानें बलात्कार करून हिसकून घेतलीं आहेत. हें तुमचें करणें फार गैर आहे, करितां आह्मी या नोटिशीनें तुह्मास स्पष्ट कळवितों कीं ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत सदर्हू शेतें आमच्या ताब्यांत द्यावीत व असें केल्याबद्दल आमची लेखी पावती घ्यावी. असें न केल्यास आह्मी आमचे कबुलायती प्रमाणें नुकसान तुह्मापासून कोर्टमार्फत वसूल करून घेऊं. या नोटिशीचा खर्च तुह्मापासून घेऊं. कळावें ता० १।८।९६ इ०

सह्या

तुकाराम पिरथम वा॥ पोहरे राहणार उरळ झुरळ हातची निशाणी रेघ.

भावज्या वल्लद रावोजी पोहरे राहणार उरळ झुरळ हातची निशाणी रेघ.


वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण शुद्ध १२ शके १८१९

मुंबईच्या प्रेसिडेन्सी असोसिएशन संभच्या अध्यक्षते खालीं फ्रामजी कावसजी हालमध्यें सोमवार ता० १९ जुलै रोजीं एक सभा भरली होती. या सभेस मुंबईतील सर्व वर्गाचे प्रसिद्ध प्रसिद्ध लोक हजर हेते. या सभेंत, मि० सुब्रमण अय्यर, हिंदुपत्राचे संपादक, यांनीं वेल्बी कमिशनर समोर झालेल्या साक्षी संबंधीं आपलें मत काय आहे व या कमिशन पासून आपल्याला काय फायदा होण्याचा संभव आहे हें सांगितलें.

कमिशनपुढें चौकशी करितां पुढील तीन मुद्दे होते: (१) खर्चाची व्यवस्था (२) खर्चाची वाढ आणि (३) आणि हिंदुस्थान व इंग्लंड या उभय देशांत खर्चाची वाटणी. हिंदुस्थानांत खर्चाची वाढ कशी वाढत गेली या संबंधीं साक्षीदारांनीं पुरावा दाखल करून खर्च कमी करण्या करितां काय व्यवस्था केली पाहिजे याबद्दल त्यांनीं कमिशनास उपाय सुचविले. बाकीच्या दोन मुद्या संबंधी विस्तृत रीतीनें या साक्षीदारास कांहीं सांगतां आलें नाहीं. कमिशन पुढें साक्ष चालूं असतांना इंडिया आफिसांतील सरकारी कामदारांनीं साक्षीदारांच्या बोलण्यांत विसंगतता व्हावी ह्मणून फार प्रयत्न केला. आणि जबानींत झालेल्या बारिक सारिक चुका काढून साक्षीचें महत्व होईल तितकें कमी करण्यास त्यांनीं जीवापाड मेहनत केली. कमिशनपुढें झालेल्या साक्षीची हकीकत बातमीदारांनीं जी प्रसिद्ध केली ती यथ तथ्य नसून कांहीं कांहीं ठिकाणीं तर विलक्षण गोष्टी साक्षीदाराच्या तोंडीं घातल्या आहेत. हिंदुस्थानांतलि खर्चावर नजर ठेवण्या करितां एक पार्लमेंटरी कमेटी नेमावी अशी सूचना साक्षीदारांनीं केली होती पण ही सूचना कमिशनास मुळींच पसंत पडली नाहीं. आणि ह्या सूचनेची जितकी पंची करितां येईल तितकी करण्याचा यत्न झाला. लंडन येथील रिपोर्टर लोकांनीं मि० सुब्रह्मण याची जबानी प्रसिद्ध केली आहे तींत अयर मजकूर यांच्या तोंडी असें एक वाक्य घातलें आहे कीं हिंदुस्थानांत जो हल्लीं दुष्काळ पडला आहे त्याचें कारण तेथील रेलवे होय! रिपोर्टर लोकांनीं प्रसिद्ध केलेल्या जबानींत अशा तऱ्हेच्या पुष्कळ चमत्कारिक गोष्टी गोंविल्या आहेत तेथील लोकांकडून या साक्षीदारांस वास्तविक पाहतां होईल तितकी मदत झाली पाहिजे होती परंतु तें सर्व एकीकडेच राहून उलट तेथील लोकांनीं नाना प्रकारचे अडथळे आणिले.

ह्या वेल्बी कमिशना पासून आपला कोणता फायदा होईल हें खात्रीने कांहीं सांगवत नाहीं. कमिशनमध्यें जे लोक सभासद निवडले ते चांगले हुशार आणि राजकीय कामांत कसलेले होते. चौकशी चालूं असतांना ह्या सभासदांच्या वर्तना वरून ते आपल्यास अनुकूल अथवा प्रतिकूल आहेत ह्याची कांहीं बरोबर अटकळ करितां येत नाहीं परंतु एकंदर प्रकारा वरून असें वाटतें कीं ते आपणास विशेष अनुकूल नसावेत. या कमिशनचे अक्ष्यक्ष लार्ड वेल्बी साहेब हे एक सन्माननीय गृहस्थ आहेत आणि त्यांनीं सरकारी मोठमोठ्या हुद्यांचीं कामें केलीं आहेत; पण या मुळेंच त्यांच्या मनास अनुदारता आणि एककलीपणा आलेला आहे. चौकशी करितां ह्मणून कामिशनपुढें जे विषय आले त्यांजकडे सरकारी दृष्टीनें न पाहतां हिंदुस्थानांतलि लोकमतांच्या दृष्टीनें त्यांचा विचार करण्याबद्दल, कमिशन पुढें आलेल्या साक्षीदारांनीं सांगितलें; परंतु ती गोष्ट त्यांच्या लक्षांत मुळींच भरेना.

हिंदुस्थान तर्फे साक्षीदारांनीं जे उपाय आणि ज्या गोष्टी सुचविल्या आहेत त्यांचा कांहीं उपयोग होईल अथवा त्यांज बद्दल विचार केला जाईल असा कांहीं रंग दिसत नाहीं. हिंदुस्थान सरकार आणि विलायत सरकार या उभयतामध्यें एखाद्या गोष्टी संबंधीं लढा पडला असतां तिचा निकाल करण्यास्तव एक वेगळें मंडळ नेमलें जावें ही सूचना सर्व सभासदास मान्य झाली. तसेंच लष्करी खर्च कमी करण्याची जनरल ब्याकनबरी यांनीं जी दिशा दाखविली त्या दिशेनें लष्करी खर्च कांहीं कमी केला जाईल असें वाटतें. प्राव्हिन्सिअल खर्चासंबंधीं साक्षीदारांनीं ज्या सूचना केल्या त्याज बद्दल ही कांहीं विचार केला जाईल असें वाटतें. तरी एकंदर पाहतां, या कमिशन पासून कांहीं विशेष निष्पन्न होणार नाहीं.

हिंदुस्थान तर्फेच्या साक्षीदारांस इंग्लंदांत जाण्याचा आनायासें प्रसंग आल्यामुळें तेथील लोकांस इकडील माहिती देण्याकरितां सभा भरवून ठिकठिकाणीं भाषणें करण्याचा प्रयत्न त्यांनीं केला पण त्यास यावें तसें यश आलें नाहीं. या सभेस जितके लोक जमावयास पाहिजेत तितके जमत नात. इंग्लंश लोक मोठे सभ्य आहेत. ह्या साक्षीदारांचीं भाषणें आपल्यास फार आवडलीं असें ते नेहमीं ह्मणत आणि पुन्हा एकदा येऊन भाषण करण्याविषयीं या साक्षीदारांस ते विनंती करीत. पण ह्या त्यांच्या आश्वसनाची किंमत निव्वळ शिष्टाचारा पलीकडे कांहीं ज्यास्त समजावयास नको. इंग्लिश लोक मोठे उद्योगी आहेत. सर्व दिवसभर ते आपआपल्या उद्योगांत मग्न असतात आणि त्यांचे दिवसाचें काम आटोपल्या बरोबर बाकीचा वेळ चैनींत खर्च करितात; आणि हिंदुस्थानच्या गोष्टीकडे लक्ष देण्यास त्यांना यामुळें मुळींच वेळ सांपडत नाहीं. एवढ्या करितां हिंदुस्थनची स्थिति सुधारण्याचा प्रयत्न करणें तो आपला आपणासच केला पाहिजे. इंग्लंदांतील लोकमत आपल्यास अनुकूल करून घेण्याऱ्या प्रयत्नांत यश येणार नाहीं. आपणास जो यत्न करणें असेल तो आपल्याच देशांतील लोकमत जागृत करण्याकडे केला पाहिजे, येथील सरकारी अधिकाऱ्यांशीं मिळून राहिलें पाहिजे, आणि जसा होईल तसा आपला फायदा करून घेतला पाहिजे.

इंग्लंडांत जीं वर्तमानपत्रें आहेत, मग तीं लिबरल पक्षाचीं असोत अथवा कान्सर्व्हेटिव पक्षाचीं असोत, तीं हिंदुस्थानच्या बात्तमीत मुळींच लक्ष देत नाहींत. या साक्षीदारांनीं एका सभेंत हिंदुस्थान विषयीं ज्या गोष्टी सांगितल्या त्या विरुद्ध सर जार्ज हॅमिल्टन, स्टेट सेक्रेटरी साहेब, यांनीं एक आपापल्या सहीनें पत्र प्रसिद्ध केलें होतें. सदरहू पत्रास उत्तर ह्मणून या साक्षीदारांनीं एक पत्र लिहून त्याच्या नकला तेथील सर्व वर्तमानपत्रांस पाठविल्या त्या पैकीं एकानेंही हें पत्र छापिलें नाहीं. हिंदुस्थानास विरुद्ध असलेलीं दुसरीं कित्येक पत्रें त्यांनीं प्रसिद्ध केलीं पण ह्या साक्षीदारांचें हें पत्र छापण्यास मात्र त्यांस जागा देतां आली नाहीं! तेव्हां ब्रिटिश लोकमत तयार करण्याच्या कामीं ह्या पत्रकारांचाही आपणास कांहीं उपयोग होणार नाहीं. आपल्या देशांतील लोकमत चांगलें जागतें केलें पाहिजे आणि याला उत्तम साधन आपली राष्ट्रीय सभा होय. ह्या सभेच्या साह्यानें आपण हा यत्न केला पाहिजे आणि आपल्यांतील प्रत्येक शिक्षित माणसानें देशसेवेला हात भार लाविला पाहिजे.

---

इंडिया सरकारला दोन कार्यासाठीं मुरुपत्यें करून कर्ज काढावें लागतें. पहिली गोष्ट रेलवेची होय. दुसरी बाब राज्य कारभाराच्या खर्चाची असते. रेलवेचा विस्तार फार मोठा होत आहे आणि त्यासाठीं कोट्यावधी रुपयांचें भांडवल उभा रहलेलें आहे. अलीकडे राज्यकारभाराचा खर्च फार वाढल्यामुळें उत्पन्नाचा फडशा उडतो आणि पुष्कळ कर्जही काढावें लागतें रेलवेसाठीं ३० कोट रुपये भांडवल एकंदर कर्जाऊ काढण्याचा विचार सरकारचा असल्याविषयीं सर जेम्स वेस्टलांड गेल्या

बजेटाच्या वेळीं सांगत होते. या भांडवल पैकीं कांहीं इंडियांत उभारण्याचें असून बाकीचें विलायतेंत उभारण्यांत येणार आहे. सध्यां चार कोट रुपये राज्यकारभाराच्या खर्चा निमित्त सरकार कर्ज काढीत आहे आणि एवढ्या कर्जानें स्टेट सेक्रेटरीची गरज भागेल असा सुमार दिसत नाहीं. सन १८९५-९६ सालांत सर्व देशाचें कर्ज २१० कोट रुपये होते आणि हें चालू शतकाच्या अखेर वर्षीं ३०० कोटी पर्यंत वाढेल असा रंग दिसतो या देशाचें कर्ज सालोसाल वाढत आहे आणि निःवळ व्याजाच्या रुपानें ७५ लक्ष पौंड दरसाल भरावे लागतात. ही व्याजाची रक्कम कमी होण्याचा संभवच नाहीं. कर्जाच्या फेडी साठीं बजेटांत काहींच योजना नसते. दर वर्षीं निरनिराळीं कर्जें काढतात. कर्जाचि वाढ ह्मणजे व्याजाची ही वाढ होय. या वरून असें दिसतें कीं सरकारच्या मतें उत्पन्नाचा मोठा भाग व्याजाच्या पायीं खर्च व्हावा आणि ही गोष्ट उत्तरोत्तर कायमची चालू राहावी. ज्या अर्थीं सरकारनें काढलेलें कर्जा पैकीं बहुतेक भांडवल इंग्लंडांत उभारलें असतें त्या अर्थीं परकी भांडवलवाल्यास मोटमोठ्या रक्कमा द्याव्या लागतात आणि या पैशाच्या द्वारानें आमच्या देशाच्या संपत्तीला ओहटीच लागली आहे.

---

गेल्या गुरुवारीं लार्ड हामिल्टन स्टेट सेक्रेटरी यांनीं हिंदुस्थानच्या जमाखर्चाचा खर्डा कामन्स सभेपुढें मांडला त्या वेळीं त्यांनीं जें संभाषण केलें तें मनाला उद्विग्न करण्या सारखें आहे असें तारेतून कळलेल्या त्रोटक माहिती वरून वाटतें. लार्ड हामिल्टन बोलले कीं:- दुष्काळ व प्लेग यांच्या मुळें इंडियन सरकाराला ८० लक्ष पौंडाची नुकसानी लागली. या वर्षीं दुष्काळ, रेल्वेचा विस्तार, आणि मालकंडच्या सरहद्दीवरील मोहिम यांनीं खर्च फार वाढले आहेत; पण हुंडणावळीचा भाव वाढल्या मुळें व पिकपाण्याच्या सुबत्तेमुळें उत्पन्नांतही वाढवा दिसून येईल आणि उत्पन्नाची भावी वाढ निदर्शनास येईल तर वर्षाच्या प्रारंभीं जी एकंदर तूट पडेल ह्मणून अंदाज केला होता तिच्या पक्षां अधीक तूट पडूं नये. आनंदाची गोष्ट कीं अफूचें उत्पन्न हळूं हळूं कमी कमी होत आहे. लार्ड हामिल्टन यांनीं इंडियन लष्कराच्या सुस्थितीबद्दल व लढवय्येपणाबद्दल तारीफ केली; आणि इच्छा प्रदर्शित केली कीं हिंदुस्थान सरकार सरहद्दीवरील लोकांच्या लुटारूपणाच्या संवयी लवकरच मोडून टाकील, आणि त्यांची सांपत्तिक स्थिती सुधारावी ह्मणून चित्रळकडे नवीन रस्ते काढतील. इंडियांतील उद्योगधंदे बहुगुणित करण्याकडे सरकारची विशेष व्यवस्था होती; आणि उद्योगधंद्याच्या बाहुल्यामुळें लोकांचें उदारपोषण पाऊसपाण्यावर कमी अवलंबून राहूं लागलें. सार्वजनिक कार्यां कडील खर्च सर्वत्र काळव्याकडे न करितां रेल्वे बांधण्या कडे मोठी रक्कम खर्चण्यांत आली. व्हाईसराय लॉर्ड एलगिन यांच्या पुढें पुष्कळ संकटें दत्त ह्मणून उभीं होतीं परंतु तीं सर्व त्यांनीं शहाणपणानें, मोठ्या धैर्यानें व अत्रुटित दक्षतेनें दूर केलीं आणि त्यांच्या या कामांत स्थानिक सरकार, लष्करी खातें व सिव्हील सरव्हंट यांनीं मोठी मदत दिली.

इंडियन बजेट कामन्सपुढें मांडल्या नंतर मि. म्याकनेल यांनीं उपसूचना आणिली कीं इंडियन वर्तमानपत्रांच्या स्वतंत्रतेवर आणिलेली गदा आणि चौकशी शिवाय ब्रिटिश प्रजेला दिलेला तुरुंगवास हीं दोन्हीं अमान्य आहेत आणि इंडियांतील ब्रिटिश प्रजेला ब्रिटिश राज्यव्यवस्थेचे सर्व हक्क व सत्ता हीं देण्यांत यावीं.

या उपसूचनेवर उत्तर देतांना लार्ड हामिल्टन यांनीं विलक्षण विधानें केलीं. ते ह्मणाले कीं इंडियन सरकारची तुलना ब्रिटिश सरकाराशी करणें मोठ्या अन्यायाचें आहे. राजिक हेतू साधण्यासाठीं बुद्धिपुरस्सर खून केले जात आहेत. ज्या नेटिव लोकास कैद करण्यांत आलें आहे त्यांचा दुर्लौकिक डंक्यावर आहे आणि त्यांस कैद केल्यामुळें त्या भयंकर बंडाव्याचा मागमूस निःसंशय अधिकारीवर्गास लागेल. र्‍यांड साहेबांचा खून करण्यांत आला त्याला कारण असें कीं ते श्रीमान व गरीब यांच्यामध्यें कांहींच अंतर समजत नव्हते.

लार्ड हामिल्टन यांच्या सुवार्णींतून असे तेजस्वी तारे पडले तेव्हां त्यांचा अधिकार, वजनदारी, व मतमहात्म्या यांनीं त्या उपसूचनेच्या चिंध्या उडवून दिल्या. ९७ मतें प्रातिकूळ व १७ अनुकूल अशीं असल्यामुळें उपसूचना रद्द झाली.

---

लार्ड हामिल्टन यांचे उद्गार फार महत्वाचे आहेत. हे चालूं राजनीतीचे मार्गदर्शक सचित्र खांब आहेत. इंडियाच्या वातावरणांत काय काय चमत्कार होत आहेत याची कल्पना वरील उद्गारावरून चांगली होते. नामदार टिळक, सरदार नातू इत्यादिकांस कैद केलें, त्यांच्या पैकीं कांहींजणावर फौजदारी प्रकरण चालूं केलीं, राजद्रोहाच्या पातकाचा आरोप चौकशी पूर्वींच शाबित समजून उभयतां सरदार नातूंस तुरुंगवासांत टाकिलें, इत्यादि गोष्टी बद्दल मुंबई सरकारच एकटे दोषी नाहीं. स्टेट सेक्रेटरी पासून तों तहत खालच्या कनिष्ठ अधिकाऱ्या पर्यंत एकच विद्युत्संदेश खेळत आहे आणि त्याच्या मुळेंच नाना रंग व नाना प्रकार अदृष्टपूर्व असे अनुभवास येत आहेत. लेफटेनंट एअर्स्ट व मि. र्‍यांड यांचे खूनांस राजकीय स्वरूप कांहींच नाहीं तथापि आमच्या राज्यकर्त्यांनीं इंडियाचें चित्र राजद्रोहाच्या रंगांनीं नगा पुढें मांडलें आहे. खरा राजद्रोह कोठेंच नाहीं. पण राज्यकर्त्यांस राजद्रोहाचें वेड लागलें आहे. एखाद्या गोष्टीचा छंद किंवा नाद लागला ह्मणजे आपले विचार व कृती त्या विशिष्ट गोष्टी मध्यें तल्लीन होतात आणि जर त्या छंदाच्या परिणामीं वेड लागलें तर तद्विषयक गोष्ट सर्व सृष्टी व्यापून टाकते. तद्वत् आमच्या राज्यकर्त्यांस प्रजेच्या राजद्रोहाचें वेड लागलें आहे; आणि त्यां मुळें सर्व गोष्टी विपरीत दिसत आहेत. पुण्याच्या खूनांचा तपास करण्याचा श्रीगणेशायनमः जर मोठमोठ्या प्रतिष्ठित, लोकाग्रणी, व मुत्सद्दी लोकांस कैद करण्यामध्यें केला तर त्या तपासाला कितपत यश येईल हें भाकित करणें अगदी सोंपे आहे. इंडियन राज्याला जर दुष्ट ग्रह कोणी असतील तर सांप्रतचा वरिष्ठ अधिकारीवर्ग होय. त्यांच्या कृतीनें इंग्रजी राज्याचे खंबीर व मजबूत धीरावे तोडून टाकले जात आहेत. इंग्रजी राज्याची किंमत व योग्यता जाणणाऱ्या श्रेष्ठ नेटिवभर राजद्रोहाचा दारूगोळा सोडल्यानें प्रजेची हानी सरकारच्या हानी प्रमाणेंच सारखी आहे. इंडियन प्रजेविषयीं असा गैरसमज व्हावा हें मोठें दुर्भाग्य होय. लार्ड हामिल्टन यांच्या उद्गारा वरून वर्तमान काला पेक्षां भविष्यकाल मोठा संकटमय दिसतो. प्रस्तुत अनेक अनर्थावह गोष्टी आमच्याकडे डोकावून पाहत आहेत. वर्तमानपत्रावर गदा येऊन बसलीच आहे, मुंबईच्या हायकोर्टापुढें राजद्रोहाची प्रेरणा करणारे लेख लिहिल्याबद्दल नामदार टिळक आदिकरून मंडळीवर खटले चालणार आहेत, सरदार नातू तुरुंगांत काल्पनिक राजद्रोहाचा झाडा देत आहेत या व अशा गोष्टी सरकारच्या अपसमजूतीचे परिणाम आहेत. या शिवाय दुष्काळ, प्लेग, धरणीकंप इत्यादि ईश्वरी अवकृपेच्या गोष्टी इंडियावर ओढवल्या आहेत. ही वेळ खरोखर क्रांतीची आहे. इंडियन प्रजा या समयीं राजनिष्ठेच्या कसाला लाविली जाईल. आह्मी निश्चयानें सांगतो कीं इंडियनांच्या राजभक्तीचा विजय होईल, सरकारचीं अपकृत्यें सरकारच्या डोळ्यांत अंजन घालतील, आणि सांप्रतची संकटवेला राज्यकर्ते व प्रजासमूह यांची एकाचित्तता परिणामीं करील. इंडियनावर परराष्ट्र राज्य करणार हें इतिहासच सांगतो. परराष्ट्रांमध्यें इंग्लंडसारखें उदारधी, सत्वगुणी, व वैभवशाली राष्ट्र दुसरें कोणतेंच नाहीं. परमेश्वरकृपेनें जर त्या राष्ट्राशीं इंडियाचा राजकर्तृत्वानें समीप संबंध जुळला आहे. हा संबंध राजनिष्ठा, प्रेमभाव, व कल्याणेच्छा यांनीं फार दृढ झाला आहे. या संबंधामुळें इंडियन व ब्रिटिश या उभय लोकांचा एकजीव होत चालला आहे. इंडियन प्रजा व ब्रिटिश प्रजा हे सारख्या तराजूत बसले आहेत. भूगोलदृष्ट्या असलेलें अंतर, धर्मदृष्ट्या झालेली भिन्नता, भाषाभेदानें दिसणारा निराळेपणा हीं पाश्चात्य राजकीय एकीकरणामुळें विलयास गेलीं आहेत आणि ब्रिटिश छत्रामुळें इंडियन राष्ट्र उदयास येत आहे तसेंच ब्रिटिश राज्य ही इंडिया मुळें वैभवशिखरावर चढलें आहे. हा इंग्रजी राजकीय संबंध इंडियनास व ब्रिटिश लोकांस सर्वबाजूंनीं परिपोषक आहे. उभयतांचें कल्याण एकाच गोष्टींत आहे तेव्हां प्रस्तुतचें राजद्रोहाचें बंड सरकारनें उभारलेलें आहे आणि त्यांत तथ्य कांहींच नाहीं असें आह्मी वारंवार नम्रपणानें कळवूं इच्छितों.

---

गेल्या सोमवारीं कूचबिहार येथें रात्रौ नऊ वाजतां धरणीकंपाचा मोठा अचका बसला. हें आंदोलन सरासरी अर्धा मिनिट पर्यंत चालूं होतें. हा अचका बसण्या पूर्वीं दोन दिवस असा भास होई कीं पृथ्वीच्या पोटांत कांहीं चलबिचल चालूं आहे. धरणीकंपाचा पुन्हा एक तासपरानें दुसरा धक्का बसला. बंगाल्याकडे या भूकंपानें मोठा प्रळयच मांडला आहे.

---

मालकंड सरहद्दीवर लढाई झाल्यानें चालूं आहे. रोजच्या तारा नवीन वार्ता आणितात, इंग्रजी फौजेनें त्या लोकांस जेरीस आणिलें असें दिसतें पण इंग्रजी फौजेचे लोक मरतात आणि शत्रू निरनिराळ्या टोळ्यांनीं छापा पुनःपुन्हा घालतात. सरहद्दी वरील लोक अस्वस्थ आहेत आणि त्यांच्या मध्यें शांतता स्थापिली व राज्यविस्तार आपोआप झाला तरी ही लढाई या दुष्काळाच्या समयीं फार छळकारक आहे. सरकार देणें फार वाढतें आहे, आणि लोकांस तर उत्तरोत्तर गरिबी येत आहे तेव्हां अशा स्थितींत लढाई नको होती पण हा विचार राज्यकर्त्य कोण व कसा करणार!

---

## जामीन घेतला

*गेल्या बुधवारीं नामदार बाळ गंगाधर टिळक यांस जामिनावर खुलें करण्या विषयीं नामदार न्यायमूर्ती बद्रुद्दीन तय्यबजी यांच्या कडे बॅरिस्टर डावर यांनीं अर्ज केला. वादविवाद मोठ्या कडाक्याचा झाला आणि शेवटीं न्यायाधीशांनीं २५।२५ हजार रुपयांचे दोन जामीन व ५० हजारांचा जातमुचलका घेऊन नामदार टिळक यांस बंधमुक्त केलें. आडव्होकेटजनरल मि. लांग यांनीं जामीन न देण्याविषयीं पराकाष्ठा केली. न्यायमूर्ती बद्रुद्दीन साहेब ह्मणाले कीं जामिनावर अपराध्यास खुलें करण्याविषयीं हुकुम देतांना अपराधाचें स्वरूप, त्याची शिक्षा, व त्याची शाबिती होण्याचा संभव या गोष्टीचा विचार केला पाहिजे; आणि तसेंच आरोपी चौकशीच्या वेळीं बिनचूक हजर होईल किंवा नाहीं, आणि कैदेंत ठेविल्यानें अरोपीस बरोबर बचावचा पुरावा कीरतां येईल किंवा नाहीं या दोन मुद्याचाही योग्य निर्णय केला पाहिजे. पिनल कोडचा १२४ ( अ ) खालील अपराध आणि खून, जबरी संभोग, खोटे दस्ताऐवज इत्यादिका संबंधाचें अपराध याच्या मध्यें मोठा फरक आहे. नैतिकदृष्टच्या दुसऱ्या वर्गाचे अपराध हीन व नीच प्रकारचे आहेत. राजद्रोहाचे लेखा विषयींचा अपराध निराळ्याच स्वरूपाचा आहे. न्यायाधीश व जूरी यांच्या मतांवर त्याची स्थापना अवलंबून आहे. जामिनकी संबंधाच्या इंग्रजी व इंडियन कायद्याच्या कसोटी लावून नंतर निर्णय नामदार बद्रुद्दीन यांनीं सांगितला. ज्या खटल्यांत सरकार फिर्यादी आहे त्यांत हायकोर्टाच्या नेटिव न्यायाधीशाचें मानसिक धैर्य, न्यायविवेचन, सत्यनिष्ठा इत्यादि पाहून सर्व जग आनंदानें माना डोलवील. नामदार टिळकांस जामिनावर सोडलें नसतें तरी हरकत नव्हती पण न्यायाधीशाचा निर्णय व त्याचीं खंडनमंडनात्मक कारणें हीं न्यायाधीशांच्या मानसिक धैर्यानें जगविश्रुत झालीं.

---

नामदार टिळक, राजश्री बाळ, केळकर वैगेरे गृहस्थांवर येत्या सप्टेंबर महिन्यांत हायकोर्ट सेशना समोर राजद्रोहाचे लेख लिहिल्या बद्दल खटले चालणार आहेत. सर्व राष्ट्राचे डोळे या खटल्याकडे लागले आहेत. या खटल्या मुळें राजद्रोहविषयक लेखा संबंधानें कायद्याच्या मर्यादा निर्णीत होतील. अराजनिष्ठेचे प्रवर्तक लेख कोणते याची परी-

क्षा कशी करावी या संबंधाची योग्य शहानिशा पुढील महिन्यांत होईल. ही विषाचीच परीक्षा आहे आणि या परीक्षेच्या निमित्तानें चांगल्या सद्गृहस्थांचे जीव ओलीस घेतलं आहेत. ईश्वर करो, आणि न्यायाचा विजय होऊन आमची नामदार टिळकादि राष्ट्रीय संतमडळी आह्मास सुदैवें लाभोत !

# The Berar Samachar

MONDAY AUGUST 9 1897

Excitement is very high in Indian circles. The latest arrests and prosecutions of the leading native gentlemen at Poona have caused more disaffection than the alleged seditious writings of the Native Press have done. The individual Government of Bombay is responsible for the aggravation of the people's inmost feelings. No body ever read sedition in the articles of the *Kesari* nor did one Indian dream of disaffection towards the British throne. The loyalty of the Indians is unshaken. There is a universal conviction that India will rise as a *British* nation alone All our hopes are centred in the benevolence of the British raj and there is no their quarter from which we can expect any good. The chapter of offences against the State ought to be a sealed text in the whole range and width of the Indian Empire. Granted that the articles complained of are seditious. A criminal prosecution is not the right mode to improve the tone of the Native Press. The present prosecution will succeed or fail on its own merits. But it savours more of persecution than of justice *in toto*. Because justice does not warrant such a harsh procedure to educate the Native Press on the whole. It is no dread of law that does any good but it is the inward impulse that ought to check sedition in the Indian Press. A bad day is come upon our leaders just after the Poona Tragedy. This event reflects a bad taste in the institution of the prosecutions at Bombay. We see no earthly connection between the sedition of the press and the Poona Tragedy The two facts have no bearing upon each other; and hence we request the Government to suppress these prosecutions before it is too late. The good name and prestige of the rulers are at stake and we hope that a drastic measure will be adopted to correct the mistakes of the past. A political aspect is attached to the present action but it is a sheer mistake due to distortion of facts.

"We want nothing more or less than justice for the Mahrattas. First let the guilt of the Marhattas be proved and then punish them. If it could not be proved that the Poona murders had been the work of the Mahrattas, and if there should be strong grounds for the suspicion that the hand that committed the murders was that of a European, then we say it would be the height of despotism and tyranny to punish the Mahrattas in any way. Already they have been subjected to such abuse and vilification as if they had been a nation of cut-throats. While a section of the English press, taking their cue from the Anglo-Indian press, have been demanding the head of Mr. Tilak on a charge as if he was a second Nanasahib. The *daily Mail* commenting upon Mr. Tilak's re-appointment to the Bombay Legislative Council, writes:— "What does Lord George Hamilton think of this move? The clemency of Lord Sandhurst of such a concession to such a scoundrel as this Brahmin Tilak can only still further encourage the agitators to believe in British funk." Now, suppose that it transpires hereafter, as is likely to be the case, that the Brahmin Tilak and his countrymen are no more guilty of the murder of Messrs. Rand and Ayerst than the writer in the *daily Mail* himself. What reparation would the writer then make to the trusted leader of the Marhattas of Poona, upon whom he has, in the plentitude of his ignorance, exhausted the vocabulary of abuse? Is it in accord with English notions of justice and fair-play to convict without trial—to condmn without evidence? As to murders, many people had thought that the Plague Regulations had some connection with them. But since then many thing have happened to divert suspicion to a different quarter, and in the face of the unexpected turn which the matter has taken, it would, we submit, be extremely unjust to abuse the Mahrattas. The writer is evidently ignorant of the fact that Mr. Tilak owes his seat on the Council to his own countrymen and not Lord Sandhurst.

We have commented upon the passages quoted above, because similar sentiments have been expressed in other papers. But when the truth comes to light then there is sure to be a reaction in favour of maligned Mahrattas. Government is determined to make the inquiry now going on a private one. Now there may be some obejetion to a public inquiry at the preliminary stage but it goes without saying that nothing short of a public inquiry will secure the confidence of the people. No hole and corner arrangement will satisfy the public now. They demand a full, through and sifting inquiry. Very likely, the matter will be hushed, and an indelible stain will stick to the Maharattas for all time to come. They may, therefore, well demand a public enquiry now that their national character is at stake.

And this bring us to the question of the Punitive Police—that crowning folly of a Governor who has leaped from one blunder into another. Why should a Punitive Police force be imposed upon the citizens of Poona when no disturbance is apprehended and when nothing has been proved against them? We believe the whole country will protest against this tyranncial act—this down right *zoolum* shall we say?—*Hindu Patriot.*

## वऱ्हाड

हवामान— पाऊस वारंवार पडल्यानें पीकें चांगलीं जोमांत आहेत. एकंदर पाऊस १२ इंचावर झाला. हवा बरी आहे पण पटकीचा उपद्रव चालू आहे. दुष्काळाचा जोर कमी आहे तथापि लोकांच हाल अद्याप कमी नाहींत.

मेसर्स सैफुद्दीनखान व बुकन जिल्हा फारेस्ट आफिसर यांच्या बदल्यामुळें बुलढाणा मुनसीपालिटींत रा. रा. नारायण राघवेंद्र व मि. डेव्हीस यांस मुनसिपल सभासद नेमण्यांत आलें.

मि. डब्ल्यू. जी. जे. पीक एक्स्ट्रा असि. कानसरव्हेटर यांची बदली इलिचपुराहून बुलढाण्यास झाली.

मि. बुकन यांस उमरावतीस व मि. श्रीनिवासलु नायडू यांस वणीस जिल्हा फारेस्ट आफिसरचे जागीं बदललें.

मि. मनसुखराय एक्स्ट्रा असि. कानसरव्हेटर यांस दोन महिने व २७ दिवस या मुदतीची हक्काची रजा मिळाली आहे.

रा. रा. रामरराव गोपाळ देशपांडे, अडगांव यांस आकोट तालुका बोर्डांत सभासद नेमण्यांत आलें.

मि. महमद रहिमतुल्ला तहशिलदार वर्ग ४, मलकापूर यांस गेल्या २ रे तारखे पासून तीन महिन्यांची हकाची रजा देण्यांत आली. आणि त्यांच्या रजेंत मि. शेख मुनीर नायब तहशीलदार हे तहशिलदारीचें काम पाहतील.

रा. रा. लक्ष्मण गोपाळ देशपांडे यांस तहशिलदारीवर कायम केल्यामुळें खालील वर्गावर्गी झाली:—

| मि. | नायब तहशिलदार वर्ग |
|---|---|
| शेखमुनीर | १ ला. |
| दत्तात्रय अंबादास | २ रा. |

येथील एक्झीक्युटिव्ह इंजिनिअर मि. मि. विनरटन यांस वर्ग १ ची बढती गेल्या मार्चचे २३ वे तारखे पासून देण्यांत आली.

गेल्या मे महिन्यांत वऱ्हाड प्रांतांत ९६२९ मुलें जन्मलीं व ११११९ माणसें मरण पावलीं.

## आकोला बाजारभाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ९२॥ रुपये |
| जवारी | १३६ रु० |
| गहूं ( कांठे ) | १४० रु० |
| ,, ( बनशी ) | १६० रु० |
| चणे | १२७ रु० |
| तेल | ६॥ रु० मण |
| तूप | ९॥ मण |
| सोनें | २९ तोळ |
| चांदी | ८३ |

### नोटीस

रा. रा. भिवराज सुरजमल या नावाची दुकान मालक वारसपुत्र काळुराम व जगुराम मारवाडी दुकान अकोले जैगोपाल उपरी यासी खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचे दुकानाकडेस आमची बाकी २७६७॥–॥ व्याज मुदलसुद्धां अजमासे निघेत. सदर्हू रुपयाची तुह्मास समक्ष मागणी केली असतां तुह्मी बतुलाची तक्रार सांगतां व बाकीची रकम जी तुह्मी देणे कबूल करितां ती आह्मी घेऊन पूर्ण पावती द्यावी असें तुह्मी ह्मणत अहात ही गोष्ट आह्मास कबूल नाहीं सबब आह्मास फिर्याद करणें भाग पडत आहे परंतु तुह्मी जी रकम आमचें देणें कबूल करीत आहात त्याजबद्दल फिर्याद करून विनाकारण कोर्टखर्च व इतर खर्च वाढवावा अशी आमची इच्छा नाहीं वरून ही नोटीस तुह्मास दिली आहे. तरी तुह्मी या नोटीसीचे तारखे पासून जितकी रकम तुमचे हिशोबानें तुह्मी आह्मास देणें आहांत ती रकम ही नोटीस पोहचल्या पासून आठ दिवसांचें आंत आह्मास देऊन तितक्या पुरती आमची पावती घ्यावी अगर तुह्मास तेंच करणे बरें वाटत नसल्यास ती रकम अकोले येथें दुकानदार सेट साहू सावतराम रामप्रसाद याचे दुकानी आमचे खाते जमा करून द्यावी ह्मणजे बाकीचे रकमे बद्दल आह्मास जी तजवीज करणे योग्य दिसेल ती करूं. वरील दोन्ही गोष्टी पैकीं कोणतीही गोष्ट आठ दिवसांचें आंत न केल्यास सर्व रकम वसूल करण्या बद्दल तुमच्यावर कोर्टांत फिर्याद आह्मास करावी लागेल व त्या बद्दल जो खर्च लागेल तो तुह्मास द्यावा लागेल. कळावे ही नोटीस दिली सही तारीख ६ माहे आगष्ट सन १८९७ इसवी.

सही

विठ्ठल रंगराव, शंकर रंगराव, शामराव रंगराव हे अज्ञान पालन करणार मातोश्री कृष्णाबाई जवजे रंगराव जहागीरदार बाभुळगांव तर्फे मुखत्यार नरहर खंडेराव राहणार आकोला

### नोटीस

मेहरबान अबदूल हुसेन अलाबक्ष शेट साहू बोहरी दुकान अकोला याम सलाम खालीं सही करणार यानकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्माकडेस आमचे दुकानचें घेणें निघत असून त्याजबद्दल तुह्मास पुष्कळ वेळां मागणी केली असतां तुह्मी हिशोबही देत नाहीं व बह्या येथें नाहींत बाहेर गांवीं गेल्या असें सांगून हिशोब करण्याबदल टाळाटाळी करितां यावरून तुमचे मनांत आह्मास आमची हिशोबही करणें नाहीं. व रकम देणेंही नाहीं असें आह्मास वाटतें करितां तुह्मास ही नोटीस दिली आहे तर या नोटीशीचे तारखेपासून आठ दिवसाचे आंत आह्माकडेस येऊन आमचे रकमेची तडजोड करणें असें न केल्यास तुह्मावर रीतिप्रमाणें फिर्याद करावी लागेल व तसें झालें ह्मणजे तुह्मास विनाकारण कोर्ट खर्च सोसावा लागेल. कळावें. ही नोटीस लिहिली सही तारीख ६ माहे आगस्ट सन १८९७ इसवी.

सही

विठलराव, शंकरराव, शामराव हे अज्ञान पालन करणार मातोश्री कृष्णाबाई जवजे रंगराव जाहगिरदार बाभूळगांव तर्फे मु. नरहर खंडेराव राहणार अकोलें.

## वर्तमानसार

दुःख वाटतें कीं रा. अंताजी गोविंद केसकर वकील यांस गेल्या रविवारीं सकाळीं उमरावती येथें देवाज्ञा झाली. गेल्या पांच सहा महिन्या पासून प्रकृति बिघडली होती.

आह्मास लिहिण्यास मोठें दुःख वाटतें कीं रा. रा. वासुदेवराव हरीहर पंडीत उर्फ बाबा महाराज, दाक्षिण सरदार वर्ग १ ला यांस हवेच्या उपद्रवामुळें गेल्या शनिवारीं दोनप्रहरीं देवाज्ञा झाली. मरण समयीं वय ३० वर्षांचें होतें. अशा तरुण सरदारावर मृत्यूचा घाला पडला ही त्यांच्या कुटुंम्बीय माणसावर ईश्वरी अवकृपाच होय. यांचीच ज्येष्ठ कन्या रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांच्या मुलाला दिली आहे.

'केसरी' चे प्रकाशक रा. रा. हरी नारायण गोखले हे गेल्या शनिवारी चीफ प्रेसिडन्सी माजिस्ट्रेटच्या कोर्टांत स्वतां हजर झाले परंतु त्यांच्यावर खटला नसल्यामुळें त्यांस सोडून दिलें.

किरकोळ अंकास ........................८४
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........८१ ०६
दुसरे खेपेस .... .......८१

Six monthly........ 3 ............... 8
Single copy ................................ 4
Advertisement }
Below 10 lines ...... 2 R
Per line over 10 ...... 4 as
Repetition Per line ... 3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXI | AKOLA MONDAY 9 AUGUST 1897 | NO 31
वर्ष ३१ | आकोला सोमवार तारीख ९ माहे आगस्ट सन १८९७ इ० | अंक ३१

## जाहिरात

आह्मास आमच्या जुन्या रुळा प्रमाणें इजारा असलेला गाव मौजे हिरडी प्रगणें डोंगरखेडे तालुके यवतमाळ जिल्हा वणी हा विकावयाचा आहे याचे क्षेत्रफळ ९०१ एकर २७ गुंठे आहे व आकार २३'०१२ आहे. हा गांव कोंठेंही गहाण वगैरे नसून यंदा निमे जमीन साऱ्यानें दिली आहे व घरचीं शेतेंही पेरून तयार आहेत. ह्मणून ही संधी घालवूं नये ज्याची घेण्याची इच्छा असेल त्यांनीं खालीं सही करणारास समक्ष भेटावें अगर पत्र पाठवावें ह्मणजे खुलासा होईल. तारीख २०।७।९७ इ.

सही
पृथ्वागीर हरीगीर यवतमाळ
दस्तुर खुद्द.

---

## नोटीस

मानोजी वल्लद इरभान पाटील पोहरे राहणार उरळ बुजरुक तालुके बाळापूर जिल्हा अकोलें यांस खालीं सही करणार यानकडून नोटीस देण्यांत येते कीं मयत मिलकी मर्दे गोविंदा घागर इनें मौजे उरळ येथील तिचे मालकीचीं शेतें सर्वे नंबर २८ सालीम, सर्वे नंबर ३८ यांतील १/१२ वा हिस्सा, व सर्वे नंबर ५१ यतील १/१२ वा हिस्सा येणेंप्रमाणें तीन शेतें १३०६ तें १३१० फसली ५ सालांकरितां आह्मास बटाईनें वहीतीस देऊन त्याबद्दल योग्य दस्ताऐवज लिहून नोंदून घेतला आहे. व सदर्हू शेतें तिनें आमच्या ताब्यांत दिलीं होतीं. मिलकी मयत झाल्यावर तिचे वारस या नात्यानें आपण तिच्या जिनगीची व्यवस्था करण्याचें मनांत आणून आमचे ताब्यांतून सदर्हू शेतें तुह्मी करारांत ठरलेल्या मुदतीचे आंतच अन्यायानें बलात्कार करून हिसकून घेतलीं आहेत. हें तुमचें करणें फार गैर आहे, करितां आह्मी या नोटिशीनें तुह्मास स्पष्ट कळवितों कीं ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत सदर्हू शेतें आमच्या ताब्यांत द्यावीत व असें केल्याबद्दल आमची लेखी पावती घ्यावी. असें न केल्यास आह्मी आमचे कबुलायती प्रमाणें नकसान तुह्मापासून कोर्टमार्फत वसूल करून घेऊं. या नोटिशीचा खर्च तुह्मापासून घेऊं. कळावें ता० १।८।९६ इ०

सह्या
तुकाराम पिरथम वा॥ पोहरे राहणार
उरळ झुरळ हातची
निशाणी रेघ.
भावज्या वल्लद राघोजी पोहरे
राहणार उरळ झुरळ हातची
निशाणी रेघ.

वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण शुद्ध १२ शके १८१९

---

मुंबईच्या प्रेसिडेन्सी असोसिएशन सभेच्या अध्यक्षते खालीं फ्रामजी कावसजी हालमध्यें सोमवार ता० १९ जुलै रोजीं एक सभा भरली होती. या सभेस मुंबईतील सर्व वर्गांचे प्रसिद्ध प्रसिद्ध लोक हजर होते. या सभेत, मि० सुब्रमण्य अय्यर, हिंदुपत्राचे संपादक, यांनीं वेल्बी कमिशनर समोर झालेल्या साक्षी संबंधीं आपलें मत काय आहे व या कमिशन पासून आपल्याला काय फायदा होण्याचा संभव आहे हें सांगितलें.

कमिशनपुढें चौकशी करितां पुढील तीन मुद्दे होते: (१) खर्चाची व्यवस्था (२) खर्चाची वाढ आणि (३) आणि हिंदुस्थान व इंग्लंड या उभय देशांत खर्चाची वाटणी. हिंदुस्थानांत खर्चाची वाढ कशी वाढत गेली या संबंधीं साक्षीदारांनीं पुरावा दाखल करून खर्च कमी करण्या करितां काय व्यवस्था केली पाहिजे याबद्दल त्यांनीं कमिशनास उपाय सुचविले. बाकीच्या दोन मुद्या संबंधी विस्तृत रीतीनें या साक्षिदारास कांहीं सांगतां आलें नाहीं. कमिशन पुढें साक्ष चालू असतांना इंडिया आफिसांतील सरकारी कामदारांनीं साक्षीदारांच्या बोलण्यांत विसंगतता व्हावी ह्मणून फार प्रयत्न केला. आणि जबानींत झालेल्या बारिक सारिक चुका काढून साक्षीचें महत्व होईल तितकें कमी करण्यास त्यांनीं जीवापाड मेहनत केली. कमिशनपुढें झालेल्या साक्षीची हकीकत बातमीदारांनीं जी प्रसिद्ध केली ती यथ तथ्य नसून कांहीं कांहीं ठिकाणीं तर विलक्षण गोष्टी साक्षीदाराच्या तोंडीं घातल्या आहेत. हिंदुस्थानांतील खर्चावर नजर ठेवण्या करितां एक पार्लमेंटरी कमेटी नेमावी अशी सूचना साक्षीदारांनीं केली होती पण ही सूचना कमिशनास मुळींच पसंत पडली नाहीं. आणि ह्या सूचनेची जितकी पर्वा करितां येईल तितकी करण्याचा यत्न झाला. लंडन येथील रिपोर्टर लोकांनीं मि० सुब्रह्मण याची जबानी प्रसिद्ध केली आहे तींत अयर मजकूर यांच्या तोंडीं असें एक वाक्य घातलें आहे कीं हिंदुस्थानांत जो हल्लीं दुष्काळ पडला आहे त्याचें कारण तेथील रेलवे होय! रिपोर्टर लोकांनीं प्रसिद्ध केलेल्या जबानींत अशा तऱ्हेच्या पुष्कळ चमत्कारिक गोष्टी गोंविल्या आहेत तेथील लोकांकडून या साक्षीदारांस वास्तविक पाहतां होईल तितकी मदत झाली पाहिजे होती परंतु तें सर्व एकीकडेच राहून उलट तेथील लोकांनीं नाना प्रकारचे अडथळे आणिले.

ह्या वेल्बी कमिशना पासून आपला कोणता फायदा होईल हें खात्रीनें कांहीं सांगवत नाहीं. कमिशनमध्यें जे लोक सभासद निवडले ते चांगले हुशार आणि राजकीय कामांत कसलेले होते. चौकशी चालू असतांना ह्या सभासदांच्या वर्तना वरून ते आपल्यास अनुकूल अथवा प्रतिकूल आहेत ह्याचा कांहीं बरोबर अटकळ करितां येत नाहीं परंतु एकंदर प्रकारा वरून असें वाटतें कीं ते आपणास विशेष अनुकूल नसावेत. या कमिशनचे अध्यक्ष लार्ड वेल्बी साहेब हे एक सन्माननीय गृहस्थ आहेत आणि त्यांनीं सरकारी मोठमोठ्या हुद्यांचीं कामें केलीं आहेत; पण या मुळेंच त्यांच्या मनास अनुदारता आणि एकलकोंडीपणा आलेला आहे. चौकशी करितां ह्मणून कमिशनपुढें जे विषय आले त्यांजकडे सरकारी दृष्टीनें न पाहतां हिंदुस्थानांतील लोकमतांच्या दृष्टीनें त्यांचा विचार करण्याबद्दल, कमिशन पुढें आलेल्या साक्षीदारांनीं सांगितलें; परंतु ती गोष्ट त्यांच्या लक्षांत मुळींच भरेना.

हिंदुस्थान तर्फे साक्षीदारांनीं जे उपाय आणि ज्या गोष्टी सुचविल्या आहेत त्यांचा कांहीं उपयोग होईल अथवा त्यांज बद्दल विचार केला जाईल असा कांहीं रंग दिसत नाहीं. हिंदुस्थान सरकार आणि विलायत सरकार या उभयतांमध्यें एखाद्या गोष्टी संबंधीं लढा पडला असतां तिचा निकाल करण्यास्तव एक वेगळें मंडळ नेमलें जावें ही सूचना सर्व सभासदास मान्य झाली. तसेंच लष्करी खर्च कमी करण्याची जनरल ब्याकनबरी यांनीं जी दिशा दाखविली त्या दिशेनें लष्करी खर्च कांहीं कमी केला जाईल असें वाटतें. प्राव्हिन्सिअल खर्चासंबधीं साक्षीदारांनीं ज्या सूचना केल्या त्याज बद्दल ही कांहीं विचार केला जाईल असें वाटतें. तरी एकंदर पाहतां, या कमिशन पासून कांहीं विशेष निष्पन्न होणार नाहीं.

हिंदुस्थान तर्फेच्या साक्षीदारांस इंग्लंदांत जाण्याचा आनायासें प्रसंग आल्यामुळें तेथील लोकांस इकडील माहिती देण्याकरितां सभा भरवून ठिकठिकाणीं भाषणें करण्याचा प्रयत्न त्यांनीं केला पण त्यास यावें तसें यश आलें नाहीं. या सभेस जितके लोक जमावयास पाहिजेत तितके जमेनात. इंग्लिश लोक मोठे सभ्य आहेत. ह्या साक्षीदारांचीं भाषणें आपल्यास फार आवडलीं असें ते नेहमीं ह्मणत आणि पुन्हा एकदां येऊन भाषण करण्याविषयीं या साक्षीदारांस ते विनंती करीत. पण ह्या त्यांच्या आश्वसनाची किंमत निव्वळ शिष्टाचारा पलीकडे कांहीं ज्यास्त समजावयास नको. इंग्लिश लोक मोठे उद्योगी आहेत. सर्व दिवसभर ते आपआपल्या उद्योगांत मग्न असतात आणि त्यांचे दिवसाचें काम आटोपल्या बरोबर बाकीचा वेळ चैनींत खर्च करितात; आणि हिंदुस्थानच्या गोष्टीकडे लक्ष देण्यास त्यांना यामुळें मुळींच वेळ सांपडत नाहीं. एवढ्या करितां हिंदुस्थानची स्थिति सुधारण्याचा प्रयत्न करणें तो आपला आपणासच केला पाहिजे. इंग्लंदांतील लोकमत आपल्यास अनुकूल करून घेण्याच्या प्रयत्नांत यश येणार नाहीं. आपणास जो यत्न करणें असेल तो आपल्याच देशांतील लोकमत जागृत करण्याकडे केला पाहिजे, येथील सरकारी अधिकाऱ्याशीं मिळून राहिलें पाहिजे, आणि जसा होईल तसा आपला फायदा करून घेतला पाहिजे.

इंग्लंडांत जीं वर्तमानपत्रें आहेत, मग तीं लिबरल पक्षाचीं असोत अथवा कान्सरव्हेटिव पक्षाचीं असोत, तीं हिंदुस्थानच्या बाबतींत मुळींच लक्ष देत नाहींत. या साक्षीदारांनीं एका सभेंत हिंदुस्थान विषयीं ज्या गोष्टी सांगितल्या त्या विरुद्ध सर जार्ज हॅमिल्टन, स्टेट सेक्रेटरी साहेब, यांनीं एक आपापल्या सहीनें पत्र प्रसिद्ध केलें होतें. सदरहू पत्रास उत्तर ह्मणून या साक्षीदारांनीं एक पत्र लिहून त्याच्या नकला तेथील सर्व वर्तमानपत्रांस पाठविल्या त्या पैकीं एकानेंही हें पत्र छापिलें नाहीं. हिंदुस्थानास विरुद्ध असलेलीं दुसरीं कित्येक पत्रें त्यांनीं प्रसिद्ध केलीं पण ह्या साक्षीदारांचें हें पत्र छापण्यास मात्र त्यांस जागा देतां आली नाहीं! तेव्हां त्रिटिश लोकमत तयार करण्याच्या कामीं ह्या पत्रकारांचाही आपणास कांहीं उपयोग होणार नाहीं. आपल्या देशांतील लोकमत चांगलें जागतें केलें पाहिजे आणि याला उत्तम साधन आपली राष्ट्रीय सभा होय. ह्या सभेच्या साह्यानें आपण हा यत्न केला पाहिजे आणि आपल्यांतील प्रत्येक शिक्षित माणसानें देशसेवेला हात भार लाविला पाहिजे.

---

इंडिया सरकारला दोन कार्यासाठीं मुरुपत्तें करून कर्जे काढावें लागतें. पहिली गोष्ट रेलवेची होय. दुसरी बाब राज्य कारभाराच्या खर्चाची असते. रेलवेचा विस्तार फार मोठा होत आहे आणि त्या साठीं कोट्यावधी रुपयांचें भांडवल उभारलें आहे. अलीकडे राज्यकारभाराचा खर्च फार वाढल्यामुळें उत्पन्नाचा फडशा उडतो आणि पुष्कळ कर्जही काढावें लागतें रेलवेसाठीं ३० कोट रुपये भांडवल एकंदर कर्जाऊ काढण्याचा विचार सरकारचा असल्याविषयीं सर जेम्स वेस्टलांड गेल्या

बजेटाच्या वेळीं सांगत होते या भांडवल पैकीं कांहीं इंडियांत उभारण्याचे असून बाकीचें विलायतेंत उभारण्यांत येणार आहे. सध्यां चार कोट रुपये राज्यकारभाराच्या खर्चा निमित्त सरकार कर्ज काढीत आहे आणि एवढ्या कर्जानें स्टेट सेक्रेटरीची गरज भागेल असा सुमार दिसत नाहीं. सन १८९५-९६ सालांत सर्व देशाचे कर्ज २५० कोट रुपये होते आणि हें चालू शतकाच्या अखेर वर्षीं ३०० कोटी पर्यंत वाढेल असा रंग दिसतो या देशाचें कर्ज सालोसाल वाढत आहे आणि निव्वळ व्याजाच्या रुपानें ७५ लक्ष पौंड दरसाल भरावे लागतात. ही व्याजाची रक्कम कमी होण्याचा संभवच नाहीं. कर्जाच्या फेडी साठीं बजेटांत कांहींच योजना नसते. दर वर्षी निरनिराळीं कर्जें काढतात. कर्जाची वाढ ह्मणजे व्याजाची ही वाढ होय. या वरून असें दिसतें कीं सरकारच्या मतें उत्पन्नाचा मोठा भाग व्याजाच्या पायीं खर्च व्हावा आणि ही गोष्ट उत्तरोत्तर कायमची चालू राहावी. ज्या अर्थीं सरकारनें काढलेलें कर्जा पैकीं बहुतेक भांडवल इंग्लंडांत उभारलें असतें त्या अर्थीं परकी भांडवलवाल्यास मोठमोठ्या रक्कमा द्याव्या लागतात आणि या पैशाच्या द्वारानें आमच्या देशाच्या संपत्तीला ओहटीच लागली आहे.

---

गेल्या गुरुवारीं लार्ड हामिल्टन स्टेट सेक्रेटरी यांनीं हिंदुस्थानच्या जमाखर्चाचा खर्डा कामन्स सभेपुढें मांडला त्या वेळीं त्यांनीं जें संभाषण केलें तें मनाला उद्विग्न करण्या सारखें आहे असें तारेतून कळलेल्या त्रोटक माहिती वरून वाटतें. लार्ड हामिल्टन बोलले कीं:– दुष्काळ व प्लेग यांच्या मुळें इंडियन सरकाराला ८० लक्ष पौंडाची नुकसानी लागली. या वर्षीं दुष्काळ, रेल्वेचा विस्तार, आणि मालकंडच्या सरहद्दीवरील मोहिम यांनीं खर्च फार वाढले आहेत; पण हुंडणावळीचा भाव वाढल्या मुळें व पकिपाण्याच्या सुवत्तेमुळें उत्पन्नांतही वाढवा दिसून येईल आणि उत्पन्नाची भावी वाढ निदर्शनास येईल तर वर्षाच्या प्रारंभीं जी एकंदर तूट पडेल ह्मणून अंदाज केला होता तिच्या पक्षां अधीक तूट पडूं नये. आनंदाची गोष्ट कीं अफूचें उत्पन्न हळूं हळूं कमी कमी होत आहे. लार्ड हामिल्टन यांनीं इंडियन लष्कराच्या सुस्थितीबद्दल व लढवय्येपणाबद्दल तारीफ केली; आणि इच्छा प्रदर्शित केली कीं हिंदुस्थान सरकार सरहद्दीवरील लोकांच्या लुटारूपणाच्या संवयी लवकरच मोडून टाकील, आणि त्यांची सांपत्तिक स्थिती सुधारावी ह्मणून चित्रळकडे नवीन रस्ते काढतील. इंडियांतील उद्योगधंदे बहुगुणित करण्याकडे सरकारची विशेष व्यवस्था होती; आणि उद्योगधंद्याच्या बाहुल्यामुळें लोकांचें उदारपोषण पाऊसपाण्यावर कमी अवलंबून राहूं लागलें. सार्वजनिक कार्यां कडील खर्च सर्वत्र कालव्याकडे न करितां रेल्वे बांधण्या कडे मोठी रक्कम खर्चण्यांत आली. व्हाईसराय लॉर्ड एलजिन यांच्या पुढें पुष्कळ संकटें दत्त ह्मणून उभी होतीं परंतु तीं सर्व त्यांनीं शहाणपणानें, मोठ्या धैर्यानें व अत्रुटित यशस्वीपणानें दूर केली आणि त्यांच्या या कामांत स्थानिक सरकार, लष्करी खातें व सिव्हील सरव्हंट यांनीं मोठी मदत दिली.

इंडियन बजेट कामन्सपुढें मांडल्या नंतर मि. म्याकनेल यांनीं उपसूचना आणिली कीं इंडियन वर्तमानपत्रांच्या स्वतंत्रतेवर आणिलेली गदा आणि चौकशी शिवाय ब्रिटिश प्रजेला दिलेला तुरुंगवास हीं दोन्ही अमान्य आहेत आणि इंडियांतील ब्रिटिश प्रजेला ब्रिटिश राज्यव्यवस्थेचे सर्व हक्क व सत्ता हीं देण्यांत यावीं.

या उपसूचनेवर उत्तर देतांना लार्ड हामिल्टन यांनीं विलक्षण विधानें केलीं. ते ह्मणाले कीं इंडियन सरकारची तुलना ब्रिटिश सरकाराशीं करणें मोठ्या अन्यायाचें आहे. राजिक हेतू साधण्यासाठीं बुद्धिपुरस्सर खून केले जात आहेत. ज्या नेटिव लोकांस कैद करण्यांत आलें आहे त्यांचा दुर्लौकिक डंक्यावर आहे आणि त्यांस कैद केल्यामुळें त्या भयंकर बंडाव्याचा मागमूस निःसंशय अधिकारिवर्गास लागेल. ऱ्यांड साहेबांचा खून करण्यांत आला त्याला कारण असें कीं ते श्रीमान व गरीब यांच्यामध्यें कांहींच अंतर समजत नव्हते.

लार्ड हामिल्टन यांच्या सुवार्णीतून असे तेजस्वी तारे पडले तेव्हां त्यांचा अधिकार, वजनदारी, व मतमहात्म्या यांनीं त्या उपसूचनेच्या चिंध्या उडवून दिल्या. ९७ मतें प्रतिकूळ व १७ अनुकूल अशीं असल्यामुळें उपसूचना रद्द झाली.

---

लार्ड हामिल्टन यांचे उद्गार फार महत्वाचे आहेत. हे चालूं राजनीतीचे मार्गदर्शक सचित्र खांब आहेत. इंडियाच्या वातावरणांत काय काय चमत्कार होत आहेत याची कल्पना वरील उद्गारावरून चांगली होते. नामदार टिळक, सरदार नातू इत्यादिकांस कैद केलें, त्यांच्या पैकीं कांहींजणावर फौजदारी प्रकरण चालूं केलीं, राजद्रोहाच्या पातकाचा आरोप चौकशी पूर्वींच शाबित समजून उभयतां सरदार नातूंस तुरुंगवासांत टाकिलें, इत्यादि गोष्टी बद्दल मुंबई सरकारच एकटे दोषी नाहीं. स्टेट सेक्रेटरी पासून तों तहत खालच्या कनिष्ठ अधिकाऱ्या पर्यंत एकच विद्युत्संदेश खेळत आहें आणि त्याच्या मुळेंच नाना रंग व नाना प्रकार अदृष्टपूर्व असे अनुभवास येत आहेत. लेफटेनंट एअर्स्ट व मि. ऱ्यांड यांचे खूनांस राजकीय स्वरूप कांहींच नाहीं तथापि आमच्या राज्यकर्त्यांनीं इंडियाचें चित्र राजद्रोहाच्या रंगांनीं जगा पुढें मांडलें आहे. खरा राजद्रोह कोठेंच नाहीं. पण राज्यकर्त्यांस राजद्रोहाचें वेड लागलें आहे. एखाद्या गोष्टीचा छंद किंवा नाद लागला ह्मणजे आपले विचार व कृती त्या विशिष्ट गोष्टी मध्यें तल्लीन होतात आणि जर त्या छंदाच्या परिणामीं वेड लागलें तर तद्विषयक गोष्ट सर्व सृष्टी व्यापून टाकते. तद्वत् आमच्या राज्यकर्त्यांस प्रजेच्या राजद्रोहाचें वेड लागलें आहे; आणि त्या मुळें सर्व गोष्टी विपरीत दिसत आहेत. पुण्याच्या खूनांचा तपास करण्याचा श्रीगणेशायनमः जर मोठमोठ्या प्रतिष्ठित, लोकाग्रणी, व मुत्सद्दी लोकांस कैद करण्यामध्यें केला तर ह्या तपासाला कितपत यश येईल हें भाकित करणें अगदीं सोंप आहे. इंडियन राज्याला जर दुष्ट ग्रह कोणी असतील तर सांप्रतचा वरिष्ठ अधिकारिवर्ग होय. त्यांच्या कृतीनें इंग्रजी राज्याचे खंबीर व मजबूत धीरावे तोडून टाकले जात आहेत. इंग्रजी राज्याची किंमत व योग्यता जाणणाऱ्या श्रेष्ठ नेटिवभर राजद्रोहाचा दारूगोळा सोडल्यानें प्रजेची हानी सरकारच्या हानी प्रमाणेंच सारखी आहे. इंडियन प्रजेविषयीं असा गैरसमज व्हावा हें मोठें दुर्भाग्य होय. लार्ड हामिल्टन यांच्या उद्गारा वरून वर्तमान काला पेक्षां भविष्यकाल मोठा संकटमय दिसतो. प्रस्तुत अनेक अनर्थावह गोष्टी आमच्याकडे डोकावून पाहत आहेत. वर्तमानपत्रा.वर गदा येऊन बसलीच आहे, मुंबईच्या हायकोर्टापुढें राजद्रोहाची प्रेरणा करणारे लेख लिहिल्यांबद्दल नामदार टिळक आदिकरून मंडळीवर खटले चालणार आहेत, सरदार नातू तुरुंगांत काल्पनिक राजद्रोहाचा झाडा देत आहेत या व अशा गोष्टी सरकारच्या अपसमजूतीचे परिणाम आहेत. या शिवाय दुष्काळ, प्लेग, धरणीकंप इत्यादि ईश्वरी अवकृपेच्या गोष्टी इंडियावर ओढवल्या आहेत. ही वेळ खरोखर क्रांतीची आहे. इंडियन प्रजा या समयीं राजनिष्ठेच्या कसाला लाविली जाईल. आह्मी निश्चयानें सांगतो कीं इंडियनांच्या राजभक्तीचा विजय होईल, सरकारचीं अपकृत्यें सरकारच्या डोळ्यांत अंजन घालतील, आणि सांप्रतची संकटवेला राज्यकर्ते व प्रजासमूह यांची एकाचित्तता परिणामीं करील. इंडियनावर परराष्ट्र राज्य करणार हें इतिहासच सांगतो. परराष्ट्रांमध्यें इंग्लंडसारखें उदारधी, सत्वगुणी, व वैभवशाली राष्ट्र दुसरें कोणतेंच नाहीं. परमेश्वरकृपेनें जर त्या राष्ट्राशीं इंडियाचा राजकर्तृत्वानें समीप संबंध जुळला आहे. हा संबंध राजनिष्ठा, प्रेमभाव, व कल्याणेच्छा यांनीं फार दृढ झाला आहे. या संबंधामुळें इंडियन व ब्रिटिश या उभय लोकांचा एकजीव होत चालला आहे. इंडियन प्रजा व ब्रिटिश प्रजा हे सारख्या तराजूत बसले आहेत. भूगोलदृष्ट्या असलेलें अंतर, धर्मदृष्ट्या झालेली भिन्नता, भाषाभेदानें दिसणारा निराळेपणा हीं पाश्चात्य राजकीय एकीकरणामुळें विलयास गेलीं आहेत आणि ब्रिटिश छत्रामुळें इंडियन राष्ट्र उदयास येत आहे तसेंच ब्रिटिश राज्य ही इंडिया मुळें वैभवशिखरावर चढलें आहे. हा इंग्रजी राजकीय संबंध इंडियनांस व ब्रिटिश लोकांस सर्वबाजूंनीं परिपोषक आहे. उभयतांचें कल्याण एकाच गोष्टींत आहे तेव्हां प्रस्तुतचें राजद्रोहाचें बंड सरकारनें उभारलेलें आहे आणि त्यांत तथ्य कांहींच नाहीं असें आह्मी वारंवार नम्रपणानें कळवूं इच्छितों.

---

गेल्या सोमवारीं कूचबिहार येथें रात्रौ नऊ वाजतां धरणीकंपाचा मोठा अचका बसला. हें आंदोलन सरासरी अर्धा मिनिट पर्यंत चालूं होतें. हा अचका बसण्या पूर्वीं दोन दिवस असा भास होई कीं पृथ्वीच्या पोटांत कांहीं चलबिचल चालूं आहे. धरणीकंपाचा पुन्हा एक तासभरानें दुसरा धक्का बसला. बंगाल्याकडे या भूकंपानें मोठा प्रळयच मांडला आहे.

---

मालकंड सरहद्दीवर लढाई झपाट्यानें चालूं आहे. रोजच्या तारा नवीन वार्ता आणितात, इंग्रजी फौजेनें त्या लोकांस जेरीला आणिलें असें दिसतें पण इंग्रजी फौजेचे लोक मरतात आणि शत्रू निरनिराळ्या टोळ्यांनीं छापा पुनःपुन्हा घालतात. सरहद्दी वरील लोक अस्वस्थ आहेत आणि त्यांच्या मध्यें शांतता स्थापिली व राज्यविस्तार आपोआप झाला तरी ही लढाई या दुष्काळाच्या समयीं फार छळकारक आहे. सरकार देणें फार वाढतें आहे, आणि लोकांस तर उत्तरोत्तर गरिबी येत आहे तेव्हां अशा स्थितींत लढाई नको होती पण हा विचार राजमान्य कोण व कसा करणार!

---

## ✓जामीन घेतला

गेल्या बुधवारीं नामदार बाळ गंगाधर टिळक यांस जामिनावर खुलें करण्या विषयीं नामदार न्यायमूर्ती बद्रुद्दीन तय्यबजी यांच्याकडे बॅरिस्टर डावर यांनीं अर्ज केला. वादविवाद मोठ्या कडाक्याचा झाला आणि शेवटीं न्यायाधीशांनीं २५।२५ हजार रुपयांचे दोन जामीन व ५० हजारांचा जातमुचलका घेऊन नामदार टिळक यांस बंधमुक्त केलें. आडव्होकेटड मि. लांग यांनीं जामीन न देण्याविषयीं पराकाष्टा केली. न्यायमूर्ती बद्रुद्दीन साहेब ह्मणाले कीं जामिनावर अपराध्यास खुलें करण्याविषयीं हुकूम देतांना अपराधाचें स्वरूप, ह्याची शिक्षा, व त्याची शाश्वती होण्याचा संभव या गोष्टीचा विचार केला पाहिजे; आणि तसेंच आरोपी चौकशीच्या वेळीं बिनचूक हजर होईल किंवा नाहीं, आणि कैदेंत ठेविल्यानें आरोपीला बरोबर बचावचा पुरावा करितां येईल किंवा नाहीं या दोन मुद्याचाही योग्य निर्णय केला पाहिजे. पिनल कोडचा १२४ ( अ ) खालील अपराध आणि खून, जबरी संभोग, खोटे दस्ताऐवज इत्यादिका संबंधाचें अपराध यांच्या मध्यें मोठा फरक आहे. नैतिकदृष्टच्या दुसऱ्या वर्गाचे अपराध हीन व नीच प्रकारचे आहेत. राजद्रोहाचे लेखा विषयींचा अपराध निराळ्याच स्वरूपाचा आहे. न्यायाधीश व जूरी यांच्या मतांवर त्याची स्थापना अवलंबून आहे. जामिनकी संबंधाच्या इंग्रजी व इंडियन कायद्याच्या कसोटी लावून नंतर निर्णय नामदार बद्रुद्दीन यांनीं सांगितला. ज्या खटल्यांत सरकार फिर्यादी आहे त्यांत हायकोर्टाच्या नेटिव न्यायाधीशाचें मानसिक धैर्य, न्यायविवेचन, सत्यनिष्ठा इत्यादि पाहून सर्व जग आनंदानें माना डोलवील. नामदार टिळकांस जामिनावर सोडलें नसतें तरी हरकत नव्हती पण न्यायाधीशाचा निर्णय व त्याचीं खंडनमंडनात्मक कारणें हीं न्यायाधीशांच्या मानसिक धैर्यानें जगविश्रुत झालीं.

---

नामदार टिळक, राजश्री बाळ, केळकर वगैरे गृहस्थांवर येत्या सप्टेंबर महिन्यांत हायकोर्ट सेशनां समोर राजद्रोहाचे लेख लिहिल्या बद्दल खटले चालणार आहेत. सर्व राष्ट्राचे डोळे या खटल्याकडे लागले आहेत. या खटल्या मुळें राजद्रोहविषयक लेखा संबंधानें कायद्याच्या मर्यादा निर्णित होतील. अराजनिष्ठेचे प्रवर्तक लेख कोणते याची परी-

क्षा कशी करावी या संबंधाची योग्य शहानिशा पुढील महिन्यांत होईल. ही विषाचीच परीक्षा आहे आणि या परीक्षेच्या निमित्तानें चांगल्या सद्गृहस्थांचे जीव ओलीस घेतले आहेत. ईश्वर करो, आणि न्यायाचा विजय होऊन आमची नामदार टिळकादि राष्ट्रीय संतमंडळी आह्मास सुदैवें लाभोत !

## The Berar Samachar

MONDAY AUGUST
9 1897

Excitement is very high in Indian circles. The latest arrests and prosecutions of the leading native gentlemen at Poona have caused more disaffection than the alleged seditious writings of the Native Press have done. The individual Government of Bombay is responsible for the aggravation of the people's inmost feelings. No body ever read sedition in the articles of the *Kesari* nor did one Indian dream of disaffection towards the British throne. The loyalty of the Indians is unshaken. There is a universal conviction that India will rise as a *British* nation alone All our hopes are centred in the benevolence of the British raj and there is no their quarter from which we can expect any good. The chapter of offences against the State ought to be a sealed text in the whole range and width of the Indian Empire. Granted that the articles complained of are seditious. A criminal prosecution is not the right mode to improve the tone of the Native Press. The present prosecution will succeed or fail on its own merits. But it savours more of persecution than of justice *in toto*. Because justice does not warrant such a harsh procedure to educate the Native Press on the whole. It is no dread of law that does any good but it is the inward impulse that ought to check sedition in the Indian Press. A bad day is come upon our leaders just after the Poona Tragedy. This event reflects a bad taste in the institution of the prosecutions at Bombay. We see no earthly connection between the sedition of the press and the Poona Tragedy. The two facts have no bearing upon each other; and hence we request the Government to suppress these prosecutions before it is too late. The good name and prestige of the rulers are at stake and we hope that a drastic measure will be adopted to correct the mistakes of the past. A political aspect is attached to the present action but it is a sheer mistake due to distortion of facts.

"We want nothing more or less than justice for the Mahrattas. First let the guilt of the Marhattas be proved and then punish them. If it could not be proved that the Poona murders had been the work of the Mahrattas, and if there should be strong grounds for the suspicion that the hand that committed the murders was that of a European, then we say it would be the height of despotism and tyranny to punish the Mahratias in any way. Already they have been subjected to such abuse and vilification as if they had been a nation of cut-throats. While a section of the English press, taking their cue from the Anglo-Indian press, have been demanding the head of Mr. Tilak on a charge as if he was a second Nanasahib. The *daily Mail* commenting upon Mr. Tilak's re-appointment to the Bombay Legislative Council, writes:— "What does Lord George Hamilton think of this move? The clemency of Lord Sandhurst of such a concession to such a scoundrel as this Brahmin Tilak can only still further encourage the agitators to believe in British funk." Now, suppose that it transpires hereafter, as is likely to be the case, that the Brahmin Tilak and his countrymen are no more guilty of the murder of Messrs. Rand and Ayerst than the writer in the *daily Mail* himself. What reparation would the writer then make to the trusted leader of the Marhattas of Poona, upon whom he has, in the plenitude of his ignorance, exhausted the vocabulary of abuse? Is it in accord with English notions of justice and fair-play to convict (without trial—to condmn without evidence? As to murders, many people had thought that the Plague Regulations had some connection with them. But since then many thing have happened to divert suspicion to a different quarter, and in the face of the unexpected turn which the matter has taken, it would, we submit, be extremely unjust to abuse the Mahrattas. The writer is evidently ignorant of the fact that Mr. Tilak owes his seat on the Council to his own countrymen and not Lord Sandhurst.

We have commented upon the passages quoted above, because similar sentiments have been expressed in other papers. But when the truth comes to light then there is sure to be a reaction in favour of maligned Mahrattas. Government is determined to make the inquiry now going on a private one. Now there may be some objection to a public inquiry at the preliminary stage but it goes without saying that nothing short of a public inquiry will secure the confidence of the people. No hole and corner arrangement will satisfy the public now. They demand a full, through and sifting inquiry. Very likely, the matter will be hushed, and an indelible stain will stick to the Maharattas for all time to come. They may, therefore, well demand a public enquiry now that their national character is at stake.

And this bring us to the question of the Punitive Police—that crowning folly of a Governor who has leaped from one blunder into another. Why should a Punitive Police force be imposed upon the citizens of Poona when no disturbance is apprehended and when nothing has been proved against them? We believe the whole country will protest against this tyrannical act—this down right *zoolum* shall we say?—*Hindu Patriot.*

## वऱ्हाड

हवामान— पाऊस वारंवार पडल्यानें पीकें चांगलीं जोमांत आहेत. एकंदर पाऊस १२ इंचावर झाला. हवा बरी आहे पण पटकीचा उपद्रव चालू आहे. दुष्काळाचा जोर कमी आहे तथापि लोकांच हाल अद्याप कमी नाहींत.

मेसर्स सैफुदीनखान व बुकन जिल्हा फारेस्ट आफिसर यांच्या बदल्यामुळें बुलढाणा मुनसीपालिटींत रा. रा. नारायण राघवेंद्र व मि. डेव्हीस यांस मुनसिपल सभासद नेमण्यांत आलें.

मि. डब्ल्यू . जी. जे. पीक एक्स्ट्रा असि. कानसरव्हेटर यांची बदली इलिचपुराहून बुलढाण्यास झाली.

मि. बुकन यांस उमरावतीस व मि. श्रीनिवासलु नायडू यांस वणीस जिल्हा-फारेस्ट आफिसरचे जागीं बदललें.

मि. मनसुखराय एक्स्ट्रा असि. कानसरव्हेटर यांस दोन महिने व २७ दिवस या मुदतीची हक्काची रजा मिळाली आहे.

रा. रा. रामरराव गोपाळ देशपांडे, अडगांव यांस आकोट तालुका बोर्डात सभासद नेमण्यांत आलें.

मि. महमद रहिमतुल्ला तहशिलदार वर्ग ४, मलकापूर यांस गेल्या २ रे तारखे पासून तीन महिन्यांची हकाची रजा देण्यांत आली. आणि त्यांच्या रजेंत मि. शेख मुनीर नायब तहशीलदार हे तहशिलदारींचें काम पाहतील.

रा. रा. लक्ष्मण गोपाळ देशपांडे यांस तहशिलदारीवर कायम केल्यामुळें खालील वर्गावर्गी झाली:—

| मि. | नायब तहशिलदार वर्ग |
|---|---|
| शेखमुनीर | १ ला. |
| दत्तात्रय अंबादास | २ रा. |

येथील एक्झीक्युटिव्ह इंजिनिअर मि. मि. विनरटन यांस वर्ग १ ची बढती गेल्या मार्चचे २३ वे तारखे पासून देण्यांत आली.

गेल्या मे महिन्यांत वऱ्हाड प्रांतांत ९६२९ मुलें जन्मलीं व ११२२९ माणसें मरण पावलीं.

## आकोला बाजारभाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ९२॥ रुपये |
| जवारी | १३६ रु० |
| गहूं ( कांठे ) | १४० रु० |
| ,,( वनशी ) | १६० रु० |
| चणे | १२७ रु० |
| तेल | ६॥ रु० मण |
| तूप | ९॥ मण |
| सोनें | २९ तोळ |
| चांदी | ८३ |

नोटीस

रा. रा. भिवराज सुरजमल या नावाची दुकान मालक वारसपुत्र काळुराम व जगुराम मारवाडी दुकान अकोले जैगोपाल उपरी यासी खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचे दुकानाकडेस आमची बाकी २७६७॥-॥ व्याज मुदलसुद्धां अजमासे निघते. सदहू रुपयाची तुह्मास समक्ष मागणी केली असतां तुह्मी वसुलाची तक्रार सांगतां व बाकीची रकम जो तुह्मी देणे कबूल करितां ती आह्मी घेऊन पूर्ण पावती द्यावी असें तुह्मी ह्मणत अहात ही गोष्ट आह्मास कबूल नाहीं सबब आह्मास फिर्याद करणें भाग पडत आहे परंतु तुह्मी जी रकम आमचें देणें कबूल करीत आहात त्याजबद्दल फिर्याद करून विनाकारण कोर्टखर्च व इतर खर्च वाढवावा अशी आमची इच्छा नाहीं वरून ही नोटीस तुह्मास दिली आहे. तरी तुह्मी या नोटीसीचे तारखे पासून जितकी रकम तुमचे हिशोबानें तुह्मी आह्मास देणें आहांत ती रकम ही नोटीस पोहचल्या पासून आठ दिवसाचें आंत आह्मास देऊन तितक्यां पुरती आमची पावती घ्यावी अगर तुह्मास तेच करणे बरे वाटत नसल्यास ती रकम अकोले येथें दुकानदार सेट साहू सावतराम रामप्रसाद याचे दुकानी आमचे खाते जमा करून द्यावी ह्मणजे बाकीचे रकमे बद्दल आह्मास जी तजवीज करणे योग्य दिसेल ती करूं. वरील दोन्ही गोष्टी पैकीं कोणतीही गोष्ट आठ दिवसाचें आंत न केल्यास सर्व रकम वसूल करण्या बदल तुमच्यावर कोर्टात फिर्याद आह्मास करावी लागेल व त्या बद्दल जो खर्च लागेल तो तुह्मास द्यावा लागेल. कळावे ही नोटीस दिली सही तारीख ६ माहे आगष्ट सन १८९७ इसवी.

सही

विठ्ठल रंगराव, शंकर रंगराव, शामराव रंगराव हे अज्ञान पालन करणार मातोश्री कृष्णाबाई जवजे रंगराव जहागीरदार बाभुळगांव तर्फे मुखत्यार नरहर खंडेराव राहणार आकोला

नोटीस

मेहरबान अबदूल हुसेन अलाबक्ष शेट साहू बोहरी दुकान अकोला यास सलाम खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्माकडेस आमचे दुकानचें घेणें निघत असून त्याजबद्दल तुह्मास पुष्कळ वेळां मागणी केली असतां तुह्मी हिशोबही देत नाहीं व वह्या येथें नाहींत बाहेर गांवीं गेल्या असें सांगून हिशोब करण्याबद्दल टाळाटाळी करितां यावरून तुमचे मनांत आह्मास आमची हिशोबही करणें नाहीं. व रकम देणेंहि नाहीं असें आह्मास वाटतें करितां तुह्मास ही नोटीस दिली आहे तर या नोटीशीचे तारखेपासून आठ दिवसाचे आंत आह्माकडेस येऊन आमचे रकमेची तडजोड करणें. असें न केल्यास तुह्मावर रीतिप्रमाणें फिर्याद करावी लागेल व तसें झालें ह्मणजे तुह्मास विनाकारण कोर्ट खर्च सोसावा लागेल. कळावें. ही नोटीस लिहिली सही तारीख ६ माहे आगस्ट सन १८९७ इसवी.

सही

विठलराव, शंकरराव, शामराव हे अज्ञान पालन करणार मातोश्री कृष्णाबाई जवजे रंगराव जाहगिरदार बाभूळगांव तर्फे मु. नरहर खंडेराव राहणार अकोलें.

## वर्तमानसार

दुःख वाटतें कीं रा. अंताजी गोविंद केसकर वकील यांस गेल्या रविवारीं सकाळीं उमरावती येथें देवाज्ञा झाली. गेल्या पांच सहा महिन्या पासून प्रकृति बिघडली होती.

आह्मास लिहिण्यास मोठें दुःख वाटतें कीं रा. रा. वासुदेवराव हरीहर पंडीत उर्फ बाबा महाराज, दाक्षिण सरदार वर्ग १ ला यांस हवेच्या उपद्रवामुळें गेल्या शनिवारीं दोनप्रहरीं देवाज्ञा झाली. मरण समयीं वय ३० वर्षांचें होतें. अशा तरुण सरदारावर मृत्यूचा घाला पडला ही त्यांच्या कुटुंम्बीय माणसावर ईश्वरी अवकृपाच होय. यांचीच ज्येष्ठ कन्या रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांच्या मुलाला दिली आहे.

'केसरी' चे प्रकाशक रा. रा. हरी नारायण गोखले हे गेल्या शनिवारी चीफ प्रेसिडन्सी माजिस्ट्रेटच्या कोर्टात स्वतां हजर झाले परंतु त्यांच्यावर खटला नसल्यामुळें त्यांस सोडून दिलें.

सर्प विषानें प्लेगचे रोगी बरे झाले— आर्मी मेडिकल स्टाफ पैकीं सर्जन मेजर एच. ई. डीन ह्यांनीं प्लेगचे जे रोगी जाणार नाहींत असें डाक्टर लोकांनीं ठरविलें, तसल्या रोग्यास सर्पविष देऊन शेकडा ७९ रोगी जगविले असें तारीख २२ जुलईच्या टाइम्स आफ इंडिया पत्रांत लिहिलें आहे. ही बातमी कितपत खरी आहे हें आह्मांस माहीत नाहीं. पण ती बातमी खरी असल्यास विषावर विष देऊन रोगी बरे करण्याचा आर्यवैद्यकांत जो एक प्रवात आहे, त्यास डाक्टर डीन साहेबांच्या ह्या प्रयोगानें फार मोठीच बळकटी येत आहे असें ह्मटल्याशिवाय आमच्यानें रहावत नाहीं. ह्या प्रयोगापासून असलेला अनुभव जर खरा असला तर प्लेगचें विष सर्पाच्या विषाप्रमाणें भयंकर आहे हें जसें ठरतें त्याचप्रमाणें त्या विषावर सर्पविषाचा प्रयोग केला असतां त्याचा मारकपणा नाहींसा होतो, आणि विषाला विष गिळून टाकून त्याच्या तावडींत सांपडलेला दुर्दैवी मनुष्य बरा होतो हा अनुभव अत्यंत अद्भुत होय.

ज्यांच्या विषयीं डाक्टरांनीं आशा सोडली अशा प्लेगच्या रोग्यांवर डाक्टर डीन साहेब सर्पविषाचा प्रयोग कशा रीतीनें आणि कोणत्या प्रमाणानें कारितात ह्याची माहिती इंग्रजी वैद्यक माहित असलेल्या पुष्कळ लोकांस करून देण्यासाठीं डाक्टर डीन साहेबांनीं कांहीं योजना करावी, आणि तशी योजना त्यांकडून होण्यासाठीं सरकारानें त्यांस उत्तेजन द्यावें अशी मुंबई सरकारास आमची विनंती आहे कारण महामारी जशी आमची मैत्रीण होऊन बसली आहे तसाच तिच्या मागून तिच्या भेटीत आलेला तिचा भाऊ प्लेग हा आमच्या देशांत कायम होऊन रहाण्याचा पुष्कळ संभव आज दिसत आहे. हिंदुस्थानचें हवापाणीच असें आहे कीं हिंदुस्थानांत आलेल्या पाहुण्यास तो देश सोडून जाऊं नये असेंच वाटतें. आज प्लेग जरी आह्मास पाहुणा वाटत आहे, आणि त्याचें हिडिस रूप पाहून जरी आह्मास भय वाटत आहे तरी उद्यां तो आमच्या देशांत कायम राहिला ह्मणजे आतांप्रमाणें त्याचें भय आह्मास वाटावयाचें नाहीं हें उघड आहे. तरी ह्यानें पछाडलेल्या दुर्दैवी मनुष्यास ह्याच्या तावडींतून सोडविण्यासाठीं डाक्टर डीन साहेबांसारख्या बुद्धिमान गृहस्थानें काढलेला उपाय कितपत बरा आणि खात्रीचा आहे ह्याची चौकशी करून, चौकशीअंतीं योग्य व खात्रीचा उपाय तो आहे असें ठरल्यास तो अमलांत आणण्यासाठीं योग्य ती तजवीज सरकारानें करावी हें योग्य आहे. ह्या उपायानें सर्प कमी होऊन प्लेगचा आजार नाहींसा होण्याचें साधन मिळेल.

शु० सू०

बुलंदशहरचे सरदार बहादूर नबाब सयद मीर खान यांच्या ८ मुलांवर खोट्या साक्षीचा खटला चालू आहे.

रुरकी येथील थामसन इंजिनिअरिंग कालेजांत होणाऱ्या इंजनेरच्या परिक्षेंत वायव्य प्रांत व पंजाब यांतील नेटावांस मात्र घेतलें जाईल. इतर नेटिवांस घेतलें जाणार नाहीं असें सरकारानें फर्माविलें आहे.

हिंदुस्थानांतल्या शिपायांस सरकारच्या परवानगी वांचून आफ्रिकेंत जातां येऊं नये असें केलें आहे.

दुष्काळ, फ्लेग व टोची स्वारी यांच्या कारणानें डाक्टर दुर्मिळ झाल्या मुळें ६९ वर्षे भरल्यावर आणखी एक वर्ष डाक्टांनीं चाकरींत राहावें असें ठरविलें आहे.

पुण्याची खुनाची बातमी देणारास माफी मिळेल असें सरकारानें ठरविलें यावरून त्या खुनाचा पत्ता लागण्याची सरकारास आतां आशा राहिली नाहीं असें होतें असें एका इंग्रजपत्रांचें ह्मणणें आहे.

दुसरा एक पत्रकर्ता ह्मणतो कीं, या पुण्याच्या खुनाबद्दल राशियाचा जनरल स्कोबलफ जबाबदार आहे! हे खुषी जर पुण्यांत नसले तर पुण्याच्या लोकांस माहीत तरी असले पाहिजेत, आणि तुह्मी त्यांस धरून दिलेंच पाहिजे. असा सरकारानें पुण्याच्या लोकांस सक्त हुकूम केला पाहिजे.

पुण्यांत जादा पोलिस उठवावे आणि मयताच्या दोघां पत्नीस तहाहयात पेनशन करून द्यावें व त्या रकमा राजद्रोह सूचक लेख लिहिणारापासून घेण्याचा ठराव करावा ह्मणजे योग्य होईल अशी इंग्रजांची सूचना आहे.

टर्की सरकारानें क्रीट बेटांत आपला एक नवा कमांडर इनचीफ करून पाठविला. परकीय राज्यांचे जे लष्करी कामदार तेथें आहेत त्यांणीं या नव्या कमांडर इनचीफकडे भेटावयास जावें अशी रीत असतां तसें करण्याचें त्यांनीं नाकारलें. व त्याच प्रमाणें तेथील परकीय राज्यांच्या वकीलांनीही त्या नव्या कमांडर इनचीफच्या भेटीस जाण्याचें नाकारलें असें सांगतात कारण काय?

मालखंड येथील इंग्रजी छावणीवर एक हजार डोंगरी लोकांनीं छापा घातला. हे स्वातचे लोक असावेत.

कडक लढाई झाली व त्यांत सहा इंग्रज हपीसर फार घायाळ झाले.

त्या फौजेच्या मदती करितां वेगळाल्या ठिकाणाहून नव्या फौजा जात आहेत.

मागून आलेली तार सांगते कीं, ४५ साव्या पलटणीचा लेफ. मावले ठार झाला: ले. टेलर मरणोन्मुख झाला. मे. हर्बर्ट व ले. वाटीलंग फार घायाळ झाले. ले. लांब थोडा घायाळ झाला.

गुइड रिसाल्यानें पाठलाग करून शत्रूस पळविलें.

मालाखांड छावणीच्या भोंवती बहुतेक डोंगराची तटबंदी आहे.

या स्वातच्या डोंगरी लोकांनीं आपल्या कांहीं अडचणींबद्दल आपले कांहीं मुखत्यार सिमल्यास गव्हरनरजनरलांकडे पाठविले होते व त्यांत यांच्या ह्मणण्या प्रमाणें न झाल्यामुळें त्यांणीं ही उचल केली असावी असें अनुमान आहे.

पेशावरच्या एका पलटणीस तयार राहण्याचा हुकूम झाला आहे. या वरून शत्रूचा जोर जास्त असावा असें दिसतें.

शत्रूनें तार तोडल्यामुळें मालाखंडची बातमी बंद झाली आहे. २ तोफांसह ३१ वी पंजाब शत्रूचा पाठलाग करण्यास गेली होती ती परत आल्यावरून शत्रूचा जमाव मोठा दिसतो.

अपर स्वात खिंडींत वीस हजार लोक लढाऊ असून लोअर खिंडींतही तितकेच असल्यामुळें त्या दोन्ही खिंडी उठल्या असल्यास या प्रकरणांचें स्वरूप जास्त भयंकर होण्याचा रंग आहे.

उत्तर मालाखंड छावणीवरही हल्ला झाला. पण कोणी मेले नाहीं.

टोचीची ताजी बातमी सांगते कीं, ८ हत्यारी वजिरी लोकांस सरहद्दीवर उन्टें नेताना पकडलें. उन्टांच्या दुसऱ्याही कित्येक चोऱ्या आढळतात.

शेराणी छावणीवर पुन्हां गोळ्या आल्या व एक सोजीर घायाळ झाला.

टा० अ०

बहमा बेटांत न्यू प्रॉव्हिडन्स नांवाच्या प्रांतांत नासो शहरापासून दोन मैलांवर एक कृत्रिम सरोवर आहे. या सरोवरांत मूळ हिरवीं कासवें व मासे आणून ठेवण्याचा सरोवर करणारांचा उद्देश होता. तें एक हजार फूट लांब आणि दोन तीनशें रुंद आहे. दिवसा या सरोवराचें पाणी दुसऱ्या कोणत्याही लहान सरोवराच्या पाण्यासारखेंच दिसतें. परंतु रात्रीं त्या पाण्यांत यत्किंचित् हालचाल झाली कीं त्यापासून फारच चकचकीत असें तेज उत्पन्न होतें. आणि सर्व तळ्याचें पाणी एकदम हालूं लागल्यास एखाद्या अग्निमय सागराप्रमाणें देखावा दिसतो. या सरोवरांत हिंडन येण्यासाठीं भाड्यानें बोटी मिळतात, व वल्ही पाण्याला लागली नाहींत तोंच तीं जणू काय सोन्याच्या रसांतून आपण बुडवून काढींत आहोंत असें वाटतें. ह्या सरोवराचर देखरेख करण्यास ठेविलेल्या नोकराजवळ एक मुलगी आहे. ती तिला थोडेबहुत पैसे दिले ह्मणजे पाण्यांत बुड्या मारते व इकडे तिकडे पाणी उडवून पाहणारांस मोठी मौज वाटेल असें खेळ खेळते. ती पाण्यांत शिरली ह्मणजे अग्नीच्या समुद्रांत शिरल्या प्रमाणें व ज्वालांनीं वेष्टून जाऊन त्याच्याशीं झगडत असल्या प्रमाणें दिसतें.

राणीसाहेबांच्या संग्रहालयांत ज्या ज्या ह्मणून फार किंमतीच्या असंख्यात वस्तू आहेत त्यांत एक अत्यंत चमत्कारिक सुई आहे. ती त्यांच्या करितां बकिंगह्यामशायर मधील एका शिल्पकलानिपूण कारागिरानें मुद्दाम तयार करून त्यांना नजर केली होती. ती सुई रोम लोकांच्या विजयाच्या स्मारकाकरितां उभारलेल्या त्यांच्या रोम येथील विजयस्तंभासारखी केली आहे. पण तिच्यावर रोमनलोकांचीं चित्रें दाखविण्याऐवजी महाराणी सरकारच्या आयुष्यक्रमांतलीं निरनिराळ्या वेळचीं निरनिराळीं चित्रें दाखविलेलीं आहेत. तीं इतकीं सुबक आहेत कीं, पाहतांच पराकाष्टेचें समाधान वाटून कारागिराच्या कौशल्याची तारीफ केल्यावांचून राहवत नाहीं. अगदीं उत्तम असे देखावे तीन आहेत. त्यांत पहिला देखावा त्यांच्या अगदीं बाळपणाचा घेतलेला आहे. दुसरा राज्ञीपदारूढ झाल्या त्या वेळचा आणि तिसरा त्यांच्या विवाहकाळचा. हीं सर्व चित्रें सूक्ष्मदर्शकयंत्रावांचून मुळींच दिसत. नाहींत. त्याच्या योगानें तीं चांगलीं स्पष्ट दिसतात. आश्चर्य हें कीं ती सुई उघडतां येऊन तिच्या पोटांत आणखी तशा प्रकारच्या बऱ्याच बारीक सुया निघतात. त्यांवरही अशाच प्रकारचीं चित्रें कोरलेलीं आहेत.

सर जॉन लबक हे कीटक शास्त्रांत फार प्रवीण आहेत. ते ह्मणतात कीं "बरात असणारी माशी आपल्या म[illegible]पासून 'म' ह्मणजे मध्यम स्वर काढते[illegible] तिचे पंख एका मिनिटांत वीस हजार वेळां किंवा एका सेकंदांत तीनशें पस्तीस वेळां थरथरतात. आणि त्या पासून गांधाराचा सुर निघतो. मारे नावाच्या एका कीटकशास्त्रज्ञानें या बाबतींत प्रत्यक्ष अनुभव पाहिला. त्यानें एक प्रकारचा कागद लावलेलें एक नळकांडें कांहीं यंत्रानें फिरत राहील असें तयार करून त्याचे शेजारीच एक माशी अशी लावली कीं तिचे पंख हालले असतां त्या नळकांड्यावरील कागदास लागावे. पुढें पाहतात तों तिच्या पंखाच्या थरथरणामुळें खरोखरीच त्या कागदावर एका सेकंदांत तीनशें छत्तीस निरनिराळ्या खुणा झाल्या होत्या. या खुणांच्या संख्येचा आणि केवळ स्वर ऐकून लबक साहेबांनीं अनुमान केलेल्या संख्येचा संबंध अगदीं बरोबर जुळला.

आजपर्यंत कधीं कोणी कोळी पाळल्याचे कोणाच्या ऐकिवात नव्हतें. परंतु थोडे दिवसापूर्वी एका बाईनें वर्तमानपत्रांत आपला अनुभव प्रसिद्ध केला होता. त्यावरून असें दिसतें कीं कोळीसुद्धां माणसाळले जातात. ती ह्मणते "एके दिवशीं मीं बागेंत हिंडत असता एक कोळी पाहिला त्यास लागलीच धरून तीन वारपर्यंत एका कांचेच्या ग्लासा खालीं ठेविलें. आपल्या पांढऱ्या शुभ्र अशा रेशमिवजा तंतूंचें जाळें पसरितांना मीं त्या कोळ्यास पाहिलें व नंतर थोडेच दिवसांत माझ्या हातांतून तो कोळी माशा घेऊन जाऊं लागला. व पानामध्यें पाणी पुढें केलें असतां तेंही तो स्वस्थपणानें पिऊं लागला." त्या बाईचें ह्मणणें असें कीं 'बाणकार या नात्यानें किंवा दिसण्यांत सुंदर या दृष्टीनें' अथवा त्रास देणाऱ्या किटकांचा नाश करून टाकणारा या दृष्टीनें-कोणच्याही दृष्टीनें पाहिलें तरी कोळी हा फारच चांगला प्राणी आहे. आणि तो बाळगण्याजोगाही आहे.

ब्रिटिश राज्याची किंमत.

एका अमेरिकन अंकशास्त्रज्ञानें ब्रिटिश राज्याची किंमत काढली आहे. तो ह्मणतो इंग्रज लोकांचें सर्व कांहीं मुलुख एकत्र करून त्यांची किंमत केली असतां ८००००००००० इतके रुपये होते. फ्रान्स देशाची ७९०००००००००० आणि बाकीची सहा बलाढ्य राष्ट्रें मिळून ३३००००००००००० इतके रुपये किंमत होते.

क०

असाम दार्जिलींग या प्रांतांत तारायंत्रांच्या तारा तुटल्याचें समजतें.

आगगाडी न थांबवितां उतारूंस आंत घेण्याची आणि बाहेर जाऊं देण्याची एका चतुर मनुष्यानें युक्ति काढिली आहे. ही पण अमलांत येण्याला कैक वर्षे लागतील.

ब्रह्मदेशांत लांकडे रचून ठेवण्याचें काम हत्ती करितात.

आ० व०

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "व्ऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ........................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........८१ ०६
दुसरे खेपेस .... .........८१

Six monthly......... 3 ................ 8 as
Single copy ........................................ 4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ...... 4 as
Repetition Per line ... 3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

YOL XXXI. AKOLA MONDAY 16 AUGUST 1897 NO 32
वर्ष ३१ आकोला सोमवार तारीख १६ माहे आगस्ट सन १८९७ इ० अंक ३२

## जाहिरात

आह्मास आमच्या जुन्या रुळा प्रमाणें इजारा असलेला गांव मौजे हिरडी प्रगणें डोंगरखेडें तालुके यवतमाळ जिल्हा वणी हा विकावयाचा आहे याचे क्षेत्रफळ ९०१ एकर २७ गुंठे आहे व आकार २३'८१२ आहे. हा गांव कोठेंही गहाण वगैरे नसून यंदा निमे जमीन साऱ्यानें दिली आहे व घरचीं शेतेंही पेरून तयार आहेत. ह्मणून ही संधी घालवूं नये. ज्याची घेण्याची इच्छा असेल त्यांनीं खालीं सही करणारास समक्ष भेटावें अगर पत्र पाठवावें ह्मणजे खुलासा होईल. तारीख २०।७।९७ इ.

सही
पृथ्वीगीर हरीगीर यवतमाळ
दस्तुर खुद्द.

---

## जाहिरात
### गिरगांव मुंबई

येथील आर्यधर्म रक्षक मंडळी जवळ दुष्काळफंड १०७ रुपये ८ आणे जमल असून लवकरच ते आपला एक एजंट अनाथ मुलांची व्यवस्था करण्या करितां वऱ्हाड प्रांतांत पाठविणार आहेत.

---

### नामदार टिळक फंडाच्या मदतीकरितां शके १८२० चें पंचांग.

नामदार साहेबांचें चित्र व अल्प चरित्रासह.

नामदार बाळ गंगाधर टिळक पुण्यातील प्रसिद्ध केसरी व मराठा पत्राचे चालक व मालक यांजवर चाललेल्या खटल्याचें कामीं न्यायासनापुढें वकील ब्यारिस्टरादिकाचे खर्चाकरितां फार मोठी रक्कम लागावयाची आहे, तेव्हां त्यास हस्ते परहस्ते द्रव्यद्वारा मदत करणें हें प्रत्येक देशबांधवाचें कर्तव्य आहे. ह्मणून आह्मी ह्या पंचांगात खर्च वजा जातां जी रक्कम राहील ती या फंडाकडे देण्याचें ठरविलें आहे. या पंचांगांत नामदार टिळकांचा फोटो व अल्पचरित्र देणार आहोंत. पंचांग टाईपावर छापीत आहोंत. छपाई वगैरे सुरेख करण्यांत येईल. स्वार्थ व परमार्थ हे दोन्ही लाभ यांत होत आहेत. तरी मंडळी आळस करणार नाहीं अशी उमेद आहे फुटकळ पंचांगाची किंमत अर्धा आणा, दहा पंचांग एकत्र मागविणारास टपाल हंशील पडणार नाहीं. शंभर पंचांगें घाऊक घेणारास रु. २ पडतील. पंचांगें भाद्रपद मासांत ग्राहकांस मिळतील. मागविणारांनीं त्वरा करावी कारण फंडाचे मदतीस रक्कम जी पाठविणें ती होईल तितकी लवकर पाठविली पाहिजे. सर्व पत्रव्यवहार व पैसे खालील पत्यावर पाठवावे.

नारायण चिंतामण आठवले,
बुकसेलर्स व पब्लिशर्स, घी कांटा बडोदें.

---

## अर्थशास्त्र— देशाची संपत्ती वाढेल

अशा प्रकारचीं अनुभविक तत्वें व साधनें लोकांस माहीत असणें अवश्य आहे. ह्याच हेतूनें अर्थशास्त्र अर्थात संपत्तिशास्त्र ह्याच्या प्राथमिक तत्वांची ओळख व्हावी ह्मणून अनेक इंग्रजी ग्रंथाच्या आधारें हा ग्रंथ रा. सा. विठ्ठल लक्ष्मण कवठेकर बी. ए. बडोद्दे येथील माजि. व्ह. कॉलेज मधील अर्थशास्त्राचे प्रोफेसर यांनीं तयार केला तो येथील सहविचारणी सभेनें पसंत करून आपल्या ग्रंथमालेत गोवला आहे. तें हें सभेचें १३ वें पुष्प आह्मी छापून तयार केलें आहे. या पुस्तकांत संपत्तीचें स्वरूप, संपत्तीचे उत्पत्ति-विषयीं विचार, ( जमीन, श्रम व भांडवल) भांडवलासंबंधीं कांहीं महत्वाचे सिद्धांत, मौल्य व किंमत, नाण्याविषयीं व्याख्या, संपत्तीची वांटणी, जमिनीचा सारा, मनुष्यांची मजुरी, भांडवलावरील नफे, परकीय देशांशीं व्यापार, कराविषयीं विचार, परकीय देशांशीं होणाऱ्या व्यापारावरील जकाती, अप्रतिबद्ध व्यापार व संरक्षण इत्यादि बाबतींचा उहापोह केला आहे. या पुस्तकाची अगाऊ किंमत साधी बांधणी रु. ॥। सोनेरी पुठ्ठा रु १ मागाहून रु. १। व १॥ ठेविला आहे.

आगष्ट आखेर पर्यंत होणारे ग्राहकांचीं नांवें पुस्तकांत छापिलीं जातील. पुस्तकें सप्टेंबरांत ग्राहकांस मिळतील. बाहेर गांवचे वर्गणीदारांस पुस्तकें व्हाल्यूपेबलनें पाठविलीं जातील सर्व पत्रव्यवहार— ‘ दामोधर सावळाराम आणि मंडळी–ग्रंथ संपादक व प्रकाशक—बडोदे ’ या पत्त्यावर करावा. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं. उत्तराकरितां टिकिट पाठविलें पाहिजे.

---

वाशीम ता. १०।८।९७

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस.

आज पावेतों मेघ राजांनीं जिकडे तिकडे हिरवेंगार करून टाकलें आहे. पुढें मात्र पिका विषयीं काय जगत्पाळक लज्जा राखील ती खरी. धान्याचे भाव अतोशय वाढत्या प्रमाणावर चालले आहेत. हें प्रमाण कोठपर्यंत वाढत जाईल याची कल्पना करतां येत नाहीं. गरीब दुर्दैवी लोकांवर मात्र आलेल्या ह्या महत्संकटाचें परिपत्य लवकरच होवो अशी जगदीश्वरास प्रार्थना करितो. अशा दुर्धर प्रसंगीं देखील आमचे येथील गरीब लोकस "चापट्टी वगैरे संबंधानें" त्रास किती वरें सोसावा लागत आहे याचा विचार वाचकांनींच करावा. जे बिचारे दिवसभर काबाडकष्ट करून इतकी मजूरी मिळवितात कीं, त्यांना आपापलें सुद्धां पोट भरण्याची पंचाईत; मग ज्यांच्या मागें दोनचार लहान लहान मुलें बाळें आहेत त्यांची दैना पाहून मला एकल्यास तर काय परंतु कोणासही त्यांची कींव आल्यावांचून राहणार नाहीं. अशा मजुरांनीं त्यांचेवर बसाविलेला सफाइचा कर कोणत्या रीतीनें द्यावा ! यंदाचे वर्षी दुष्काळ असल्यामुळें जर माफी मिळाली असती तर दुःखांत सुखच मानलें गेलें असतें यांत संशय नाहीं.

महर्गता फार असल्यमुळें जानेवारी पासून जून पर्यंत बहुतेक खात्यांतलि १९ रुपयाचे आंतील नौकर लोकांस "माहागाईभत्ता" मिळाला. या जिल्ह्यांतील शाळाखात्यांतील लोकांस मात्र पहिले तीन महिने शिवाय करून दुसऱ्या तीन महिन्यांबद्दल "आज मिळेल, उद्यां मिळेल" असें ह्मणून तिष्ठत बसावें लागत आहे. या संबंधानें बिचारे साहा साहा आठ आठ रुपयांचे शिक्षक लोक फार कुरकुर करीत आहेत. कां बरें करणार नाहींत ! तिकडील अधिकाऱ्यांस कळवळा येत नसेल काय ?

येथील देव पेठेंतील शाळेचा वार्षिक परीक्षा मागील आठवड्यांत संपून या आठवड्यांत काल पासून शुक्रवार पेठेंतील शाळेची परीक्षा सुरू झाली. रिझल्ट मागाहून समजेल

आमचे येथील लोकप्रिय डाक्टर मि. चिंतामणराव गोखले यांची बदली राळेगांवास झाल्यामुळें त्यांस तारीख ४ मिनहू रोजीं "शुक्रवार आव्यापाऱ्या क्लब" मधील मेंबरांकडून पानसूपारी देण्यांत आली. त्यांच करितांच ता० ६ रोजीं संध्याकाळीं ७ पासून ९॥ वाजेपर्यंत "देवपेठ युनिअन क्लब" मध्यें गाणें बजावणें करण्यांत आलें. ह्या दिवशीं दोन्ही क्लब मधील मेंबर लोक, गांवांतील कांहीं संभावित गृहस्थ वगैरे बरेच जमले होते. येथें एक नाटक आलें आहे त्यांतील बाजाही आणला होता. थोडा वेळ बरीच रमणूक करून घेतल्या नंतर पानसूपारी, अत्तर गुलाब होऊन मि. शिदोरे मास्तर यांनीं "जमलेल्या मंडळींनें निमंत्रण पत्रिकेस मान दिला" या बद्दल त्यांचे क्लब तर्फे आभार मानून इकडच्या तिकडच्या गोष्टी थोडा वेळ होऊन मंडळी विसर्जन झाली.

मंगरूळ पीरला कॉलरा फार सुरू आहे.

आपला
एक "क्ष"

---

वऱ्हाडसमाचार

---

मिती श्रावण वद्य ४ शके १८१९

---

## सहानुभूति

नामदार बाळ गंगाधर टिळक यांच्यावर जो खटला उभारण्यांत आला आहे त्यामध्यें कायदेशीर रीतीनें सरकारशी लढण्या साठीं व त्यांचा बचाव यथायोग्य होण्यासाठीं त्यांस मानसिक व शारीरिक श्रमा शिवाय मोठा खर्च पडणार आहे. राजश्री टिळक घरचे कांहीं श्रीमान नाहींत. त्यांच्या ठिकाणीं विधे प्रमाणें श्रीमंतीचा वास होत नाहीं. जो अप्रतिम लोकसेवा त्यांनीं केली आहे ती मात्र त्यांची मोठी दौलत होय. राजश्री टिळका सारखे नरश्रेष्ठ वर्तमानपत्रकर्त्यांच्या धंद्यांत पडले ही गोष्ट देशी वर्तमानपत्रांचें मोठें भाग्य होय. राजश्री टिळक यांनीं मोठा स्वार्थत्याग केला ह्मणून त्यांच्या हातून फार मोठी देशसेवा घडली आहे. ते सरकारी चाकरी पत्करते तर ते सबार्डिनेट जजाच्या मोठ्या पायरीवर चढले असते. वकिली चालविली असती तर यांच्या सारख्या पुरुषाला आज कालच्या उत्तम वकिलाची मिळकत मिळाली असते. परंतु श्रीलाभा कडे दृष्टी न देतां या उदार महात्म्यानें महाराष्ट्रांतील पुष्कळ संस्थांस आस्तित्वात आणिलें, वर्तमानपत्राच्या धंद्यास उच्चपदवीला पोंचविलें आणि नवीन राजधर्म लोकसमूहास चांगला शिकविला. राजद्रोहाचे विचार या गृहस्थाच्या लेखांत जर दिसती तर राजद्रोहाची व्याख्याच बदलली पाहिजे. इंग्रजी राज्याचे खरे अधारस्तंभ ह्मणजे नामदार टिळका सारखे लोकनायक होत.

अशा लोकहितकारी, राजभक्त, व विद्याविभूषित गृहस्थांवर सरकारच्या इतराजीमुळे भयंकर प्रसंग आला आहे हें पाहून कोण प्राणी हळहळणार नाहीं ! नामदार टिळकांस या समयीं द्रव्यद्वारा मदत मिळेल ती फार अमूल्य आहे. नामदार टिळक हे राजद्रोही आहेत असा मनांत किंतु येईल तर सर्वत्र त्यांस महाराणी सरकाराचे शत्रू ह्मणून मानण्यांत यावें परंतु ते राजभक्त आहेत अशी ज्यांच्या मनाची खात्री असेल त्यांनीं या वेळीं लोकनायकाच्या बचावासाठीं वर्गणी दिलीच पाहिजे. शेवटील सहानुभूतीच्या दृष्टीनें या राष्ट्रानें आपल्या शक्ती प्रमाणें मदत केली पाहिजे. बंगाल्याच्या एका जमेदारानें ५० हजार रुपये 'टिळक फंडा' कडे देण्याचें कबूल केलें आहे. द्रव्याची मदत करणें कायद्याला अनुसरून आहे. नामदार टिळकांचा बचाव झाला म्हणजे सर्वांचें हित आपोआपच होईल. आम्हास बळकट आशा आहे कीं आमची विनंती सद्गृहस्थ आनंदानें मान्य करितील.

---

सतां हि संदेहपदेषु वस्तुषु प्रमाण-
मंतः करण प्रवृत्तयः

कविगुरु कालिदास यांची ही उक्ती प्रस्तुत चाललेल्या नामदार टिळक यांच्या वरील अराजनिष्ठेच्या खटल्याला चांगली

लागू पडते. प्रजेचीं मनें केसरींतील लेखा मुळें बिघरली व तिनें अराजनिष्ठेचे प्रकार करून दाखविले असें प्रतिपादण्यास सरकार तयार नाहीं. फक्त अशा लेखाचा ओघ या अनर्थकारक परिणामाकडे आहे ह्मणून त्यांच्या लेखकांस शिक्षा करण्याचा उद्देश सरकारचा आहे. अमूक लेख राजद्रोहप्रवर्तक आहे किंवा नाहीं, यांचा खुलासा गेल्या ४ थे तारखेस जामिनावर नामदार टिळक यांस सुटें करिते वेळीं नामदार न्यायमूर्ती बद्रुद्दीन यांच्या भाषणांत सहज रित्या झाला आहे. आह्मी पुष्कळ विद्वान कायदे पंडिताचे या प्रकरणीं अभिप्राय विचारले आहेत. सरकारचें ह्मणणें व ते अभिप्राय या मध्यें फरक पडला तर त्या संदेहविषयक गोष्टींत नामदार टिळकादि संतमालेतील गृहस्थांच्या अंतःकरणप्रवृत्तीच प्रमाण मानल्या पाहिजेत.

---

प्रोफेसर गोपाळ कृष्ण गोखले यांनीं इंडियांत आल्या बरोबर सरकारची माफी मागितली कीं पुण्याच्या प्लेग कमिटीनें स्त्रियांस रस्त्यावर नग्न केलें व दोन बायांनीं आत्महत्या केली ह्मणून जो मजकूर विलायतच्या मांचेस्टर गार्डियन पत्रांतून प्रसिद्ध झाला तो निराधार व खोटा आहे ह्मणून त्याच्या प्रसिद्धी बद्दल मी सरकारला दुःख प्रदर्शित करितो. या चुकी बद्दल माफी मागतली ह्मणून प्लेग कमेटीनें पुणें शहरीं जो त्रास दिला तो कांहीं कोठें लपला नाहीं. प्रो. गोखले यांनीं प्रसिद्ध केलेली गोष्ट खोटी होती तथापि प्लेग कमेटिचें काम कांहीं निर्दोष ठरत नाहीं हें विसरतां कामा नये.

---

प्रोफेसर गोखले यांनीं माफी मागितली किंवा सरकारच्या पायीं लोळण मारली तरी त्यांस मुंबईचे गव्हरनर यांनीं एक पुष्पांजली वाहिली कीं पांच हजार कोसांवर वाटेल तसें निराधार बडबडल्या नंतर माफी मागणें सोपें आहे. डेकन सभेचें मेमोरिअलावर सही करणारे राव बहादूर विष्णु मोरेश्वर भिडे यांस एकही गोष्ट पुण्याच्या प्लेग कमिटी मध्यें गैर व जुलमी दिसली नाहीं, नबाब अबदूल खान यांनीं कोऱ्या कागदावर सही केल्याचें मुखत्व स्वीकारलें आणि पुण्याच्या मुसलमानांनीं निराळी सभा भरवून प्लेग कमिटीचीं कामें शिरसावंद्य मानलीं तथापि पुण्यास झालेला त्रास, छळ व जुलूम कांहीं नाहींसा होत नाहीं. तो त्रास, छळ, व जुलूम सार्वजनिक हितासाठीं अनिवार्य होता असें ह्मटलें तर आह्मास तो अर्थ समजेल. पण लार्ड सांडहर्स्ट यांनीं नामदार टिळक, सरदार नातू सारखी मंडळी कायद्यांच्या व अधिकारांच्या सांपळ्यांत घातली, प्लेग कमिटीच्या विरुद्ध आलेल्या तक्रारी व फिर्यादी प्रसिद्ध करण्यांत हांशील नाहीं ह्मणून सांगितलें आणि प्लेग कमिटीच्या कामाविषयीं कमिशन नेमण्या विषयीं इनकार केला तथापि घडलेला सोल्जरी त्रास, छळ व जुलूम कांहीं अदृश्य होऊं शकत नाहीं. आपण खुद्द जबाबदार आहों व प्लेग कमिटीचें अभिनंदन करितों असें लार्ड सांडहर्स्ट बोलले ह्मणून भूत गोष्टींचा विपर्यास होऊं शकत नाहीं. प्रोफेसर गोखले, रावबहादूर भिडे, नबाब अबदूलखान इत्यादिकांनीं वाऱ्याला पाठ फिरविली आणि खोट्या बरोबर खऱ्या गोष्टीला तिलांजली दिली; तसेंच लार्ड सांडहर्स्ट यांनीं त्यांच्या मित्रेपणावर आपल्या कृतीच्या मंडनाची समशेर फिरविली यांत कांहीं पुरुषार्थ नाहीं. पण आह्मासारखे त्रयस्थ सर्व प्रकार ओळखून आहेत. त्यांच्या जवळ हा लपंडावीचा खेळ चालणार नाहीं. 'पायोनिअर' पत्रामध्यें वाऱ्या बरोबर पाठ फिरविणारे इंडियन लोक व स्वकीय स्तोम माजविणारें सरकार यांस उद्देशून एक नामी दृष्टांत आला आहे. तो पत्रकर्ता ह्मणतो कीं इंडियन ह्मणजे लबाड गुलाम आहे व सरकार ह्मणजे मूर्तिमान सैतान आहे. हा दृष्टान्त पुणेकरांच्या वर्तनास कितपत लागू पडतो हें वाचकांनींच सूक्ष्म दृष्टीनें पाहावें. वरील पुणेकरांच्या व मुंबई सरकारच्या बोलण्यांत सत्यापलाप बराच आहे पण त्याची शहानिशा होण्याचें चिन्ह सांप्रत काळीं दिसत नाहीं. भविष्य काल या गोष्टीचा निर्णय चांगला करील आणि सध्यां परस्परामध्यें दोषाविष्करण करण्यांत कांहीं लाभ नाहीं.

---

नेटीव संस्थानांत लबाड लोकांच्या कारस्थानाला मोठी संधी मिळते. या प्रकारचें एक विलक्षण उदाहरण नुकतेंच उजेडांत आलें. लुनवाडा नांवाचें गुजराथेंत संस्थान आहे. त्या संस्थानाचे राजे साहेबांस व दिवाण राजश्री दौलतराम यांस दहशत घालून त्यांच्या हातून १५० रुपये नगाराची संस्थानीं एजंटाची जागा मिळविण्यासाठीं गणपत सिताराम मोकद्दम नांवाच्या मनुष्यानें एक चमत्कारिक युक्ती काढली. हा गणपत सिताराम 'पंच महाल टाईम्स' नांवाच्या पत्राचा एडिटर होता. त्यानें गोध्रा येथें दोन पत्रें स्वहस्तेंच तयार केली. आणि त्या खालीं सहीच्या ऐवजी फक्त E. हें अक्षर होतें. या अक्षराचा सांकेतिक अर्थ असा बसविला कीं कीं हीं पत्रें मुंबई सरकारचे सेक्रेटरी एड्जरले यांच्या सहीचीं गणपतला आलीं आहेत. त्या पत्रांतला आशय असा कीं राजे साहेब यांस गादी वरून काढावें व दिवाण दौलतराम यांसही चाकरी वरून दूर करावें अशा विषयी सरकारांत लिहून आलें आहे पण जर तुमचा [गणपतचा] फायदा कांहीं होत असेल तर मी माझ्या हातून होईल तितकी मदत करीन. नाहीं तर, राजेसाहेब व दिवाण हे निमिषमात्रांत नाहींसे होतील. या पत्रांच्या जोरावर त्या अधमानें दिवाणाशीं खानगी मुलाखत घेतली आणि राजे साहेबांस ही भावी पदच्युतीची गोष्ट विदीत केली. राजे साहेबांनीं तीं पत्रें मुंबई सरकाराकडे धाडलीं. त्या बरोबर त्या गणपतवर अमदाबादचे सेशन जज्ज मि. टी. डी. फ्राय यांच्या समोर फौजदारी खटला चालला. सेशन जज्जांनीं या अचाट कल्पना चालविणाऱ्यावर बनावट पत्राबद्दल व त्यांच्या जोरावर राजेसाहेबास फसविण्याचा प्रयत्न केल्या बद्दल एकंदर तीन वर्षांची सक्त मजूरी व तीनशे रुपये दंड केला. लवकर श्रीमान होण्याची युक्ती कुमार्गाची असते आणि कुमार्गाचा परिणाम असाच भयंकर असतो. नेटिव संस्थानांतील लबाड लोकांस हें अननच मिळालें.

---

राव बहादूर बाळकृष्ण काशिनाथ जोशी, रेसिडेन्सी माजिस्ट्रेट यांच्या समोर एका 'डेकन मेल' उर्फ 'इंडियन मेल' नांवाच्या पत्रकर्त्यावर बेअब्रूची फिर्याद चालली होती. फिर्यादी मि. एस. रंगय्या नांवाचे पब्लिक वर्कस खात्यांतील वाटर वर्कस शाखेकडे कारकून आहेत. या पत्राचे प्रकाशक आयर शास्त्री ह्मणून एकजण आरोपी आहेत. बेअब्रूचा मजकूर असा होता कीं एका व्यापाऱ्यानें आपल्या घरासाठीं अर्ध्या इंचाचा पाण्याचा नळ मागितला. त्याबद्दलचा पैसा भरण्यास तो तयार होता. तीन महिने लोटले तरी हा पैसा घेऊन त्याला नळ कोणी देईना. शेवटीं तो पैसा घेण्याविषयीं मि. एस. रंगय्या याला डिस्ट्रिक्ट इंजिनिअर मि. बुचानन यांनीं हुकूम दिला. त्यावेळीं मि. रंगय्या अधीक पैसा स्वतां साठीं मागूं लागला आणि तो देईपर्यंत त्यानें नळाबद्दलचा पैसा घेण्याचें नाकारलें. हा मजकूर छापल्यावर मि. रंगय्या याला आपल्या अब्रूची सफाई करण्यास सांगितलें. वर्तमानपत्रकर्ते आयर शास्त्री यांस आपल्या लेखाच्या समर्थनार्थ कांहींच पुरावा देता आला नाहीं. इतकेंच नाहीं तर त्यानें या फिर्यादी नंतर जरा उद्दामपणाचे लेख लिहिले आणि लेखी कैफियतींत दुसऱ्या मोठ्या अधिकाऱ्यावर कुतर्कांचा वर्षाव केला. या या मुळें कडक राजदंडास आयर शास्त्री पात्र झाला. त्यास एकंदर शिक्षा ९ महिन्यांची साधी कैद व १५० रुपये दंड अशी करण्यांत आली. आयर शास्त्री यानें आपली शिकंदराबाद येथील पंतोजीपणा सोडून या वर्तमानपत्राच्या धंद्यांत प्रवेश अलिकडे केला होता. निजामशाहींतील अधिकाऱ्यांवर तोंडसुख घेऊन हे पैसा मिळवित होते असा माजिस्ट्रेट साहेबांच्या फैसलांत उल्लेख होता. अव्यापारांत व्यापार केल्याचें हें प्रायश्चित्त होय तथापि एका व्यवसायबंधूस शिक्षा झाली हें पाहून आह्मास वाईट वाटतें.

---

पाऊस चांगला पडत आहे आणि पीकें नीट स्थितींत आहेत; तथापि दुष्काळग्रस्तांची प्राणधारणा या गोष्टीनें कांहीं होत नाहीं. बाजारभाव तेज आहेत, पुष्कळ गरीब लोकांपाशीं पैसाअडका किंवा धान्य नाहीं, आणि त्यांस मोलमजूरी करून कसें तरी पोट भागवावें लागतें. पण वर्षांकालाला मोलमजूरीचे धंदे कमी होतात. शेतांचीं कामें चालू झालीं तरी यंदा लोकांच्या गरीबी मुळें मोलमजूरी देण्याचें सामर्थ्यही पुष्कळांस नाहीं. अशा बिकट समयीं आमच्या जिल्ह्यांतील दुष्काळाचीं कामें आजउद्या बंद होणार आहेत असें कळतें. दुष्काळाचीं कामें बंद करणें मोठें चुकीचें होईल. आणखी दोन तीन महिने गरीब प्रजेला जगविण्यांतच सरकारचें वात्सल्य प्रगट होणार आहे. दुष्काळामुळें लोक अशक्त, दुबळ, व पंगु बनले आहेत. उपासमारा सहन करण्याचें सामर्थ्य त्यांस नाहीं. अशा नादार स्थितींत सरकारानें सर्व प्रकारें मदत केली पाहिजे. ही जबाबदारी ओळखून त्या प्रमाणें वर्तन घडलें तर फार नामी होईल.

---

स्थलमहात्म्यानें मनुष्य कधीं कधीं लोकदृष्टीस फार येतो पण त्याची खरी किंमतही तेव्हांच निदर्शनास येते. नामदार सर मंचरजी भावनगरी हे पार्लमेंटाचे सभासद झाले तेव्हां पासून त्यांच्या अभिप्रायाला लोक विचारूं लागले. पण उच्चस्थानामुळें सर भावनगरी यांची कल्पनाशक्ती फार उचंबळूं लागली. त्यांच्या कल्पना स्वैर भराऱ्या मारूं लागल्या व त्यांचे विचार भलत्याच स्वर्गांत उडाण मारीत आहेत. इंडियनांमध्यें अराजनिष्ठेचें बीज उद्भवलें आहे असें सांगून त्याच्या कारणांचा सर भावनगरी यांनीं स्पष्ट उल्लेख केला. मिल्लच्या स्वतंत्रते वरील ग्रंथ, मिल्टनची तशीच कविता आणि अशाच प्रकारचे ग्रंथ शाळांतून व पाठशाळांतून शिकवितात त्याचा परिणाम हाच अजरानिष्ठेच्या मुळ्या होत. या इंग्रजी अर्धवट विद्येमुळें लोकप्रतिनिधीसत्तात्मक राज्यसंस्था, लोकांचे हक्क, परराष्ट्रीय अमलाचा जुलूम इत्यादि शब्दांची बडबड इंडियन लोक करूं लागतात. कोणत्या देशाला व कोणत्या लोकस्थितीला मिल्ल व मिल्टन यांचे विचार लागू पडतात हें इंडियनांस कळत नाहीं. 'इंडिया' मासिक पुस्तकांतून सर वेडरबर्न सारखे लोक सरकाराविरुद्ध लेख लिहितात आणि त्या इंडियातील शब्दमाला इंडियन स्वैरपणानें वापरतात व राजद्रोह पसरतात. हे इंडियन विद्यार्थ्यांस शिकवितात कीं लार्ड हामिल्टनचें नांव सभेंत निघालें कीं छीः हुशः, व हिंडमनचें किंवा वेडरबर्नचें निघालें कीं टाळ्याचा गजर करा. अशा प्रकारच्या सभा इंडियांत भरत असतात आणि सर्वत्र बंडाची सिद्धता दिसते. इंग्लंडांतील वर्तमानपत्र अराजनिष्ठ असूंच शकत नाहीं. कान्सरव्हेटिव किंवा लिबरल या पक्षा विरुद्ध कितीही लिहिलें व पक्षक्रांती झाली तरी महाराणी सरकारच्या गादीला कांहीं धोका नाहीं. पण इंडियांत,सर्व प्रकार अराजनिष्ठाकारक आहे आणि ह्मणूनच सर भावनगरींनीं सूचविलें कीं वेळेवरच हीं बंडाचीं लक्षणें बंद केलीं पाहिजेत. खरोखर, ही आर्यमातेची अपसेवा सर भावनगरी यांनीं मोठी अप्रतिम केली. जर ब्रिटिश राज्याला शत्रु असतील तर सर भावनगरी सारखी मंडळी होय. हे विचारांचे तारे त्यांस फार वेळ प्रकाश देणार नाहींत. त्यांची कृती आत्मघातक आहे. लार्ड मेकाले, जान ब्राइट फासेट, ब्राडला इत्यादि गृहस्थ अक्कलशुन्य या विचाराच्या दृष्टीनें ठरतात.

सर भाव नगरी ह्मणतात कीं नेटिव वर्तमान पत्र ह्मणजे सद्गृहस्थांची निर्भत्सना करणारें यंत्र होय. ज्याला पोटाला नाहीं, उद्योग नाहीं, राहण्याला झोपडी शिवाय जागा नाहीं पण थोडेबहुत टफ करितां येते व वाक्यें जुळतां येतात ते हा धंदा काढतात. त्यांच्या अपराधा बद्दल त्यांस तुरुंगवास दिला तरी तो त्यांस घरच्या पेक्षां विशेष सुखावह असतो. आणि पाश्चात्य विद्येच्या शिक्षणाचा संस्कार होऊनही हे पत्रकर्ते सुतार लोहारा पेक्षां चांगल्या स्थितीचे नसतात. सर भावनगरी तरी कोणते विद्वान, श्रीमान व सुविचारी निघाले आहेत! ते गालीदानांत प्रवीण व विघ्नसंतोषी आहेत. तेव्हां त्यांच्या ह्मणण्यानें त्यांस तरी आनंद होवो!

सर. डब्ल्यू मार्कबी यांनीं बंगालचे माजी लेफटेनंट गव्हरनर सर चार्लस इलियट यांस एक उत्तम जबाब दिला आहे. ब्रिटिश राज्यकारभार इंडियाचा भाग्योत्कर्ष करणारा असला पाहिजे पण सर चार्लस यांच्या रितीनें तो या देशाला नाशकारक होईल. नेटिव वर्तमानपत्रांचीं तोंडें बंद करणें ह्मणजे न्याय कोडताचा अधिकार काढून सरकारच्या कृती विषयीं अराजनिष्ठा व असंमती या मधील फरक नाहींसा करण्या सारखें आहे. सर मार्कबी यांनीं नेटिव पत्रा संबंधानें स्पष्ट सांगितलें कीं पुष्कळ पत्रें वजनदार आहेत आणि त्यांचे लेखांत कडक टीका असली तरी ती शिष्टाचाराची असते. अराजनिष्ठेचा लेख असतो असें वर्तमानपत्र अगदीं विरळा आढळतें.

# The Berar Samachar

MONDAY AUGUST 16 1897

Our Congress-movements have come to a stand—still. There is a lull of activity on all sides. A tone of despondency reigns supreme in the minds of the people. Famine has already crippled our resources to a large extent. The earth—quake has ruined cities and towns in Bengal. Both have multiplied hundred—fold the miseries of human life. Besides the political horizon is also dark and dismal. Lord Hamilton's speech at the prorogation of the Parliament came like a thunder-bolt over India. His speech is the central point upon which hinges the present policy of the Government of India. It is as disastrous as any thing. The arrests & prosecutions for sedious writings and disloyal acts are the outcome of the present policy. A proposal is on made to muzzle the Native press. These things combine to throw cold water on our aims and aspirations.

But such a glomy thought will not last long under the vivifying influences of the National Congress. We have learnt well the golden lesson of perseverance and constant effort. Difficulty is a severe instructor. We shall not fall back at this critical time Now is the hour to test the strength of our Congress-wallas. We hope that our good people of Berar and Central provinces will soon rise to the magnitude of the occasion. The august British rule has begun to weld the Indians into one nationality. This formation of a nation is the soundest triumph of the English administration. We shall be loyal to the last drop of our blood. We are to gain immensely in the permanence of the British empire. Let us leave off all lethargy and begin in right earnest the work of the Congress.

The Anglo-Indian rulers have begun to keep the Natives at a distance. There is a sort of indifference in their behaviour towards the Indians. The old days of harmony and sympathy continue no longer. A wrong idea works up in the minds of the ruling people. To magnify their own importance, they put at discount the loyalty of the Natives and begin to see in all their movements the first signs of a coming mutiny. But we assure our rulers that no such day will come upon India as long as the western education has its hold upon the minds of the Indians. A gulf exists between the rulers and the ruled in point of race, religion and language. We try to bridge it over but the pride and tyranny of the governing race has widened the differences. Now the conflict has reached a critical stage. There is sometimes a good philosophy in the arguments of our opponents. The Pioneer betrays an unpleasant truth though it is couched in the garb of a sarcastic language. The learned editor says that "it is not preposterously unfair to say that the result is that the 'Indian has become to us a *lying* slave and we have become to the Indian the embodiment of the Devil or 'kalazng.'"

It is well and good that the Pioneer makes such a glorious confession. We do not admit it with his qualifying adjectives. The Indian is a slave; but that he is a *lying* slave is a fact within the spacial knowledge of the writer himself. It is equally ignoble for a Government to follow the ways of Satan.

The Pionner poses himself as a trusted adviser and from his proud position speaks like a Daniel in the following terms of persuasion:—

"Last of all the art of government does not lie in treading on people's toes. And the Indian, though as yet undeveloped and degenerate, may be won to a higher place by firmness and consideration, for he is possessed of great patience, mental possibilities, pride, courage, and real gentlemanly feeling. Regard him as a child, treat him as a gentleman's son, be bland and yet be firm. If he cannot see with our eyes we are quite able to see with his as well as our own. Let us use that power soberly and steadily—and trust to Time."

The learned editor of the 'Bengali adverts in a lucid to the evils of the policy which the Government of India have set in motion at present. Bombardment by arrests and prosecutions is no good remedy. The attempt is politically suicidal. He observes:—

"In no part of Her Majesty's dominions was the Diamond Jubilee celebrated with more genuine loyalty and enthusiasm than in India; and what has been our reward? The celebration of the Jubilee has been followed by the inauguration of a repressive regime unparalleled in the annals of India, save and except during the troublous times of the Indian Mutiny. A regular raid has been commenced against the Poona Brahmins. Others have been included in the same merciless and unwise persecution; we say unwise deliberately; for nothing is more calculated to cause dissatisfaction among the people, the educated people as well as the masses, than the present extraordinary proceedings of the Government. They remind us of the days, which we trust are past and gone in Ireland, when men were persecuted for the faults of a bad administration—when the leaders of the people goaded to a just but unscathing denunciation of the Government, were charged with sedition for their outspokenness, and when there was scarcely an Irish member of Parliament who had escaped the honours of incarceration for some political offence or other. Surely the Government is not going to repeat in India the fatal blunders of their policy in Ireland; for such a policy would do no good to the Government and would be disastrous to the best interests of the people. And is such a policy necessary in India? There is no educated Indian, unless he is fit to be sent to a lunatic asylum, but must know that the British Government is the best Government his country can have under existing circumstances—that his own importance, his power and influence and all that he holds dear in life, are bound up with the existence of that Government. Let the British Government be substituted by Russian rule which is the only other possibility—for a national Government is impracticable—and where would the educated Indian be? He is not particularly anxious to commit political suicide. Under existing circumstances therefore loyalty and patriotism are indissolubly bound up together. We are loyal to the British connection, because we believe that connection to be most conducive to the best interests of India. Let that belief disappear from the mind of the the educated Indian, and his loyalty will receive an irreparable blow. We therefore refuse to believe that Mr. Tilak and his friends are guilty of sedition. They are men of sense, they know what is best for the interests of their country. In their eager desire to serve their country and to protect the Government against mistakes which it was committing, they might have used strong language. People in a state of excitement, goaded by an overwhelming impulse, are not careful as to the language they use. But incaution statements, if any, should not be magnified into the deliberate language of settled reason, and those who have uttered them should not be honoured with the honours of a state prosecution."

## वऱ्हाड

हवामान—हवेंत आर्द्रता विशेष आहे. दोन दिवस अगदीं झडीचा पाऊस लागला होता. पीकें उत्तम स्थितींत आहेत. हवेचा उपद्रव जोरावर असून खेड्यापाड्यांतून देखील हा उपद्रव मोठा आहे. ज्यांस पटकी होते त्या पैकीं निम्मे देखील वांचत नाहींत हवा रोगट आहे. दुष्काळग्रस्तांची दुर्दशा अतिशय आहे.

कापसाच्या व धान्याच्या बाजारांतील वजनामापा विषयीं व इतर व्यवस्थे विषयीं नवीन कायदा नुकताच झाला आहे. त्या कायद्या अन्वयें नियम करण्या साठीं सर्व प्रांतांतील कांहीं निवडक लोक व अधिकारी उमरावतीस मे. आवर्ड साहेब यांनीं एकत्र केले. सभा शुक्रवारीं भरली होती. येथून मेसर्स प्रीडो साहेब, दत्तात्रय विष्णु भागवत व जयकृष्ण बगाजी नाईक असे तिथे गृहस्थ गेले आहेत.

सर्जन क्याप्टन शार्मन हे इलिचपुराहून आकोल्यास सिव्हिल सर्जन होऊन आले होते. पण येथील जागीं नेमलेले बंगाल्याचे सर्जन लेफटेनंट एफ. एच. वाटलींग एम. बी हे आकोल्यास शनिवारीं येऊन, दाखल झाले. नवीन गृहस्थ मोठे विद्वान, तरुण व होतकरूं दिसतात.

गेल्या ३० जानेवारी पासून ३१ जुलै पर्यंत ४२५०० मण धान्य वऱ्हाड प्रांतांत रेलवेनें आलें आणि ३००० मण धान्य बाहेर गेलें.

लेफटेनंट टी. सी. प्लौडन असि. कमिशनर वर्ग ३, बुलढाणा यांस ७ वे एप्रिल पासून वर्ग १ चे आफिशिएटींग असि. कमिशनर नेमलें आहे.

गेल्या १ ले आगष्ट पर्यंत वऱ्हाडांत दुष्काळ-कामावर व फुकट अन्नदानावर असलेले एकंदर इसम २८९२९ होते. नवीन पीकें येई पर्यंत दुष्काळाचीं कामें चाललीं पाहिजेत.

आज तारखे पासून येथें सेशन सुरूं होणार आहे. वाशिम जिल्ह्यांतील एक खटला आहे.

यंदा वऱ्हाडच्या वकिलीच्या परीक्षेला ४३ उमेदवार आहेत.

रा. रा. यशवंत महादेव तहशीलदार, मोर्शी यांनीं १॥ महिन्याची रजा घेतली आहे आणि ते या पुढें पेनशन घेणार आहेत आणि त्यांच्या रजेंत रा. रा. पांडुरंगराव भगत डेपुटी क्लार्क आफ कोर्ट उमरावती यांस मोर्शीस तहशिलदारीवर पाठविलें.

रा. रा. गोपाळ रामचंद्र पिटके बी ए. डेपुटी इनस्पेक्टर इलिचपूर यांनीं माधव बापुजी नांवाच्या मास्तरावर बेअब्रूची फिर्याद केली होती. आरोपीनें मे डायरेक्टर साहेब यांजकडे फिर्यादी विरुद्ध खोटा अर्ज केला होता. आरोपीस तीन महिन्याची कैद व २५ रुपये दंड अशी शिक्षा झाली.

## आकोला बाजारभाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ९२॥ रुपये |
| जवारी | १३५ रु० |
| गहूं ( कांठे ) | १४० रु० |
| ,,( बनशी ) | १६० रु० |
| चणे | १२७ रु० |
| तेल | ६॥ रु० मण |
| तूप | ९॥ मण |
| सोनें | २५ तोळ |
| चांदी | ८३ |

नमुना नंबर १४२

दिवाणी कोर्टास सूचना.

आज्ञानाच्या मालमिळकतीच्या वहिवाटीचें सरटिफिकीट मिळण्याविषयीं अथवा आज्ञानाचें पालन व त्याच्या मालमिळकतीचा कबज्या करण्या लायक मनुष्य नेमण्या विषयीं सन १८९० चा आक्ट ८, कलम १० प्रमाणें.

क्लास १३ अर्जाचा नंबर २/१८९७

विद्यमान सिव्हिल जज्ज साहेब बहादूर जिल्हा अकोला यांचे कोर्टांत.

अर्जदार— पार्वती बाई

जवजे बाबुलाल

जात— ब्राम्हण

राहणार— दाहिहांडा ता० अकोट.

वरील आज्ञान पार्वतीबाई जवजे बाबुलाल जात ब्राह्मण राहणार दाहिहांडा तालुके अकोट जिल्हा अकोला याणें ( त्याच्या मालमिळतीच्या वहिवाटीचें सरटीफिकीट मिळावें ह्मणून ) ( त्याचे पालन व मालमिळकतीचा कबज्या करण्या लायक मनुष्य नेमला जावा ह्मणून ) अर्ज दिला आहे यास्तव मृत्युपत्राचे आधारे किंवा दस्तैवजावरून किंवा अगदीं जवळचे नातलगपणाचे कारणावरून किंवा इतर प्रकारें ज्या कोणी मनुष्यास रुदहू अज्ञानाचे माल मिळकतीवर सांभाळ करता या नात्यानें कबज्या करण्याचा हक्क सांगावयाचा असेल त्या सर्वास या लखानें कळविण्यांत येत आहे कीं त्यांनीं ता० २७ माहे आगष्ट सन १८९७ इ० रोजीं वरील अर्जाची चौकशी होणार आहे ते वेळीं ह्या कोर्टांत हजर होऊन आपापल्या हकीकती दाखल कराव्या.

ता० १० माहे अगष्ट सन १८९७ इ०

Tukaram Waman

सिव्हील जज्ज

☞ पुरवणी पहा.

अर्धा मनुष्य, अर्धा वानर–दिल्ली येथें शेखचांद महल्यांत एका स्त्रीला मुलगा झाला तो अर्धा वानर व अर्धा मनुष्य असून तो मुलगा अजून जिवंत आहे असें समजतें.

पंखेवाल्यांचा खर्च– कलकत्ता येथील फार्ट वुइल्याम ( सरकारी बंगला ), दमदम आणि बाकरपूर ह्या तीन ठिकाणीं पंखे ओढणाऱ्या मजूरदारांना दरसाल ३२००० रुपये खर्च येतो.

ता. १३ सप्टेंबर रोजीं सर्व लष्करी पेन्शनर लोकांनीं आपले पगार घेतले ह्मणजे त्यांच्या पावतीवर त्यांच्या आंगठ्याचा शिक्का मारून घेतला जाईल. असा सरकारचा ठराव प्रसिद्ध झाला आहे.

मधुमिश्रित नवनीत—प्यारीस येथील कित्येक हाटेलांत अलीकडे जेवणारे मंडळीला जें लोणी वाढण्यांत येतें त्यांत मध घातलेला असल्यामुळें तें विशेष मधूर लागून लोकांना फार आवडतें. लोण्यांत मध घातल्यानें लोणी पुष्कळ दिवस राहिलें तरी बिघडत नाहीं हा एक त्यापासून फायदा आहे.

अति मूल्यवान ग्रंथ—जगांत अतिशय मूल्यवान ग्रंथ ह्मटला ह्मणजे पाश्चिमात्य देशांतील "वार आफ रिबेलियन" चा ( बंडाचा, लढाईचा. ) सरकारी इतिहास असून तो अमेरिकेंतील युनायटेडस्टेटचे सरकारापाशीं आहे. त्यास आजपर्यंत ४,७७,००० पौंड खर्च झाला आहे. त्यापैकीं २,३६,८९८ पौंड छपाई व बांधणीनिमित्त खर्च झाले आहेत. बाकीचे पैसे लेखकांचे पगार, कागद, दिवाबत्ती वगैरेस खर्च झाले आहेत. सदरहू ग्रंथ पुरा होण्यास अजून ३ वर्षे लागतील, व एकंदर खर्च ६,००'००० पौंड होईल असा अदमास आहे. त्याचे २१२ भाग होणार असून त्यास एक जगाचा नकाशा व दुसरे १७८ नकाशे व जंगी अनुक्रमणिका जोडण्यांत येईल. यांत मुख्य लढाईचे देखावे, रस्ते; किल्ले, प्रसिद्ध पुरुष इत्यादिकांचे फोटोग्राफ आहेत आजपर्यंत फक्त ५१,००० प्रती खपल्या आहेत.

जगडव्याल घोडा— ह्या जगांत बैलांच्या, घोड्यांच्या ज्या मूर्ति केल्या आहेत, त्या सर्वांत इंग्लंडांत वर्कशायर येथें जो श्वेताश्व [ व्हाईटर हार्स ] तयार आहे त्याची मूर्ति मोठी आहे. त्याची लांबी १७० यार्ड आहे, याच्या डोळ्याचा व्यास ४ फूट आहे याचे कान १९ यार्ड लांब आहेत. हा एका टेकडीच्या बाजूस दगडांत खोदलेला आहे. ही मूर्ति कोणी व कां खोदली त्या बद्दल माहिती मिळत नाहीं. परंतु ही आलफ्रेड राजाच्यावेळीं तयार केलेली आहे ह्मणून दंतकथा आहे. आमचे पांडव तर इंग्लंडांत गेले नव्हतेना, आमच्या इकडील कोरीव लेण्यावर ही ताण दिसत आहे.

तारीख २९ जुलई रोजीं कुचबिहार प्रांतांत एक धरणीकंपाचा लहानसा धक्का बसला. त्याच्या योगानें नसोर नजीक मिर्झानगर या नांवाच्या शहरीं एक फार जुनाट वाडा सांपडला. हें शहर फार पूर्वी नबाबशाही होतें. हा वाडा नबाबाचा असावा असें ह्मणतात. ह्यास बाहेरील दरवाज्यास फार मोटीं लोखंडी सुमारे पाऊण टण वजनाचीं कुलूपें लावलेलीं होतीं. तेथील लोहाराचे हातून तीं कुलूपें फुटलीं गेलीं नाहींत ह्मणून कलकत्याहून लोक आणून काढावीं लागलीं. त्यांत फार मोठा खजिना असावा असें सरकारास वाटत आहे. त्याचे पुढें एक मोठी तोफही सांपडली आहे. माजिस्ट्रेट साहेब लगेंच तेथें आले. हल्लीं ती जागा पोलीस पहाऱ्यांत आहे.

सबरजिस्टरावर देखरेख— दस्तऐवज रजिस्टर करणारांपासून जास्त पैसे सबरजिस्टरांस घेतां येऊं नयेत ह्मणून त्यांजवर देखरेख ठेवण्याची कांहीं तरी व्यवस्था असणें अवश्य आहे, असें दिसून आल्यावरून सरकारानें तत्संबंधानें अशी योजना केल्याचें समजतें कीं, मामलेदार व महालकरी यांणीं त्यांला वाटेल तेव्हां रजिस्टर कचेरींत जाऊन सब रजिस्टर हजर आहेत किंवा नाहींत, दस्ताऐवज कबूल करण्यास विनाकारण कांहीं बाध होतो कीं काय व ते लोकांपाशीं जास्त पैसे मागतात कीं काय? वगैरे गोष्टींवर त्यांनीं बारकाईनें नजर टाकीत असावें; शिवाय वरील प्रकारची कांहीं हरकत रजिस्टर कचेरींत येत असेल तर त्याबद्दल लोकांनीं तत्काळ मामलेदार किंवा महालकरी यांजकडे ती अर्जानें कळवावी ह्मणजे त्यांची चवकशी होईल, अशा अर्थाची नोटीस सर्व लोकांस कळण्यासाठीं रजिस्टर कचेरीच्या दारावर लावून ठेवावी. सरकारानें केलेली ही व्यवस्था रजिस्टरांचें काम आबादाबानें व सचोटीनें चालण्यास फार चांगली दिसते.

मांसाचा पुरवठा— बाहेरच्या वसाहतींतून मांस आणून त्याचा कलकत्ता, मद्रास, मुंबई, रंगून, कराची आणि एडन येथील गोऱ्या फौजेस पुरवठा करण्याचा विचार हिंदुस्थान सरकारानें चालविला असून तत्संबंधाचे खर्चाचे अजमास मागविले आहेत शु० सू०

सर्जन मेजर एच्. ई. डीन यांनी ब्युबानिक प्लेगच्या मनुष्याच्या अंगांत पिचकारीनें सर्पांचे विष भरून त्याचा त्याजवर काय परिणाम होतो ते पाहण्याकरितां कांहीं प्रयोग करून पाहिले, त्यावरून त्याच्या असें अनुभवास आलें कीं, शेंकडा ७९ अगदीं मरणोन्मुख झालेले रोगी सर्पांच्या विषानें बरे होतात, हें खरें असल्यास ब्युबॉनिक प्लेगवर हें एक रामबाणच निवारण ह्मणावयाचें. क० त०

केरवे सोनें खातात— हा अगदीं नवीन पण फारच चमत्कारिक शोध कांहीं धूर्त व हुशार हिंदुस्त्रियांनीं लाविलेला आहे. एका गुर्जर देशीय बाईचें असें ह्मणणें आहे कीं, "केरव्यांच्या योगानें सोनें फार जलद झिजतें. ज्याप्रमाणें तांब्याचें भांडें गंज चढून झिजून जातें त्याप्रमाणेंच केरव्याचीही गोष्ट आहे. माझा स्वतःचा अनुभव असा आहे कीं, एक वर्षांत माझ्या हातांतल्या पाटल्याचें सोनें चांगलें एका तोळ्याहून जास्तच पण कमी नाहीं इतके झिजून कमी झालें. तेव्हांपासून मी साध्या बांगड्या किंवा साधे बिलवर भरूं लागले आहे. आतां केरव्याला मी शिवत सुद्धां नाहीं. मग त्याचें अंगीं काय दोष असेल तो असो. मला वाटतें केरवे ज्या कांचेचे करतात त्या कांचेंतच कांहीं तरी वाईट गंजासारखें द्रव्य असलें पाहिजे किंवा ती कांचच वाईट असली पाहिजे. त्यावांचून असें होणें मुळींच शक्य नाहीं. यावरून हौसेच्या पायीं नुकसान कसें होतें हें माझ्या देशभगिनींनीं आतां पूर्णपणें आपल्या लक्ष्यांत आणावें, व त्यांनीं केरवे मुळींच कधीं न भरतां साधे बिलवर किंवा साध्या बांगड्या भराव्या अशी मी त्यांस विनंती करितें. आठ दहा आण्यांचें पायीं पंचवीस रुपयांचें नुकसान करून घेणें यासारखें अज्ञान दुसरें कोणतेंच नाहीं. असाच दुसऱ्या कोणाचा अनुभव असल्यास त्यांनीं कृपा करून आपल्या देशभगिनींस कळविला असतां त्यांचें फार उपकार होतील. आतां कित्येक ज्ञानी स्त्रीपुरुष याबद्दल मला हंसतील. पण माझी अशी पक्की खात्री आहे कीं, "केरवे सोनें खातात." ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे. आतां ते कसें खातात किंवा कां खातात याचें उत्तर देण्याचें काम मी आपल्या हुशार, ज्ञानी अशा देशबंधूवर व देशभगिनींवरच सोपविते, कारण हा विषय शास्त्रीय आहे."

चिखलाचें स्नान चांगलें—अतां इंग्लंड, फ्रान्स वगैरे देशांतल्या स्त्रिया आपलें साबण वगैरे सोडून चिखलाकडे वळल्या आहेत असें दिसतें. ज्या बायकांस विशेष कामधंदा नाहीं, खाऊन पिऊन सुखी असतात, त्यांचें सगळें लक्ष आपली शरीरकांति उत्तम प्रकारची राहण्याला काय उपाय योजावे इकडे असतें अशा कांहीं स्त्रियांनीं आतां असा सिद्धांत काढला आहे कीं, शरीरकांति सुंदर राहण्याला चिखल फार चांगला. चिखल हा मलहारक आहे. ही गोष्ट कांहीं नवीन नाहीं. आमच्याकडील खेड्यापाड्यांतून नदीच्या तळाचा अगदीं लोण्यासारखा गाळ डोक्यांत घालून केस स्वच्छ करण्याची युक्ति सर्वत्रांना माहिती आहे. पाणथळ जमिनीवरली किंवा नदी, झरा इत्यादिकांच्या मधली चिकणमाति स्वच्छता आणण्यास व कांति सुंदर करण्यास फारच चांगली. युरोपांत कित्येक स्त्रिया आतां असें करतात कीं, आधीं एकदां चांगलें स्नान करून सगळें अंग घसून स्वच्छ धुवून काढतात, आणि मग पुसून घाम येईपर्यंत थांबतात. घाम आला, कीं मग चिकणमाती सगळ्या अंगभर सारखी लावून घेतात. हा चिखल आंगाला लावला ह्मणजे फार त्रास होत असेल असें कित्येकांस वाटेल, तर तसें वाटण्याचें कारण नाहीं. साय, दूध किंवा उटणे लावतांना ज्या प्रकारचें स्पर्शसुख होतें, त्याच प्रकारचें स्पर्शसुख या चिखलापासूनही होतें. युरोपीय स्त्रिया रात्रीं या चिखलाचें लेपन सगळ्या रात्रभर अंगावर तसेंच लावून ठेवितात. सकाळीं उठल्याबरोबर तें काढून टाकलें ह्मणजे अंगकांति किती तरी सुंदर होते असा त्यांचा अनुभव आहे.

सुगंधानें गुदमरून प्राण जाणें अगदीं शक्य आहे. ज्यांचा गंध अतोनात दरपळतो, अशीं फुलें आपल्या निजण्याच्या खालीं त ठेवणें ह्मणजे फार धोक्याचें आहे. पारिस मधील एका अत्यंत सुप्रसिद्ध नटीला एका गृहस्थानें फारच मोठा थोरला असा फुलांचा गुच्छ दिला. या गुच्छांत, सोनचाफ्याप्रमाणें अतिशय दरपळणाऱ्या फुलांची अगदीं गर्दी होती. तो गुच्छ तिनें रात्रीं आपल्या शयनगृहांत ठेविला होता. आणि दुसरे दिवशीं सकाळीं ती मेलेली सापडली. ती उठेना ह्मणून दार उघडून पाहतात तो सगळी खोली त्या फुलांच्या दर्पानें इतकी भरलेली होती कीं सारी रात्र त्या दर्पात निजल्यानें ती गुदमरूनच खाचित मेली असावी. कांहीं फुलें अशीं असतात कीं, त्यांचा दर्प फार वेळ जवळ असल्यास डोकें दुखल्याखेरीज रहातच नाहीं. मग पांच सात तास जर कपाळाशीं अशीं फुलें राहिलीं तर त्यापासून वाईट परिणाम होईल यांत नवल काय? क०

मालखंडच्या छावणींत सावधगिरीचे उपाय ज्यारीनें घेण्यांत येत आहेत. तेथील लष्करचे कर्नेल निकल् जॉन हे शत्रूची हालचाल तपासण्यास जाणार होते. पण इतक्या अवकाशांत शत्रूंनीं त्यांच्या छावणीवर व ४९ साव्या शीख रेजीमेंटवर निकरानें हल्ला केला. ही लढई सारी रात्र चालली होती. यांत शीख रेजिमेंटचा एक अंमलदार मेजर टेलर ठार मारला गेला व पुष्कळ शिपाई जखमी झाले. शत्रूंचीं संख्या फारच मोठी होती. त्यांनीं कमिसरीच्या स्टोर खात्यावर दरोडा घालून ले० मॉनलेन यांस छाटून टाकलें व शिलकेंतील दारूगोळा वगैरे लुटला. मेजर हार्बट ह्यांच्या पायांत व कर्नेल ल्यांब यांच्या जांघेत दुष्मनाच्या गोळ्यापासून जबरदस्त जखमा झाल्या आहेत. व ले० बार्लींगटण यांचा पाय तरवारीनें कांपला आहे. ह्या लढाईंत २४ साव्या पंजाब रजिमेंटचे पुष्कळ लोक ठार मेले असून कॅपटन हॉलन व त्यांच्या हाताखालील ९ आफिसर जखमी झाले आहेत. गाझी लोक हातघाईवर येऊन इंग्रजी लष्करावर तुटून पडेल होते. त्या वेळीं ब्रिटिश अंमलदारानीं रिव्हॉलवर सागनान शत्रूवर मारा चालविला होता शेवटी ब्रिटिश लष्कराची सरशी होऊन बंडखोर लोकांस पिछेहाट करावी लागली. ले० लॉरीस यांनीं पुष्कळ लष्कर बरोबर घऊन वामदारपर्यंत शत्रूचा पाठलाग केला. पळतेवेळीं शत्रूंनीं संपादन केलेला दारूगोळा रस्त्यांतच टाकून दिला होता. ह्या झकमकींत बंडखोरांनीं ७० मनुष्यें आणि शिख रजिमेंटपैकीं ४९ शिपाई व सेपर आणि माईन्सर यांतील ३ इसम असे ठार मारले गेले. शिवाय १० जखमी झाले होत. आजुबाजूच्या भागांत बंडखोरांच्या टोळ्या जमावानें असल्याची बातमी समजल्यावरून ब्रिटिश लष्करानें तोफांची व पलटणीची चांगली तयारी ठेविली होती. छावणीच्या पूर्व व पश्चिम दिशेस बंडखोरांची दोन दोन हजारांची टोळी जमलेली होती. मदरबान येथून बोलाविलेलें लष्कर मदतीस येऊन पोहोंचलें आहे. ह्या लष्करावरही मार्गांत बंडखोरांनीं हल्ले केले होत. त्यांत एक अंमलदार व कित्येक शिपाई मारले गेले. जलालकोट नांवाच्या गांवांत बंडखोर लोक लपून राहिल्याची बातमी समजल्यावरून त्याजवर तोफांचा मारा करण्यांत आला होता. रात्रीस बंडखोरांची संख्या अतिशय वाढली व त्यांची आणि इंग्रजी लष्कराची चकमक उडाली. त्यांतलें फ्राड, स्विजले, आणि मॉकनील् हे जखमी झाले. पण तोफांच्या माऱ्यामुळें बंडखोरांची फार नासाडी झाली असून त्यांनीं पिछेहाट घेतली आहे. स० वि०

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

दि. क्लास १२ मिसल नंबर ३

——

१८९७

विद्यमान सिविल ज्यडज्य साहेब बहादूर जिल्हा आकोला,

पारवती बाई जवंजे बाबूलाल वा। दहीहांडे तालुके अकोट. अर्जदार

कनह्यालाल बाबूलाल कनोजे ब्राह्मण वा। दहीहांडे तालुके अकोट विरुद्ध

सन १८९० चा अक्ट नंबर ८

कलम १० प्रमाणें

मी अर्जदार पार्वतीबाई जवंजे बाबूलाल अर्ज करितो त्याचा मजकूर खाली लिहिल्या प्रमाणे.

अ अल्पवई मुलांचें नांव बनसीलाल बापाचें नांव बाबूलाल हा पुरुष असोन हिंदु धर्म आहे. जन्माची तारीख २७ माहे आगट सन १८८७ आहे राहण्याचें ठिकाण दहीहांडे तालुके अकोट.

ब अल्पवयी स्त्री नाहीं.

क अल्पवयी मुलाच्या मिळकतीचे परीसिष्ट या अर्जासोबत तपसीलवार निराळे दाखल केले आहे. त्यात ती मीळकत कोणत्या प्रकारची व कोणत्या गांवची आहे. हे त्यात स्पष्ट लीहिले आहे. व तीची अजमास किंमत रुपये २९१९ ची आहे

ड अल्पवई मुलाच्या शरीराची व मिळकतीची रखवाली पार्वतीबाई जवजे बाबु लाल राहणार दहीहांडे तालुके अकोट इजकडेस आहे.

इ अल्पवयी मुलाचे जवळचे नातलग कोण आहेत आणि ते कोठें राहतात त्यांची नावें—

१ गिरधर वलद उकडसिंग चुलत भाऊ आहे.

१ अजोध्या व० उकडसिंग चुलत भाऊ आहे.

१ गंगादीन व० महानंद परदेशी मामा आहे.

१ भगवानदीन व० महानंद परदेशी मामा आहे.

या सर्वांची वस्ती दहिहांडें तालुके अकोट येथें राहत आहेत.

फ अल्पवयी मुलाच्या शरीराच्या किंवा मिळकतीच्या बाबतींत पालन करण्या बद्दल कधीं नेमणूक केली नाहीं.

ग अल्पवयी मुलाच्या शरीराच्या किंवा मिळकतीच्या बाबतींत पालन करण्या संबंधी या कोर्टात किंवा दुसऱ्या कोणत्याही कोर्टांत अर्जी केली नाहीं.

ह अर्ज अल्पवयी मनुष्याच्या शरीराचे पालन करण्याबदल व मिळकतीचे संरक्षण करण्याचे ठरविण्याबदल आहे.

आय— अर्जदारीण अल्पवयी मुलाची प्रत्यक्ष मातुश्री असल्यामुळें पालन करण्यास लायक आहे.

जे अर्जदारीण अल्पवयी मुलाची मातुश्री असून तिला पालन करण्याचा हक्क प्राप्त झाला आहे.

के अर्जी करण्याचीं कारणें खालील कलमांत लिहिली आहेत तीं—

एल फर्मीविलेल्या स्वरूपाप्रमाणें मजकूर खालीं लिहिल्याप्रमाणें—

१ अर्जदारीन इचा नवरा बाबूलाल यास मरण्यास सुमारें तीन वर्षे झालीं आहेत तेव्हांपासून अर्जदारीण ही अज्ञान बनसीलाल व विरुद्ध वडील मुलगा कन्हयालाल असें एकत्र राहून नवऱ्याच्या मिळकतीवर आजपावेतों निर्वाह करीत आलेले आहेत.

२ अलीकडेस जुलई सन १८९७ च्या सुमारास विरुद्ध वडील मुलगा कन्हयालाल यानें तंटा करून अल्पवयी मुलास व मला व माझी धाकटी मुलगी सुरजी यांस घरांतून काढून दिलें आहे.

३ मैत बाबुलाल याची जिनगी विरुद्ध कन्ह्यालाल हा सर्व आटपून बसला आहे.

४ सदरील मिळकतीची विरुद्ध कन्ह्यालाल हा अफरातफर करीत आहे.

वर लिहिलेले सर्व कारणावरून आज्ञान मुलाचें संरक्षण करण्यासाठीं मी योग्य आहे व मी त्याचें चांगलें पालन करीन. याजकरितां मला आज्ञान मुलाचें पालन पोषण करण्या करितां व मिळकतीची व्यवस्था करण्या विषयींचा ठराव होऊन सरटिफिकीट मिळण्या विषयीं हुकूम व्हावा. हल्लीं आज्ञान मुलगा बनसीलाल हा माझ्याच ताब्यांत आहे तारीख ६।८।९७ इ०

१ सही पार्वतीबाई जवजे बाबुलाल
निशाणी खुद्द. (०)

मी पार्वतीबाई जवजे बाबुलाल प्रतिज्ञा करिते कीं, या अर्जातील मजकूर माझ्या माहिती प्रमाणें खरा आहे. ता० मजकूर.

१ सही पार्वतीबाई जवजे बाबुलाल
निशाणी खुद्द. (०)

परीसिष्ट अल्पवयीं याच्या मालमिळकती बद्दल.

११८९ जंगम मिळकत

४९४ रूप्याचा माल

८० तोड्याची जोडी एक तोळे ८०
९० पायांतील कडे जोड १ तोळे ९०
३२ दंडवाळ्या जोड १ तोळे ३२
२१ कडे तीन हातातील तोळे २१
२१ बाहुल्याचा जोड १ तोळे २१
३३ गळ्यांतील हसळ्या तीन तोळे
१४ १२ ७
१० गजरेची जोडी एक तोळे १०
१० पाठल्याचा जोड एक तोळे १०
२० चिल्हर चांदी तोळे २० छले, अंगुस्थान मिळून एकंदर.
८० पायजिब्याचा जोड १ तोळे ८०
९० करदोडा १ तोळे ९०
१४ वाक्याचा जोड एक तोळे ९०
१२ कड्याची जोडी १ हातातील तो. १२
१२ कड्याचा जोड पोराच्या हातातील तोळे १२.
२० पवचीचे जोड तीन तोळे २०
७ साखळी गळ्यांतील एक तोळ ७
१० दुसरा पाटल्याचा जोड १ तो. १०
१२ सुतीया म्हणजे गळ्यांतील गरसोळी तोळे १२

४९४

२९२ सोन्याचा माल

३० छल्ला एक सव्वातोळ्याचा दर २४
७२ तांदळी पोत एक तोळे ३ यांत पुतळ्या ३ व पदक १ सुद्धां.
२४ कानांतील बाळ्याचा जोड १ मासे १२ दर २४.
१२ बुगडीचा जोड १ अजमास मासे ६
३६ साकळी तोळे १॥ जोड १ नग २
६० ठुशी एक तोळे २॥ किंमत
३६ नथ एक तोळा १॥ दर २४ प्र०
३६ शिक्याचे बाळीचा जोड १ लहान मोत्या सुद्धां अजमास मासे ८६
६ पानबाळीचा जोड १ मासे ८३

२९२

९३ तांब्याचा माल व पितळेचीं भांडीं वगैरे एकंदर.

१० बैलाचे घोळ व घंटे जोड ५ किं०
६ चरव्या तीन तांब्याच्या किं०
८ डकेची तांब्याची ३ किं०
७ हांडा १ तांब्याचा किं०
२१ घागर एक मोटी व लहान ६
८ लोटे पितळेचे १६
४ बटलोया पितळेच्या तीन किं०
६ गंगाळ तांब्याचे २ किं०
४॥ बहुगुणें पितळेचे चार तीन मोठे व एक लहान मिळून किं०
९ कटोरे ९ कळसाचे किं०
३ बटवे २ एक लहान व एक मोठा
६ पराती ३ मोठ्या पितळेच्या
३ ताटें लहान ६, पितळेचे व काशाचें मिळोन किं०
१॥ अपकरे २ पितळेचे किं०

९३

९०। जनावरें खालीं लिहिले तपशिला प्रमाणें.—

३९ म्हशी दोन रंग काळा अ० किं.
१९ घोडा १ रंग भुरका
३० बैल २ व गोऱ्हा एक रंगीबेरंगी
१०। बंडी १ लाकडी चाक व जू सुद्धां.

९०।

१७३॥। धान्याचा सामान.

१३१ जवारी खंडी १॥ असमास किं०
४ दाळ मुगाची पायली ८
२॥ मुग बियाचे पायली पाच
८ दाळ तुरीची मण १। किंमत
१२॥ जवारीचे बी मण ८२ किंमत.
१२ तुपाची घागर मण १॥ किंमत.

१७३॥।

४२ कपड्याचा माल खालीं लिहिल्याप्रमाणें.

३० लुगडे ६ रेशमी अजमास किंमत.
३ उपरणा एक रेशमी रुइफुली काठी.
९ खण २९ अजमास किंमत.
४ धोत्राचे पान १ रेशमी किंमत.

——

४२

——

२१८९

१३३०

३०० स्थावर मिळकत खाली लिहिलेले गावची.

दहिहाडे तालुके अकोट येथील.

२०० घर एक धाब्याचे खांब १२ ओसरी समेत वर माडी कवेलुची पुढें आंगण दिवाली समेत यासी चतुसिमा पु० मोहोनलाल याचे घर प० गिरधर वा। उकडसिंग याचे घर द० शिवदयाल याचे घर उ० अल्पवयी याचे बैलाचा कोठा अजमास किंमत.

१०० कोठा एक बैलाचा घोडनाटी नाटी ६ तीन बाजूस दिवाली आहेत याची चतुःसीमा पू० सिताराम यांचें घर, प० रस्ता, द० जहेरीबा मुा यांचें घर, उ० अल्पवयी यांचें वरील घर आहे. सदर्हूची अजमास किंमत.

——

३००

९४० मौजे वसद खुर्द तालुके अकोले येथील मिळकत ज्या प्रकारचीं झाडें असतील त्या सुद्धां.

११० शेत सर्वे नंबर १३ एकर २१८१ आकार रु. ३३ यातील १/३ हिसा

१८० शेत सर्वे नं. ९३ एकर ३६८३४ आकार रुपये ९४ यातील १/३ हिसा.

२०० शेत स. नं. ७९ एकर १२-१९ आकार रुपये २० हें शेत सालीम.

९० शेत सर्वे नं. १४ एकर ३२८२७ आकार रुपये ९० यातील १/१० हिसा.

——

९४०

४९० मौजे रोहणें तालुके अकोट येथील मिळकत– शेत सर्वे नं. ३६ एकर ३९८९ आकार रुपये ४९ सालीम शेत असलेले झाडा सुद्धां.

——

१३३०

——

२९१९

येणें प्रमाणें जंगम व स्थावर मिळकत आहे. ता. ६।८।९७

१ सही पार्वतीबाई जवजे बाबुलाल
निशाणी खुद्द. (०)

मी पार्वतीबाई जवजे बाबुलाल प्रतिज्ञा करिते कीं, सदरील वर्णनांतील मजकूर माझ्या माहिती प्रमाणें खरा आहे. तारीख मजकूर इ०

१ सही पार्वतीबाई जवजे बाबुलाल
निशाणी खुद्द. (०)

## वर्तमानसार

साल अखेर „ ७ „ १ ८८

किरकोळ अंकास ....................... ८४

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस........ ८१ ०६

दुसरे खेपेस .... .......८१

Annual in arrears 7 „ 1 Rs. 8 as

Six monthly......... 3........... 8 as

Single copy ........................... 4 as

Advertisement

Below 10 lines ...... 2 Rs

Per line over 10 ...... 4 as

Repetition Per line ... 3 a

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

YOL XXXI — AKOLA MONDAY 23 AUGUST 1897 — NO 33

वर्ष ३१ — आकोला सोमवार तारीख २३ माहे आगस्ट सन १८९७ इ० — अंक ३३



## जाहिरात

किंमत ।= केसरीकर्ते सहा आणे.

**ना० टिळक.**

पृष्टें ८० ह्यांचें चरित्र कागद ग्लेझ

पत्ताः— के. बा. सहस्रबुद्धे.

गिरगांव मुंबई.



### जाहिरात

गिरगांव मुंबई

येथील आर्यधर्म रक्षक मंडळी जवळ दुष्काळफंड १०७ रुपये ८ आणे जमले असून लवकरच ते आपला एक एजंट अनाथ मुलांची व्यवस्था करण्या करितां वऱ्हाड प्रांतात पाठविणार आहेत.



नामदार टिळक फंडाच्या मदतीकरितां

शके १८२० चें पचांग.

नामदार साहेबाचें चित्र व अल्प चरित्रासह.

नामदार बाळ गंगधर टिळक पुण्यातील प्रसिद्ध केसरी व मराठा पत्राचे चालक व मालक यांजवर चाललेल्या खटल्याचें कामीं न्यायासनापुढें वकील ब्यारिस्टरादिकांचे खर्चाकरितां फार मोठी रक्कम लागावयाची आहे, तेव्हां त्यास हस्ते परहस्ते द्रव्यद्वारा मदत करणें हें प्रत्येक देशबांधवाचें कर्तव्य आहे. ह्मणून आह्मी ह्या पंचांगांत खर्च वजा जातां जी रक्कम राहील ती या फंडाकडे देण्याचें ठरविलें आहे. या पंचांगांत नामदार टिळकांचा फोटो व अल्पचरित्र देणार आहेंत. पंचांग टाईपावर छापीत आहोंत. छपाई वगैरे सुरेख करण्यांत येईल. स्वार्थ व परमार्थ हे दोन्ही लाभ यांत होत आहेत. तरी मंडळी आळस करणार नाहीं अशी उमेद आहे फुटकळ पंचांगाची किंमत अर्धा आणा, दहा पंचांग एकत्र मागविणारास टपाल हंशील पडणार नाहीं. शंभर पंचांगें घाऊक घेणारास रु. २ पडतील. पंचांगें भाद्रपद मासांत ग्राहकांस मिळतील. मागविणारांनीं त्वरा करावी कारण फंडाचे मदतीस रक्कम जी पाठविणें ती होईल तितकी लवकर पाठविली पाहिजे. सर्व पत्रव्यवहार व पैसे खालील पत्यावर पाठवावे.

नारायण चिंतामण आठवले,

बुकसेलर्स व पब्लिशर्स, घी कांटा बडोदा


## जाहिरात

यंदा राष्ट्रीय सभा उमरावती येथें भरावयाची आहे. त्या करितां खालीं लिहिलेलें सामान भाड्यानें घेणें आहे. ज्यांस भाड्यानें देण्याची इच्छा असेल त्यांनीं खालीं सही करणारांकडे ता० ५ माहे सपटंबर सन १८९७ चे आंत मोहोरबंद टेंडरें पाठवावीं. तीं टेंडरें ता० ८ माहे सपटंबर सन १८९७ रोजीं रात्रीं ९ वाजतां वर्किंग कमिटीची सभा भरेल त्या सभेंत प्रसिद्धपणें उघडलीं जातील. भाड्यानें सामान पाहिजे आहे तें खालीं लिहिल्या प्रमाणें:—

१. खुर्च्या बिन हाताच्या साध्या ४००० पासून ५००० पर्यंत.

२. बेंट वुड चेअर्स सदरहू ३०० पासून ८०० पर्यंत.

३. कॉटस् ( साधे पलंग वेताचे अगर फळ्यांचे अगर नवारीचे ) १००० पासून १५०० पर्यंत.

४. टेबलें साधारण २५० पासून ३५० पर्यंत.

ज्याचें टेंडर पास होईल त्यांस नक्की सामान किती पाहिजे हें लागलीच कळविलें जाईल. भाड्यानें सामान खालीं लिहिलेल्या शर्तींवर घेतलें जाईलः—

( १ ) सामान स्टेशनाजवळ कांग्रेस क्यांप आहे तेथें पोहोंचतें केलें पाहिजे.

( २ ) सामान ता० १० माहे दिसेंबर सन १८९७ इसवी नंतर व ता० १५ चे आंत कांग्रेस क्यांपमध्यें दाखल झालें पाहिजे.

( ३ ) सामान कांग्रेस क्यांपमध्यें आल्यापासून तें भाड्यानें परत देई पर्यंत मोडतोडीची अगर सामान कमी आल्यास त्याची जबाबदारी कांग्रेस कमिटीवर आहे. त्या पूर्वींची व त्या नंतरची जबाबदारी कमिटीकडे नाहीं.

( ४ ) ता० २ माहे जानेवारी सन १८९८ पर्यंत सामान कांग्रेस कमिटीचे ताब्यांत राहील. त्यानंतर ज्यांचे त्यांस परत करण्यांत येईल. सामान ता० ७ जानेवारी सन १८९८ चे आंत कांग्रेस क्यांप मधून परत नेलें पाहिजे. त्या तारखे पर्यंत सामान परत न नेल्यास सामान ठेवण्या करितां लागणाऱ्या जागेचें व सामान सांभाळण्याचें भाडें सामान देणाराकडून घेतलें जाईल.

(५) ज्याचें टेंडर कबूल केलें जाईल त्यास लागलीच कांग्रेस रिसेप्शन कमिटीच्या सेक्रेटरींच्या अगर दुसऱ्या हुद्देदाराच्या नावानें करारनामा स्टांपावर लिहून द्यावा लागेल व त्यांस वरील शर्ती प्रमाणें वर्तन करण्याबद्दल करार नमूद करावे लागतील. करारा प्रमाणें वर्तन न झाल्यास अगर सामान कराराप्रमाणें पुरें व वक्तशीर न दिल्यास जें नुकसान होईल तें भरून देण्याची जबाबदारी भाड्यानें सामान देणारास पतकरावी लागेल व अमानत ५०० रुपये ठेवावे लागतील.

( ६ ) करारासंबंधी कोणत्याही बाबी बद्दल कमिटी मध्यें व करार लिहून देणारामध्यें वाद उत्पन्न झाल्यास त्याचा अखेर निकाल रा. रा. प्रल्हाद नारायण जोग वकील करतील व तो उभयपक्षांस कबूल करावा लागेल.

टीप ( १ )–टेंडरांत दर कळवितांना तें भाडें व इतर सर्व प्रकारचे खर्च हिशोबांत धरून नमूद करावे. सर्वांत कमी दराचें टेंडर कबूल करण्याचें कमिटी पतकरीत नाहीं. टेंडर नाकारल्याबद्दल कारण दिलें जाणार नाहीं.

टीप ( २ )–टेंडरें पाठविणें तीं बालबोध लिपींत स्पष्ट पत्यासह लिहून पाठवावीं.

उमरावती तारीख १८।८।९७. } रंगनाथ नरसिंह मुधोळकर. बाळकृष्ण हरी कारंदीकर. सेक्रेटरीज, रिसेप्शन कमेटी,

तेरावी राष्ट्रीय सभा,

उमरावती.

### नोटीसीचें उत्तर.

ईश्वरदास उत्तमचंद मारवाडी राहणार सावरगांव हल्लीं मुक्काम पळसी जासी तालुके जळगांव जिल्हा अकोला यांस खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं मजला तुमची नोटीस पावली ती मजला कबूल नाहीं कारण तुमचा व आमचा सरकी खंडी १०० चा सौदा असलगांवचे जिनिंग कंपौंडांत दरखंडीस ४॥।= प्रमाणें पौष वद्य ८ रोज मंगळवार संमत १९५३ रोजीं केला व दुसरें दिवशीं माप घेऊन रकम देण्याचें कबूल केलें त्याप्रमाणें तुह्मास माप घेण्यास चालण्याबद्दल सावरगांवीं सांगून मी असलगांवीं गेलों परंतु त्या दिवशीं येऊन तुह्मी माप घेतलें नाहीं अस्तमानीं सावरगांवीं येऊन तुह्मास विचारतां चौघासमक्ष स्पष्ट कळविलें कीं ८।१५ दिवस मजजवळ रकमेची सोय नाहीं तर तुह्मी दुसरे कोणास सरकी विकून टाकावी असें स्पष्ट सांगितल्यावरून त्याच दिवशीं आमचा तुमचा सौदा तुटून गेला नंतर ती सरकी मी दुसऱ्यास विकली असतां विनाकारण नोटीस जी दिली ती मजला कबूल नाहीं कळावें. तारीख १९ माहे आगष्ट सन १८९७ इसवी.

सही

सही मारवाडींत चुनिलाल चिमनीराम दुकान सावरगांव

तालुके जळगांव दस्तूर

खुद्द.

श्री

वाशीम १७।८।९७

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस,:—

अलीकडे एक दोन दिवसा पासून बरीच उघाडी पडूं लागली आहे. मधून मधून बहुतेक आकाश फक्त साभ्र दिसत असतें. धारण जवारी व गहूं अनुक्रम १५ आणे व १८ आणे पायली [ ६ शेरी ] याप्रमाणें आहे. त्यामुळें गरीब अनाथ लोकांचे व कमी पगाराच्या नोकर लोकांचे फार हाल होत आहेत. लंगडे, खुळे, आंधळे, पांगळे वगैरे अति गरीब लोकांस रोज एक वेळां चालू असलेल्या अनाथ गृहांत जेवण मिळत असेत. गांवांत भिकाऱ्यांची फारच गर्दी असते. रोग राई ह्मणण्या सारखी नाहीं. पडसा, खोकला वगैरे आजार चालूच आहेत.

रा. रा. अणाजी वामनराव देशमुख तामसालकर यांस गेल्या महिन्यांत सजा सुनावली होती हें जुलई महिन्यांतील शुद्धवऱ्हाडींत प्रसिद्ध झालेंच आहे. देशमुख मजकूर हे अपील कोर्टांत निर्दोष ठरले गेले अशी वार्ता ऐकून कोणासही संतोष झाल्यावाचून राहिला नाहीं.

येथें अलिबागकर स्त्रीमिश्रित हिंदु नाटक आलें आहे. पहिल्या एक दोन खेळास वाशीमला फार दिवस झालें नाटक आलें आहे ह्मणून, बरेच लोक महगर्ता फार फार असूनही गेले परंतु जागा इतक्या गैरसोयीची तयार केलेली दिसली कीं, पहिल्याच दिवशीं काहीं लोक पैसे वापस घेऊन स्वगृहीं चालते झाले. नाहीं, त्यांस जाणें भागच पडलें; कारण कीं, आजार उत्पन्न करणाऱ्या जागेवर बसून आंगांत जास्त सरदी शिरवून घेऊन सर्व रात्रभर जाग्रण करणें त्यांस बरें दिसलें नाहीं. वाशीमला चांगलें नाटक कधींच येत नाहीं व येण्याचा संभव नाहीं तरी गेल्या शनिवारीं त्यांनीं "मित्रपरिक्षण व रासक्रीडा" हा खेळ करून दाखविला प्रेक्षकजनांस सर्वोत्कृष्ट व फार पसंत पडला अशी वदंता आहे.

तारीख १५ मिनहू रोजीं 'देवपेठ युनीअन क्लब' मध्यें रा. बागलाल मनुलाल यांनीं भि. देवराव चि. का. यांच्या अध्यक्षते खालीं "छत्रीपासून नुकसान व घोंगडी पासून फायदा" या विषयावर निबंध वाचून दाखविला. श्रोतृसमाज बिलकूल कमी होता. निदान सर्व मेंबर लोकांनीं तरी अशा दिवशीं सदहू ठिकाणीं जमणें हेंच त्यांस योग्य आहे. याच दिवशीं जमलेल्या मेंबर लोकांनीं ( ज्यांच्या मनांतून श्रीगणपतीचा उत्सव करण्याचें होतें ) उत्सव करण्याचें सुचविलें. एक दोन मेंबर, जे अशा गोष्टीस नकार देतील असें कोणासही वाटत नव्हतें मात्र कांहींना वाटत होतें कीं, "हे +++ ह्मणतील"—त्यांनीं फांटा फोडला. तरी बाकीच्यांनीं उत्सव करण्याचें योजिलें आहे. पहावें होतो किंवा नाहीं तें. "धर्माचें काम लंगडें असतें" ही ह्मण खोटी नव्हे.

येथील शाळेचा निकाल झाला तो.

देवपेठ शाळा

| इयत्ता | पं. मु. दि. | पा. झा. | तुकडी |
|---|---|---|---|
| ४ | २३ | १६ | |
| ३ | १७ | १२ | |
| २ | २५ | २० | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | ३१ | २२ | |
| एकूण | ९६ | ७० | |
| | शुक्रवार पेठ शाळा | | |
| ४ | अद्याप संपली नाहीं | | १ |
| ४ | असें समजतें | | २ |
| ३ | समजलें नाहीं | १६ | १ |
| ३ | २६ | १७ | २ |
| २ | २० | १६ | १ |
| २ | १९ | ११ | २ |
| १ | ३७ | २८ | १ |
| १ | २१ | १६ | २ |

समजलेला रिझल्ट कळविला आहे. निकाल फार समाधानकारक दिसतो.

आपला
"क्ष"

# वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण वद्य ११ शके १८१९

हिंदुस्थानची वसूलजमा मोठी असमाधानकारक आहे. गेल्या १४ वर्षां पासून महसूलाची रक्कम व खर्चाची रक्कम यांच्या मध्यें कांहींच ताळा राहिला नाहीं. खर्च अवाढव्य वाढले आहेत आणि खर्चाचीं तोंडें मिटविण्या करितां उत्पन्नाच्या बाबी मोठ्या काटकसरीनें वाढविल्या आहेत. ही स्थिती सध्यां अगदीं दुःखमय व अनिवार्य होत चालली आहे दुःखमय स्थिती असण्याचें कारण प्रजेवरील करांचा बोजा होय. सरकारी देण्याखालीं प्रजा अगदीं पिळून गेली आहे. प्रस्तुतचा काल लढाई व मोहिम यांचा आहे. सरहद्दीवरील तंटे राजतृष्णेनें शतगुणित होत असून राज्यवृद्धीचा हव्यास राज्यकर्त्यांच्या मनोवृत्ती प्रचलित करीत आहे ह्मणून उत्तरोत्तर खजिन्याची दशा असमाधानकारक होत असून ती सध्यांच्या राजकीय चळवळीमुळें अनिवार्य आहे. सन १८८४-८५ साला पासून हीं चवदा वर्षें खर्चाचें तोंड बुजविण्यासाठीं हंगामी लोटालोटी पुष्कळ केल्या आहेत पण त्या मुळें क्षणभर वेळ मारली जाते तथापि सर्व अडचणी वाढतात व एकंदर स्थिती शोचनीय होते. चौदा वर्षांचे चार भाग कल्पिले तर आळीपाळीनें वसूलजमेंत वाढवा नंतर तूट अशा येत गेल्या असें समजेल. पहिल्या चार वर्षांमध्यें सालोसाल तूट पडत गेली आणि १८८७-८८ मध्यें ५ कोट ३ लक्ष ९० हजार रुपयांची एकूण तूट पडली. या पुढील चार वर्षें भरभराटीचीं होतीं आणि १८९१-९२ सालापर्यंत एकंदर वाढवा ६ कोटी ८० लक्ष ४० हजार रुपयांचा आसन १८९०-९१ मध्यें शिलक ३॥ कोटी पेक्षां अधीक होती आणि तितकी शिलक सन १८६७ च्या बंडापासून कधींच राहिली नव्हती. १८९२-९३ व १८९३-९४ हीं दोन वर्षें पुन्हां तुटीचीं गेलीं आणि नंतर दोन वर्षें खर्चापेक्षां उत्पन्नांत वाढवा आला. सन १८९६-९७ त सरासरी २ कोट रुपयांची तूट होती व १८९७-९८ त २॥ कोट रुपयांची तूट पडेल असा अंदाज आहे. गेल्या चौदा वर्षांत एकंदर

| | रुपये |
|---|---|
| तूट | ११,८७,०३,१०० |
| वाढवा | ९,०३,११,०८० |
| एकूण तूट | २,८३,९२,०२० |

या आंकड्यावरून हिंदुस्थानचें उत्पन्न मोठें अस्थिर व वाटेल तसें वाढण्या सारखें आहे असें वाटेल. ज्या सालीं वाढवा आला त्या वर्षीं खर्चा पेक्षां उत्पन्न फार मोठें आलें असा कांहीं अर्थ नाहीं. परंतु उत्पन्न वाढविण्या साठीं नाना युक्त्या लढविल्या आहेत पण त्या युक्त्या कायमच्या नाहींत. नवीन कर बसविणें, कर्ज काढणें किंवा अशाच प्रकारें उत्पन्न वाढविणें म्हणजे वसूलजमा कांहीं कायमची वाढत नाहीं. लार्ड एलजिन यांनीं हें साल मोठ्या पराकाष्टेनें काढलें आणि त्यांनीं आपल्या मुत्सदीपणाची कमाल केली अशा विषयीं कित्येक आंग्लो-इंडियन अधिकारी मोठा धन्यवाद गातात पण आमच्या मतें ही मोठी चूक आहे. २॥ कोट रुपयांची तूट पडेल असा वर्षाच्या आरंभीं अंदाज केला होता पण दुष्काळाचा सार्वत्रिक प्रसार, प्लेग, भूकंप, व सरहद्दीवरील लढाया या मुळें ही तूट अधीक पडेल हें उघड आहे. मुख्य तीन उपाय आहेत. कर वाढविणें, खर्च कमी करणें व कर्ज काढणें अशा तीन तोडी आहेत. या पैकीं एक, दोन किंवा तिन्ही उपाय एकदम चालू करण्यास हरकत नसावी असें प्रथम वाटतें. पण या तीन उपायांची कडेलोट अगोदरच होऊन चुकल्यामुळें सध्यांच्या स्थितीला एकही उपाय लागू पडत नाहीं. सरकारची राज्यतृष्णा मोठी आहे आणि त्यामुळें सरहद्दीवरील लढाया कांहीं कमी होऊं शकत नाहींत. लष्करी खर्च बेतालपणानें वाढलाच पाहिजे. सिव्हील कारभाराचा खर्च अगोदरच फार कमी कमी केला आहे. त्यांत ही तोडफोड केली तर सर्व कारभाराला धक्का बसेल. कर वाढविण्याची देखील अखेर मजल होऊन गेली आहे. इनकम टॅक्स, मिठावरील कर इत्यादि कर प्रजेस किती पीडाकारक झाले आहेत याची खात्री इंडियन प्रजेची स्थितीच देईल. विलायतेंत नवीन कर्ज काढणें ह्मणजे व्याजाचा बोजा इंडियावर नवीन लादण्या सारखा आहे. अगोदरच हा बोजा अती झाला असून त्या मध्यें नवीन भरती घातली ह्मणजे कर्जा खालींच या देशाचा चुराडा होईल. 'दुष्काळाचा संभव जर सरकारास कळला होता तर सरकारानें त्या संबंधी पूर्वींच योजना केली पाहिजे होती आणि त्या करितां कर्ज काढण्याची गरज लागली नसती लष्करी खर्चाच्या सदरा खालील कित्येक बाबी इंग्लंडानें देण्यासारख्या आहेत. ब्रह्मदेश काबीज केला, इजिप्तच्या लढाया जिंकल्या, सरहद्दीवरील तटबंदी व शिबंदी वाढविली, तेथील लोकांस जेरीस आणिलें इत्यादि गोष्टींचा खर्च इंडियावर सर्वथैव लादतात ही चूक सर ब्राकनबरी यांनीं रॉयल कमिशनच्या नजरेस आणून दिली. हिंदुस्थानची स्थिती मोठी चिंतावह झाली आहे. ब्रिटिश खजिन्यांतून पैसा सर फौलर यांच्या ह्मणण्या प्रमाणें कर्जाऊ दिला तरी ही स्थिती कांहीं कमी शोचनीय होत नाहीं. दाद मागणें प्रजेचें कर्तव्य आहे आणि ती मान्य होई पर्यंत सर्वांनीं एक विचारानें सरकाराशीं भांडलें पाहिजे. ही स्थिती सर्व इंडिया संबंधानें आहे तर वऱ्हाड प्रांताची दाद खर्चाच्या बाबदींत लागणें ह्मणजे कष्टसाध्यच आहे.

हिंदुस्थानच्या उत्तर सरहद्दीचा नकाशा आतां चांगला ध्यानांत घेतला पाहिजे. त्या सरहद्दीवरील सर्व रानवट जाती बंड करण्यास उभ्या आहेत आणि हें सरहद्दीचें प्रकरण मोठ्या धोक्याचें झालें आहे. ओराकझाई व आफ्रिडीस या दोन जाती अगदीं कडव्या आहेत; आणि त्यांनीं खैबरच्या तोंडाशीं असलेल्या जमरूद किल्यावर मोर्चा फिरविला आहे. कोहाट व कुरम व्हाली हे दोन भाग शत्रूकडील लोक काबीज करण्याच्या प्रयानांत आहेत सुमारें तीनशे मैल लांब पर्यंत उत्तर बाजूला ब्रिटिश लष्कर फैलावलें आहे. सुमारें ३७ हजार फौज इंग्रजांची आहे. दक्षिण बाजूल टाकी व्हाली मध्यें ७३०० फौज सामना देत आहे. जनरल करी बंड यांनीं दरबार भरून शत्रूला असें कळविलें आहे कीं जे लोक शरण येतील त्यांचें तारण केलें जाईल, पण अद्याप कोणीच लोक हार गेले नाहींत. खैबरच्या वायव्य बाजूला माहमंडस लोक उठले आहेत. लष्करावर लष्करें पेशावरकडे रवाना होत आहेत. निरनिराळ्या छावणींवर रोज कूच करण्यास तयार राहण्या विषयीं हुकूम सुटत आहेत. मोठ्या तुमूल संग्रामाची तयारी दिसते. रक्तपात चालूंच आहे. ही सरहद्दीची लढाई इंडियास सर्व प्रकारें छलकारक होईल. खर्च विनाकारण व अवेळीं होत आहे आणि ते रानटी लोक जिंकण्यांत देखील मोठासा पुरुषार्थ नाहीं.

कावूलचा अमीर ह्मणजे इंग्रजांचा पक्का दोस्त होय. सालिना या दोस्तीबद्दल अमीर सरकारास वार्षिक खंडणी मिळत असते. अमीर मोठे धुरंधर मुत्सदी आहेत. त्यांनीं आपल्या राज्यांत सक्त हुकूम फर्मावला आहे कीं ब्रिटिश सरकारा विरुद्ध कोणीही लढण्यास जाऊं नये. हा हुकूम अक्षरशः पाळला जाईल तर नामी गोष्ट होईल पण अमीराचें राज्य रानवट डोंगराळ लोकांवर असल्यामुळें त्याचा अधिकार काबुलाच्या सर्व कानाकोपऱ्यांत पाळला जाईल असें कोणी समजूं नये. कित्येक काबूली लोक अमिराच्या हुकूमाला तुच्छ मानतात आणि ते या दंग्याच्या वेळीं विरोधभाव प्रगट करण्यास माघार घेणार नाहींत. रशिया व इंग्लंड यांच्या शहांत अमीर आहे आणि त्याच्या दोस्तीवर काबूलचा दरवाजा परकीय राष्ट्रवाल्यास बंद आहे. हिमालय पर्वताच्या स्वाभाविक संरक्षणाखालींच हा देश स्वस्थ परचक्रा शिवाय आहे पण सांप्रतच्या मोहिमेनें हे रस्ते इंडियावर स्वारी करण्यास खुले होण्याचा संभव आहे. अमीराची मदत सरहद्दीवरील बंडें मोडण्यास कुचकामाची आहे अमिराच्या वर्तना बद्दल देखील संशय येण्यास कांहीं गुप्त कारणें सरकारच्या नजरेस आलीं आहेत अशी वदंता आहे. अखेर, इतकीं वर्षें दिलेलें वर्षासन कृष्णसर्पास पाजलेल्या दुधा प्रमाणें घातुक होणार नाहीं अशी आह्मास पक्की उमेद आहे.

सर भावनगरी कोणत्या विचारांचा पुतळा आहे याची कांहीं कल्पनाच करवत नाहीं. इंडियनद्वेष्ट्या आंग्लो-इंडियनाच्या हातांत हे बाहुलें बनले आहेत. वाटेल तो अद्भुत चमत्कार दाखविता येतो. सर वुलियम वेडरबर्न हे 'इंडिया' मासिक पुस्तकांतून राजद्रोहाची प्रेरणा करितात, ते अराजनिष्ठ आहेत इत्यादि आरोप करण्यास सर भावनगरी अलिकडे एका पायावर उभे आहेत. भावनगरी साहेबांची हीच मूर्ती सन १८८७ एप्रिल महिन्यांत सर वेडरबर्न यांचे गुणानुवाद गात होती सर वेडरबर्न साहेबा सारखा लोककल्याणकारी गृहस्थ विरळा! ते दहा वर्षांपूर्वीं पेनशन घेऊन निघाले तेव्हां त्यांचें स्मारक उभारण्यासाठीं सर भावनगरी मुख्य सूचना करणारे होते. लोकहितासाठीं ज्या उदार वेडरबर्न साहेबांनीं हा देश आपलासा केला आणि यावज्जीव त्याच्या कल्याणासाठीं झटू लागले ह्मणून त्या परोपकाराबद्दल कृतज्ञ सर भावनगरी अलिकडील क्षुद्र, अनिहित, व अमानुष निंदकाचा भुमिका बजावतात कीं काय हें बरोबर कळत नाहीं. सर पदवीचा महिमा असा विचित्र असेल, या शिवाय असें स्थित्यंतर होण्याचा संभव नाहीं.

ज्या इंग्रजी विद्येनें सर भावनगरी विभूषित झाले त्या विद्येवर तिलांजली सोडण्यास देखील ते मागें पुढें पहात नाहींत. इंग्रजी विद्या चांगली आहे पण ती इंडियनांस मानवत नाहीं आणि त्या विद्यामृताच्या लहानशा घोटानें इंडियन लोक मत्त आहेत. असा अक्कलेचा तारा ज्या अंतःकरणांत आपला काळोख पाडतो तेथून स्वदेशाची अपेक्षा करणारे सर्व दुष्ट विकार उद्भवतील तर त्यांत नवल काय! मिल व मिल्टन या सारख्या थोर ग्रंथकर्त्यांची मोठी अप्रतिष्ठा त्यांच्या ग्रंथाचें वाचन बंद करण्या पेक्षां कोणती असणार आहे! इंडियातील शाळा व पाठशाळा बंद केल्या आणि मिल्ल व मिल्टन सारख्या ग्रंथकारांस अर्धचंद्र दिला तर सर भावनगरी याचे मनोरथ पूर्ण होतील पण त्या कृती बरोबर इंग्रजी राज्याचे मूळ आधारस्तंभ ढासळतील, राजनिष्ठेची खरी कारणें समूळ नाश पावतील आणि अराजनिष्ठेची राज्यक्रांती होईल. मनुष्याची कर्तृत्वशक्ति फार थोडी असते पण हननशक्ती अगदीं प्रचंड असते. सर भावनगरी यांची हननशक्ति हल्लीं प्रज्वलित आहे पण त्यांच्या या कृतीबद्दल त्यांस योग्य बक्षीस सरकारांतून मिळत नाहीं याबद्दल आह्मी सर भावनगरी यांचें अभिनंदन करितों.

मुंबईस एक ब्राह्मण मास्तर व दुसरा लेक्चरर यांस पकडण्यांत आलें असून त्यांच्या जबान्या पुण्यास मि. प्लेकेट यांच्या समोर झाल्या. पुण्याच्या भयंकर खुनाशी यांचा

कांहीं संबंध नाहीं असें ह्मणतात पण खरा प्रकार पोलिसांनीं फार गुप्त ठेविला आहे. इंडियन असो, किंवा आंग्ले-इंडियन असो, जो दुष्ट घातकी खून करणारा असेल त्याचा पत्ता लागेल तर या देशावर सुदीन उगवला असें होईल.

---

* सप्तंबरच्या १ ले तारखेस मुंबई हाय कोर्टांत नामदार न्यायमूर्ती स्ट्रेची साहेब यांच्या समोर नामदार टिळक प्रभृति मंडळी वरील सेशन खटले चालणार आहेत. मि. डब्ल्यू सी. बानरजी हे विलायतेस गेल्या आगबोटीनें रवाना झाल्यामुळें ते नामदार टिळक यांच्या बचावाला येत नाहींत हें पक्कें ठरलें. आतां पुढील योजना पूर्वींच ठरली असेल आणि ती चांगली असेल या बद्दल आमची खात्री आहे. नामदार टिळक यांस द्रव्यद्वारा मदत करण्यासंबंधानें आह्मा गेल्या अंकीं विनंती केली होती तिचा योग्य आदर होईल अशी आह्मास आशा वाटूं लागली आहे. आतां वर्गणीचें काम फार लवकर झालें पाहिजे आणि अशा वेळीं कोणी संभावित गृहस्थ पुण्याहून या कामा निमित्त येईल तर मोठा फायदा होईल.

नामदार टिळक यांस मदत केली तर सरकारची इतराजी होणार नाहीं हें आह्मी पक्केपणीं कळवितों. खून केलेल्या आरोपीच्या बचावासाठीं सरकार आपल्या खर्चानें वकील नेमून देतें तर खूनापेक्षां क्षुद्र काल्पनिक अपराधाच्या जाळ्यांत सांपडलेल्या केसरीस त्याच्या सिंहासनावर पुन्हा स्थापित करण्यास मदत करणें हें खरोखर महापुण्य होय.

---

हवेच्या उपद्रवानें आकोल्यास तडाखा चालविला आहे. चांगलीं चांगलीं तरुण माणसें बळी पडलीं. कर्त्यासवरत्या बायकाही या गोळीच्या आजारानें मरण पावल्या. घरचा कर्ता पुरुष किंवा कर्ती बायको किंवा खेळतें मुल मेलें ह्मणजे किती अनर्थ त्या कुटुंबावर गुदरतात याची खरी कल्पना मनालाच होईल. ईश्वरी नेमापुढें इलाज नाहीं हीच शांतवनाची मात्रा अवशिष्ट मंडळीस घ्यावी लागते. दुःख न वुजण्या सारखें असतें पण विचारानें संसाराचें रहस्य ओळखलें पाहिजे. हल्लींच्या पटकीला औषध बरोबर लागूं पडत नाहीं. ती बळी फार घेते. हवा, स्वच्छता, राहणी इत्यादिकांवर तिचें कांहीं धोरण नाहीं. या रोगाचें बीज कांहीं अजून कळत नाहीं. दवाखान्यांतून, वैद्यलोकांकडून व इतर सुखवस्तु औषधी वाळगणाऱ्या कडून औषधाची मदत मोठी होते पण परमेश्वराची कृपा हेंच औषध इतर औषधाबरोबर संपादलें पाहिजे. परमेश्वराला शरण जावें आणि स्वस्थ रहावें !

---

The Berar Samachar
MONDAY AUGUST
23 1897

---

We hope our readers are aware that there is a certain bill on the legislative anvil in connection with the rate of interest which Civil Courts should allow between contracting parties. The interest bill is before the Imperial Legislative Council but it has been shelved for days to come. We do not know when it will be taken up again. The measure is welcome to all commercila circles. The central idea of the bill is to fix the maximum of interest which a debtor can legally promise to pay to his creditor. When this standerd is once ascertained it will strengthen the hands of Civil Courts to check the high rate of interest that regulates the money—dealings at the present time. To the large number of borrowers of loans the bill will be a sure and certain help. It will give to their dealings a commercial and a prudent basis. The difficulties of a borrower will not be so many opportunities for a money—lender to demand any sums by way of interest. Now it seems that there is a fight going on between the large number of debtors and the money—lending class. This sort of battle is well neigh in view of Æsop. We all remember his story about the battle between a dwarf and a giant. All the points were in fovonr of the giant and it was an easy job for him to dictate the terms of victory. The bill is an experiment at law—making, and attempts to do away with the uneven and unconscionable nature of the money—lending business. We cannot foresee how far the bill will answer its purpose. Time alone will solve the question. We can however say for certain that the measure will have a salutary check and will bring within reasonable limits the high rates of interest that prevail at present. The bill will of course, receive amendments. The success of such a measure cannot be predicted. What we want is to meet the evil effects of a heavy rate of interest. When we regulate the maximum rate of interest we shall perhaps have to face new circumstances altogether. These circumstances will be the outcome of the invention and ingenuity of money—lenders. Then we shall have an occasion to re-model our laws because it is very difficult to restrain the pleasure and willing consent of the parties to a contract. In this manner the bill will rather overshoot its mark. But the emergency is most pressing for such a law on the matter of interest. The extortionate interest taken for money lent takes away the commercial nature of transactions of money—lending. The bill will not affect the commercial circles because therein the rate of interest is just, moderate and equitable. But this measure will give a signal blow to the unfair transactions between the ignorant borrowers and their usurious money—lenders. Some of these Sowcars have for their proto-type Shakespear's Shylock.

We wish that the sooner the bill passes the better. The matter is very urgent and the relief it proposes to award is immense. The poor Ryot will hail with delight the appearance of such a law. In their worst moments of indebtedness over head and ears they will find a supporting staff and with it they will try to stand on their strength and resources. The new law will bring their loans within the bounds of reason, prudence and fairness of dealing.

The circumstances of Berar are most appropriate for such a legislative measure. The province is purely agricultural and there is no real trade where we can find well—established rates of interest. The necessities of an agri—culturist are the opportunities of the Sawkar. The ordinary rate is above 18 or 24 per cent per annum. It is sometimes even 36 per cent while calculations at compound interest in addition to customary allowances carry interest at 50 per cent. No body need certify that this rate is a ruinous rate of interest. It is most fatal to the prosperity and well—being of the large masses of people. It trenches upon the well-earned living of the borrowing ryots. In no business, it leaves a man free to eat the bread of his sweat. It practically reduces the indebted ryot to the position of a slave at the back of his creditor. Berar can well illustrate the worst effect of usury of an objectionable and disastrous nature. So we require most urgently a law on this subject. We have often times adverted in these columns to the extreme necessity of an agricultural bank of a semi-official character. In the absence of a law regulating the rate of interest, the institution of a bank becomes an imperative necessity. But we have neither the law nor the bank and hence we wish to move the Local Government to take a decisive step in this matter of public utility.

---

Sir M. Bhownagaree is to the front because he has begun to play a game of destruction. The whole of his education is lost upon him when he babbles out the haunting thoughts of his mind in this prattling mood:—

"I believe it is entirely the result of their limited English education. They go to your English schools and Colleges, and they read Milton's 'Areopagitica' and Mill 'On Liberty'—books admirable, no doubt, for the people for whom they were written, but absolutely unsuited to the essential conditions of Indian life. But these boys with their half-formed minds cannot discover for themselves that important distinction. They accept the whole teaching as if it applied directly to their case, and they begin to talk about a representative Government and the rights of the people, and the tyranny of foreign rule. These phrases convey no very definite meaning to their minds; but their education on Mill and Milton has made them believe that it is the correct up-to-date thing to talk and write in this style. Simultaneously you have well-meaning people in England who think that the type of Government that England has evolved for herself is suitable to the whole world, and these ignorant busy bodies write articles or send letters out to India full of nonsense about the 'down-trodden people' and the 'tyrannical Government.'"

"I am convinced of it. The education given in the Government schools is entirely literary. As a direct consequence the sons of respectable trades—people despise their fathers' trades, and insist on becoming lawyers or Government clerks. If they fail to get a berth or a practice, as most of them must fail, they abuse the Government. We are deliberately manufacturing in India a vast educated, or semieducated class, who by the very nature of things must be disaffected."

What logical sequence of arguments runs between the evil he depicts and the remedy he suggests can be best seen in his rhapsody on technical education as the saviour of the impending mutiny:—

"And the remedy——"

"The remedy is to go back to the industrial education of the past, adapting it to modern needs. India might be immediately wealthy if only the people of the country would develop the industries which lie ready to their hand, but, instead of learning new industries, our people are fast unlearning the very trades which made their fathers properous. Articles of European manufacture are constantly, replacing native products while we are sending abroad raw materials which we ought to work up ourselves. What I want is to see these old trades retaught and new ones too. A country is not made rich by lawyers and Governments clerks, but by artisans and men of business. But in India the Government leaves these wealth—producers to shift for themselves and spends the taxes of the the people in multiplying a class that is already excessive, and therefore seditions. That is the the root of the evil, until it is remedied I can see no hope of permanent improvement."

---

## वऱ्हाड

हवामान— मध्यंतरीं उघाडी चांगली होती. अजून गारवा वाटत नाहीं. उकाडा होतो. दोन दिवस बरा पाऊस पडला. एकंदर पाणी १६ इंच झालें. हवेचा उपद्रव अकोल्यास फार आहे. दुष्काळ अद्याप आहे. लोकांची दैना अतिशय होते. गेल्या आठवड्यांत ८८ जणांस वाखा झाला आणि त्या पैकीं ९३ मरण पावलें. गेल्या एप्रील २६ पासून एकंदर १९३ मनुष्यें मरण पावलीं.

मि० झैनऊन आबुद्दीन बिलग्रामी, आनररी अब्याची, यांस उमरावती जिल्ह्यांत वर्ग २ ची माजिस्ट्रेटी फटक्याची शिक्षा देण्याच्या अधिकारासह देण्यांत आली.

असि० कमिशनर, ए० असिस्टंट कमिशनर आणि इतर अधिकारी यांची डिपार्टमेंटल परीक्षा उमरावतीस तारीख १९ सप्टेंबर पासून सुरूं होणार आहे.

कारंजाच्या बेंच माजिस्ट्रेटचा अध्यक्षपणा रा० रा० रामकृष्ण श्रीधर यांस देण्यांत आला. पूर्वींचे अध्यक्ष रा० रा० प्रयागजी लीलाधर यांस पुरेशी फुरसत नसते ह्मणून ही योजना करावी लागली.

मे० कमिशनर साहेबांनीं नायब तहशिलदारीमध्यें खालील बदल्या केल्या आहेतः—

| रा० रा० | बदलीचें ठिकाण |
| --- | --- |
| दवलत झाबाजी | अकोला |
| अबदूल अझीज | जळगाव |
| शेख महमद इशाक आफिएटिंग | मलकापूर |

मि० ए. एफ. हिजिन्स एक्झिक्युटिव इंजिनिअर यांस रेसिडेंटचे सेक्रेटरी पब्लिक वर्कस खात्या संबंधानें नेमण्यांत आलें.

गेल्या जून महिन्यांत या प्रांतांत ९७३८ मनुष्यें जन्मलीं आणि १०३६८ मनुष्यें मरण पावलीं. मरणाचें प्रमाण अधिक आहे.

ब्रिगेड सर्जन ले० कर्न० सी. लिटल एम. डी. यांची बदली सध्यां फारीन खात्यांत रेसिडेन्सी सर्जनचे जागीं झाली असून सध्यां डाक्टर सी. एल. स्वेन एम. डी. हे वऱ्हाडचे सानिटरी कमिशनरचें काम पहात आहेत.

---

## आकोला बाजारभाव

| | दर खंडीस |
| --- | --- |
| आळशी | ९६ रुपये |
| जवारी | १३० रु० |
| गहूं ( कांठे ) | १४० रु० |
| ,, ( बनशी ) | १६० रु० |
| चणे | १२७ रु० |
| तेल | ७ रु० मण |
| तूप | ९॥ मण |
| सोनें | २९ तोळा |
| चांदी | ७६ |

---

## वर्तमानसार

डाक्टर लोक इतर धंद्यांतल्या लोकांपेक्षां लौकर मरतात.

लंडन शहरच्या केरकचऱ्याचें उत्पन्न दरसाल १२,००० पौंड होतें.

दुष्काळामुळें हैदराबादची स्थिति फार भयंकर झाली आहे.

गेल्या पंधरवाड्यांत हिंदोस्तानच्या ८,००० गांसड्या हांगकांग येथें विकल्या गेल्या.

अफगाणिस्थानांत टोळ उत्पन्न झाले असून ते शेतें व फळफळावळ यांची नासाडी करितात.

मध्यप्रांतांतील तलेगांम आणि श्रीपत या ठिकाणीं विहिरीकरितां जमीन खणीत असतां तेथें कोळशाच्या खाणी सांपडल्या आहेत.

आ० व०

जुबिलीच्या दिवशीं इंग्रजांनीं हिंदुस्थानावर आणलेले संकट या नावाचें एक लहानसें पुस्तक इंग्लडांत, स्काटलंडांत, व ऐर्लंडांत बरोबर वाटण्यांत आलें असल्याचें कळतें.

गाजीपुरास एक ७५ वर्षांचा म्हातारा आहे. त्याला अनिरुद्धसिंह या नावानें लोक हाक मारतात. तो म्हातारा झाल्यामुळें त्याचें केस पांढरे झाले होते ते आतां पुन्हां कृष्णवर्ण होऊं लागले आहेत.

सार्किलर—शाळामास्तरांच्या सभा वर्षांतून एकदां रत्नागिरी जिल्ह्यांत कोठें तरी भरून त्यांत शालोपयोगी विषयावर संभाषणें होत असत. ह्या सभास आजपर्यंत वरिष्टांची परवानगी नको होती; परंतु आतां अशा प्रकारच्या सभा झाल्यास त्या कोठें भरणार; त्यांचें काम किती दिवस चालणार; व त्यांत कोणकोणत्या विषयाची चर्चा व्हावयाची, हें विद्या खात्याचे डायरेक्टर साहेबांस अगाऊ कळवून त्यांची लेखी परवानगी घेतली पाहिजे व ह्या सभा डेपुटी एज्युकेशनल इनस्पेकर यांच्या अध्यक्षतेखाली भरल्या पाहिजेत. शाळेंतील अभ्यासक्रम; ठरलेले नियम व हक्क ह्या संबंधानें सभेंत चर्चा करूं नये, असें विद्या खात्या कडून शाळामास्तरांस सरक्युलर आल्याचें समजतें. मास्तरांनीं सभेच्या फंदांत पडूं नये असें सांगण्याचा ह्याचा भावार्थ दिसतो.

म० मि०

एकानें असा अदमास काढला आहे कीं, हिंदुस्थानांत आतां २०,००,००० लोक इंग्रजी वाचतां येणारे आहेत.

फुलें इतकीं असंख्य आहेत; पण अजून अगदीं संपूर्णपणें काळें असें फुल सांपडलें नाहीं.

सर्पांच्या एकंदर जाती ७०० आहेत असा तद्विषयज्ञांनीं शोध लाविला आहे.

असें म्हणतात कीं, शीळ वाजविणें हें फुप्फुसांस ताकद येण्यास फार उत्तम. क्षय रोग हटतो.

ठेंगण्या लोकांपेक्षां उंच लोक जास्त दिवस जगतात, आणि वसंत ऋतूंत जन्मलेल्या लोकांची प्रकृति इतरांच्या मानानें फार सदृढ असते.

प्रशियांत स्टारगार्ड शहर आहे तेथें सन १८४० त केलेल्या पोलीसखात्याच्या कायद्यांतील एक कलम जें आज तारखेस अमलांत आहे—तें असें आहे:— "ह्या शहरांत रस्त्यांत तमाखू ओढण्याची सक्त मनाई आहे, व जो कोणी ह्या नियमाविरुद्ध वर्तन करील त्यास दंड होईल अथवा जितके मार्क (तेथील नाणें) दंड सांगितला असेल तितके फटके मारण्यांत येतील." तेथील पुष्कळ चांगल्या सभ्य गृहस्थांस हा कायदा मोडल्याबद्दल दंड झालेला आहे. प्राचीन काळीं तमाखू ओढण्याबद्दल कित्येक ठिकाणीं कडक शिक्षा होत असे. सतराव्या शतकाच्या आरंभीं रशियांत तमाखू ओढणाऱ्याचें नाक कापीत असत. मोरोको येथें त्यास कैद करीत असत व नंतर भररस्त्यांतून फटके मारीत मारीत त्याची रस्त्यांतून मिरवणूक काढीत असत.

नारवे देशांत असा कायदा झाला आहे कीं, मुलीचें लग्न, तिला सैपाक पाणी, लिहिणें वाचणें, हिशेब करणें वगैरे गृहव्यवस्थेला लागणाऱ्या गोष्टी चांगल्या आल्या खेरीज मुळींच करूं नये.

आयर्लंदांत शेंकडा सत्तर लोक अविवाहित आहेत. स्काटलंदमध्यें शेंकडा पांसष्ट आहेत. आणि युनायटेड स्टेटमध्यें शेंकडा पन्नास आहेत.

सिमल्याची तार सांगत्ये कीं, मद्रास इलाख्यांतील दुष्काळ स्थिती भयंकरच आहे. चाऱ्याच्या तोट्यामुळें गुरें पटापट मरत आहेत. धान्याची महागाई वाढत आहे. मुंबई, डेकन, अपर बर्मा यांतला प्रकारही भयप्रदच आहे. इतर ठिकाणची स्थिति मात्र सुधारत असून पिकांची आशा दिसत आहे. धान्याची स्वस्ताई होत असल्याचें कोठेंही आढळत नाहीं ही विशेष काळजीची गोष्ट आहे. पंजाबांतही महागाई वाढतच आहे.

केसरीकर्ते आन. मि. टिळक यांस आज दोन दिवस मुंबईस ताप येत आहे. ब्रेनफिवर नांवाचा हा ताप असून आज दोन दिवस १०३ डिग्रीप्रमाणें बसून राहिला आहे. डा. देशमुख व दुसरे उपचार करीत आहेत. सध्यां प्रकृती बरी आहे.

अतिवृष्टीनें जमीन खचली—रत्नागिरी येथून नजिक मार्टेबांबर गांवीं लागवन म्हणून कोड आहे, त्या ठिकाणीं पंधरा दिवसांपूर्वी झालेल्या अतिवृष्टीनें सुमारें १॥ बिघा क्षेत्राची जमीन कंबरभर खोल खचली. त्या क्षेत्रांत पुरुष पुरुष खोलीचे मोठाले खड्डे पडून आंतील शेतीचा नाश झाला, व झाडें उपटलीं असें झाल्याचें तिकडून आलेले लोक सांगतात.

हें सरहद्द प्रकरण घटकोघटकीं निराळेंच स्वरूप दाखवूं लागलें आहे. प्रथम टोची प्रकरण सुरू झालें, नंतर मालाखंड झालें व आतां त्यांतच आज काय स्वाती उठलें तर उद्यां विशाखा उठलें अशा बातम्या येऊं लागल्या असून मारझोड व कुटाकुट चालू असून माणसेंहि जाया होत आहेत. पण हें प्रकरण हिंदुस्थानच्या खजिन्यास भिकारी करण्यास बरें कारण होईल असें वाटत असल्यामुळें वाईट वाटतें.

चकदारा आणि मालाखंड यांच्या दरम्यान पुनः तारा तुटूं लागल्या.

मालखंड वगैरे प्रांतांत जास्त फौज जात आहे.

मेचनी किल्याकडे मोमंद लोक लढाईची तयारी करीत असावेत असें दिसतें.

या स्वारीचें काम दिवसेंदिवस वाढत असल्यामुळें फौजेची अवश्यकताही वाढत आहे व त्याप्रमाणें पुणें वगैरे ठिकाणची फौज झपाट्यानें तिकडे रवाना होत आहे.

भोपाळच्या हद्दींत दुष्काळानें कहर उसळल्यामुळें लोक अन्नाविणें प्राण पटापट टाकताहेत. रस्त्याच्या आजूबाजूस प्रेतें पडलेलीं आढळतात. लोकांनीं त्रासून बाजारही लुटले!

स्त्रियांस दूध येण्यावर औषध—बाळंतशेव २ तोळे रात्रीं पाण्यांत भिजत घालून सकाळीं वाटून गाळून त्यांत दूध ४ तोळे साखर १ तोळा व तूप अर्धा तोळा या प्रमाणें घालून ७ दिवस द्यावें.

शैत्यापासून कपाळ दुखेल त्यावर उपाय—नागळाची ओली मुळी व सुंठ उगाळून लावावी तात्काळ कपाळ राहतें.

पेकीन शहरांत एकंदर ८०,००० भिकारी आहेत. इतके भिकार दुसऱ्या कोणत्याही शहरांत नाहीं म्हणतात.

डोंगरगांव [ ता० राजापूर ] येथें रा. रा. गो. भा. रानडे यांनीं टाकाचा मागील दांडा तयार करण्याचें काम चालविलें आहे. टांकहि तयार झाले पाहिजेत, परदेशाच्या वस्तूस रजा दिली पाहिजे त्यावांचून उर्जीत दशा येणें दुरापास्त आहे.

चालू सालांत मुंबई इलाख्यांत नव्या ५।६ गिरण्या चालू होतील. असा अदमास आहे.

शिंदे महाराजांच्या दरबारांतील इंग्रज सरकारचे रेसिडेंट मि० मार्कीव्हर हे मृत्यु पावल्याची दुःखद बातमी तारेंतून आली असल्याचें कळतें.

फिरोजपूर येथील डाक्टर साहेबांचे बंगल्यांत चोर शिरून १० हजार रुपयांचा विषय चोरीस गेला.

बरद्वान तालुक्यांतील दामुदा नदीला महापूर आल्यामुळें परगरम हें खेडेगांव समूळ वाहवलें ८ मैल पावेतों हजारों झोंपड्या वाहून गेल्या. पेरलेल्या धान्याची अगदीं नासाडी झाली. पुष्कळ ठिकाणीं रेल्वेची लाईन वाहून गेली. ती दुरस्त करण्यास बराच काळ लागेल या नदीचें पाणी ५०० फूट जमिनीवर पसरलें होतें.

कलकत्यास एका घराचा पाया खोदीत असतां जमिनींत पाण्याचा प्रवाह आढळून आला. हिंदुस्थानांत अद्यापी पाऱ्याची खाण कोठेंहि लागली नाहीं, ही प्रथमच नजरेस आली आहे.

दरोडा—पाथर्डीस मोठा दरोडा पडला दरोडेखोर सुमारें १५० होते. प्रथम पोलिस लोकांवर हल्ला करून त्यांचीं हत्यारें घेऊन त्यांस मारहाण करून गांवांतील व्यापाऱ्यांचीं घरें लुटलीं. १०।१५ हजारांचा ऐवज नेला. दरोडेखोर धरून आणिले आहेत असें समजतें.

आगगाडी न थांबवितां उतारूंस आंत घेण्याची आणि बाहेर जाऊं देण्याची एका चतुर मनुष्यानें युक्ति काढली आहे.

अबिसिनियामध्यें कधींच पाणी न पिणारीं जनावरें आहेत.

न्यूयार्क अमेरिका येथें पाण्या प्रमाणें दुधाचे नळ आहेत व दूध किती घेतलें हें समजण्याकरितां यंत्राचाच उपयोग होतो.

यहुदांनीं आपल्या तरुण मुली ठेऊन देशांतून जावें असा हुकूम रशिया सरकारानें केल्याचें समजतें खरें असल्यास हा भयंकर जुलूम आहे.

शबकादर येथें एक लढाई होऊन त्यांत शत्रूचे ३०० मेले.

या कामाकरतां लागणारी फौज व सरंजाम सुमान यांची जारीनें जमवाजमव चालेली असून रजेवर गेलेल्या डाक्टरांच्या रजा रद्द करून कामावर हजर होण्याचे हुकूम झाले आहेत.

पेशावरची बातमी सांगते कीं, मोहमंद लोकांचा जमाव वाढत असून पुन्हा कुलाई होण्याचा रंग आहे.

जर्मनीचा बादशहा रशियाच्या झारास भेटावयास गेला आहे.

स्पेन देशाचा मुख्य प्रधान कास्टिलो यास कोणी मारेकऱ्यानें तीन बार काढून ठार मारले. राजा नको म्हणणाऱ्या मंडळी पैकीं एकास फासावर चढविल्यामुळें त्याचा सूड असा उगवून घेण्यांत आला असें म्हणतात.

जर्मनबादशहा आपल्या राणीसह रशियन बादशहास भेटण्यास गेला. त्यांस सन्मान देण्याकरितां रशियन बादशहा आपल्या राणीसह बंदरावर सामोरा गेला होता. आगतस्वागत व थाटमाट झाला. बोलणें चालणें व खलबतही झालें शांतता राखण्याच्या कामांत माझी सर्व शक्ती रशियाच्या बाजूची राहील अशा अर्थाचें जर्मनबादशहानें रशियनबादशहास अश्वासन दिलें. युरोपांतल्या सगळ्या राजांस जर शांतताच राखावयाची आहे तर फौजा वाढविण्याचें कारण काय?

युरोपांतील तुर्कस्थानचीं वर्तमानपत्रें हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्याबद्दल बोटें मोडीत आहेत.

गेल्या लढाईत जो जय मिळाला त्या बद्दल टर्की सरकार आपल्या शिपायांस तरवारी इनाम देत आहे.

पैशाच्या अडचणीमुळें घेतलेला थिसली प्रांत सोडतां येत नाहीं आणि लढाईच्या खर्चाचा दाहा लाखांचा पहिला हप्ता हातांत पडणार नाहीं तर आमची फौज पुढें चाल करीतच राहील असें टर्कीनें ग्रीस सरकारास कळविलें. त्यावर ग्रीसचें म्हणणें कीं नवें कर्ज काढल्यावांचून रकम देण्यास कांहीं साधन नाहीं.

इजिप्तची फौज व दर्वेशी लोक यांची एक लढाई होऊन त्यांतले २०० दर्वेशी मात्र जिवंत गेले. बाकी ठार झाले. इजिप्तच्या फौजेंतले २१ मेले व ६१ जखमी झाले.

हिंदुस्थानच्या जमाखर्चांत फारच थोडी तूट आली म्हणून विलायतचीं पत्रें हिंदुस्थान सरकारची पाठ थोपटीत आहेत.

तीन कोटींचें कर्ज कमींतकमी ९७॥ च्या भावानें घेण्यांत येईल असें हिंदुस्थानसरकारानें फर्माविलें आहे.

मद्रास इलाख्यांतील बऱ्हाणपूर येथील एका कालेजास कालिकोटा येथील जमीनदारानें एक लाख रुपये देणगी दिली.

ठा. भ.

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

... ,, ... ,, ... 
किरकोळ अंकास ........................ ८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........ ८१ ०६
दुसरे खेपेस .... ........ ८१

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Six monthly........ 3 ............ 8 as
Single copy .......................... 4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ...... 4 as
Repetition Per line .... 3 as

YOL XXXI — AKOLA MONDAY 30 AUGUST 1897 — NO 34

वर्ष ३१ — आकोला सोमवार तारीख ३० माहे आगस्ट सन १८९७ इ० — अंक ३४

## जाहिरात

किंमत ।= केसरीकर्ते सहा आणे.

**ना० टिळक.**

पृष्ठें ८० ह्यांचें चरित्र कागद ग्लेझ

पत्ताः— के. बा. सहस्रबुद्धे.
गिरगांव मुंबई.

## जाहिरात

यंदा राष्ट्रीय सभा उमरावती येथें भरावयाची आहे. त्या करितां खालीं लिहिलेलें सामान भाड्यानें घेणें आहे. ज्यांस भाड्यानें देण्याची इच्छा असेल त्यांनीं खालीं सही करणारांकडे ता० ५ माहे सपटंबर सन १८९७ चे आंत मोहोरबंद टेंडरें पाठवावीं. तीं टेंडरें ता० ८ माहे सपटंबर सन १८९७ रोजीं रात्रीं ९ वाजता वर्किंग कमिटीची सभा भरेल त्या सभेंत प्रसिद्धपणें उघडलीं जातील. भाड्यानें सामान पाहिजे आहे तें खालीं लिहिल्या प्रमाणें:—

१. खुर्च्या बिन हाताच्या साध्या ४००० पासून ५००० पर्यंत.

२. बेंट वुड चेअर्स सदरहू ३०० पासून ८०० पर्यंत.

३. कॉटस् ( साधे पलंग वेताचे अगर फळ्यांचे अगर नवारीचे ) १००० पासून १५०० पर्यंत.

४. टेबलें साधारण २५० पासून ३५० पर्यंत.

ज्यांचे टेंडर पास होईल त्यांस नक्की सामान किती पाहिजे हें लागलींच कळविलें जाईल. भाड्यानें सामान खालीं लिहिलेल्या शर्तींवर घेतलें जाईलः—

( १ ) सामान स्टेशनाजवळ कांग्रेस क्यांप आहे तेथें पोहोंचतें केलें पाहिजे.

( २ ) सामान ता० १० माहे दिसेंबर सन १८९७ इसवी नंतर व ता० १५ चे आंत कांग्रेस क्यांपमध्यें दाखल झालें पाहिजे.

( ३ ) सामान कांग्रेस क्यांपमध्यें आल्यापासून तें भाड्यानें परत देई पर्यंत मोडतोडीची अगर सामान कमी आल्यास त्याची जबाबदारी कांग्रेस कमिटीवर आहे. त्या पूर्वींची व त्या नंतरची जबाबदारी कमिटीकडे नाहीं.

( ४ ) ता० २ माहे जानेवारी सन १८९८ पर्यंत सामान कांग्रेस कमिटीचे ताब्यांत राहील. त्यानंतर ज्यांचे त्यांस परत करण्यांत येईल. सामान ता० ७ जानेवारि सन १८९८ चे आंत कांग्रेस क्यांप मधून परत नेलें पाहिजे. त्या तारखे पर्यंत सामान परत न नेल्यास सामान ठेवण्या करितां लागणाऱ्या जागेचें व सामान सांभाळण्याचें भाडें सामान देणाराकडून घेतलें जाईल.

(५) ज्याचें टेंडर कबूल केलें जाईल त्यास लागलीच कांग्रेस रिसेप्शन कमिटीच्या सेक्रेटरींच्या अगर दुसऱ्या हुद्देदाराच्या नावानें करारनामा स्टांपावर लिहून द्यावा लागेल व त्यांस वरील शर्तीप्रमाणें वर्तन करण्याबद्दल करार नमूद करावे लागतील. करारा प्रमाणें वर्तन न झाल्यास अगर सामान कराराप्रमाणें पुरें व वक्तशीर न दिल्यास जें नुकसान होईल तें भरून देण्याची जबाबदारी भाड्यानें सामान देणारास पतकरावी लागेल व अमानत ५०० रुपये ठेवावे लागतील.

( ६ ) करारासंबंधी कोणत्याही बाबी बद्दल कमिटी मध्यें व कगर लिहून देणारामध्यें वाद उत्पन्न झाल्यास त्याचा अखेर निकाल रा. रा. प्रल्हाद नारायण जोग वकील करतील व तो उभयपक्षांस कबूल करावा लागेल.

टीप ( १ )–टेंडरांत दर कळवितांना तें भाडें व इतर सर्व प्रकारचे खर्च हिशोबांत धरून नमूद करावे. सर्वांत कमी दराचें टेंडर कबूल करण्याचें कमिटी पतकरीत नाहीं. टेंडर नाकरल्याबद्दल कारण दिलें जाणार नाहीं.

टीप ( २ )–टेंडरें पाठविणें तीं बालबोध लिपींत स्पष्ट पत्यासह लिहून पाठवावीं.

उमरावती तारीख १८।८।९७. } रंगनाथ नरसिंह मुधोळकर. बाळकृष्ण हरी करंदीकर. सेक्रेटरीज, रिसेप्शन कमेटी,

तेरावी राष्ट्रीय सभा,
उमरावती.

## जाहिरात

सर्वत्र लोकांस आणि मुक्ताई मर्द रावजी राहणार हिवरखेड यांस.

या लेखानें कळविण्यांत येते कीं मौजे हिंगणी येथील सर्व्हे नंबर १४ व १६ हीं दोन शेतें खालीं सही करणार याच्या अविभक्त कुटुंबांतली आहेत. त्यांच्यावर मुक्ताई मर्द रावजी इचा स्वामित्वाचा कांहीं हक्क नाहीं. आणि तीं शेतें विकण्यास, गहाण ठेवण्यास, दान देण्यास किंवा इतर प्रकारें त्यांची व्यवस्था करण्यास मुक्ताई इला कांहींच अधिकार नाहीं. तिनें गैर कायदा या शेतांची विल्हेवाट केली तर जो कोणी तिच्याशीं या इस्टेटी संबंधानें व्यवहार करील तो आपल्या जातीच्या जबाबदारीवर करील आणि त्याला ही इस्टेट कोणत्याही प्रकारें जबाबदार राहणार नाहीं. कळावें तारीख २४ आगष्ट १८९७ इसवी.

सही

भिवराज वल्लद सखाराम शिंपी राहणार हिवरखेड निशाणी हातची खुद असे.

**वऱ्हाडसमाचार**

मिती भाद्रपद शुद्ध ३ शके १८१९

ब्रिगेड सर्जन-लेफ्टेनंट-कर्नल सी. सी. लिटल एम. डी. यांच्या सानिटरी कमिशनरी खालीं सालोसाल देवीखात्याची सुधारणा होत आहे हें कळविण्यास आनंद वाटतो. या खात्याचें काम अलिकडे फार समाधान कारक रितीनें चालतें आणि दरवर्षी आदले वर्षापेक्षां कामाची वाढ चांगली दिसून येते. सन १८९६-९७ सालीं एकंदर १,२०,१११ माणसांस देवी काढण्यांत आल्या १८९५-९६ सालापेक्षां १३५०६ अधीकं इसमांस देवी काढण्यांत आल्या. त्यापैक प्रथमच ज्यांस देवी काढल्या असे इसम ९८५९४ निघाले. या पैकीं शेंकडा ९६-८ इसमांच्या देवी चांगल्या ठळक उमटल्या ही गोष्ट देवीखात्यास भूषणास्पद आहे. दुसऱ्या खेपेला देवी २१७७७ मनुष्यांस काढल्या. आदले वर्षीं पेक्षां हें प्रमाण दिढीनें वाढलें आहे. वऱ्हाडच्या लोकसंख्येच्या मानानें प्रत्येक हजारापैकीं ३४.५ इसमांस देवी काढण्यांत आल्या. ६ महिन्या खालील मुलाला बहुधा देवी काढीत नाहींत.

देवी काढल्यानें किती मनुष्यें देवीच्या आजारा पासून वाचतात याचें अनुमान खालील आंकड्या वरून चांगलें लक्ष्यांत येण्या सारखें आहे:—

| पांच वर्षें | दर हजारी किती इसमास देवी काढल्या | दर हजारी देवीच्या आजारानें किती माणसें मेलीं |
|---|---|---|
| १८६८-७२ | [illegible] | २.०२ |
| १८७३-७७ | [illegible] | १.५६ |
| १८७८-७२ | ३१.२ | .५८ |
| १८८२-८७ | ३४.६८ | .३८ |
| १८८८-९२ | ३५.८ | .२ |
| १८९३-९६ | ३३.३७५ | .१९ |

वरील आंकड्यावरून गेल्या २८ वर्षांत देवीखात्याच्या कामाची जसजशी वृद्धि होत गेली तसतसें देवीच्या आजारापासून होणाऱ्या मृत्यूचें प्रमाण कमी कमी होत चाललें आहे. कांहीं वर्षांनीं या देवीच्या रोगाला या प्रांतांत थाराच मिळूं नये असें अनुमान निघतें.

वऱ्हाडांतील मुनसिपालिट्यांस देवी सक्तीनें काढण्याचा कायदा लागूं केला त्या पासून एकंदरीनें चांगला फायदा झाला आहे. प्रथमतः थोडा अडथळा लोकांनीं केला परंतु आतां या कायद्याच्या अंमलबारीला लोकांची सर्वदा अनुकूळता दृष्टीस पडते हें सुचिन्ह होय.

देवी काढण्याला जी लस लागते ती कशी पैदा करितात, तिचें जतन कसें करितात इत्यादि गोष्टींचा उल्लेख सानिटरी कमिशनर साहेबांनीं केला आहे. त्यांतील कांहीं महत्वाची माहिती आम्ही खालीं घेतली आहे. सानिटरी कमिशनरचे जागीं डाक्टर लिटल साहेब सन १८७८ च्या आक्टोबर महिन्यांत आले. तेव्हां पासून देवीसाठीं लस गाईपासून घेण्याची वहिवाट आहे. गाईची लस उपयोगांत वऱ्हाडांत येत असल्यामुळें सरकारांतली विलायतची लस या प्रांतास मुळींच लागत नव्हती; आणि १८८२ मध्यें गाईची लस वऱ्हाडांतल्या प्रमाणें इतर प्रांतांत उपयोगांत आणावी अशा विषयीं इतर स्थानिक सरकारास देखील सूचना झाली होती. सन १८९० पर्यंत गाईची लस उपयोगांत येत होती तथापि ती लस मुलाच्या हातांत टोंचून घातल्या नंतर त्या मुलाच्या लशीनें दुसऱ्या मुलांस देवी काढण्यांत येत असत. परंतु मुलाच्या लशीनें देवी काढण्या पासून पुष्कळ तोटे आहेत असें दिसून आलें. मुलाच्या लशीनें काढलेल्या देवीचा भाग फार फुगून मोठा तापकारक होई आणि शिवाय एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं नेण्यास मोठी अडचण पडत होती. तसेंच हलक्या ज्ञातींतील मुलाच्या लशीनें वरिष्ठ ज्ञातींतील मुलास टोंचण्याला देखील धर्मसंबंधी प्रत्यवाय येत असे. आणि त्याच सुमाराला दुसरी ओरड चालली होती कीं मुलाच्या लशीनें देवी काढल्या पासून रक्तपिती सारखे महारोग संसर्गानें प्रसृत होण्याचा संभव आहे ह्मणून मोठी भिती दर्शविण्यांत असे. या अनिवार्थ संकटामुळें मुलाची लस उपयोगांत आणू नये असा महत्वाचा ठराव १८९० सालीं झाला.

निव्वळ गाईची लस उपयोगांत आणिली तेव्हां गाई वगैरे लशी साठीं मिळण्याची नड पडेल असें वाटलें होतें पण तसा अडथळा कांहीं अजून येत नाहीं. मुनसिपालिटीच्या शहरगांवीं गाय मिळण्याची अडचण पडते ह्मणून तेथें तयार करून रक्षण केलेली लानोलाईन लस उपयोगांत आणण्या विषयीं विचार चालू आहे. वऱ्हाड प्रांत मुख्यत्वें करून शेतकऱ्यांचा आहे आणि त्या मुळें गाई मिळण्यास मोठीशी नड पडत नाहीं. सरासरी एका देवी-डाक्टराला ६० हजार लोकवस्तींत देवी सालिना काढाव्या लागतात आणि तो चतुर व मनमिळाऊ असला तर गाईचीं वासरें लशीसाठीं मिळण्यास कांहींच

अडचण पडत नाहीं. या शिवाय डाक्टर लिटल यांचा अनुभव असा आहे कीं, राखून ठेवलेल्या लशी पेक्षां गाईची ताजी लस फार हितकर व सुखावह आहे. सरासरीनें देवी खात्याचा सालिना खर्च १७५७२ रुपये १४ आणि ३ पै आहे ह्मणजे देवी काढण्याचा खर्च चांगल्या देवी उमटलेल्या प्रत्येक माणसा मागें २ आणे ९ येतो.

इलिचपूर जिल्ह्यांतील देवीखात्याचे सुपरिनटेंडंट मि. अजाज हुसेन हे मरण पावल्यामुळें त्या खात्याचें मोठें नुकसान झालें असें डाक्टर लिटल साहेब लिहितात. ते गृहस्थ लहानपणा पासून या खात्यांत होते. त्यांनीं खात्याची नोकरी उत्कृष्ठ केली आणि ते सरकारचे विश्वासूक, भरंवशाचे व अनुभवी अधिकारी होते.

खालील देवी डाक्टरांचें काम डाक्टर लिटल यांस चांगलें पसंत पडलें ह्मणून त्यांस प्रत्येकी ३० रुपये बक्षीस देण्याविषयीं हुकूम झाला आहे:-

| रा० रा० | जिल्हा |
|---|---|
| रावजी रामकृष्ण | आकोला |
| नारायण गोविंद | बुलढाणा |
| एम. पेचन्ना | वाशीम. |

जिल्हा सुपरिनटेंडंट यांच्या कामाच्या चांगुलपणा वरून त्यांची नंबरवारी डाक्टर लिटल यांनीं येणें प्रमाणें लाविली आहे:—

| मिस्टर | जिल्हा |
|---|---|
| मुरादअली | उमरावती |
| रामरतन | आकोला |
| दिनकराव | बुलढाणा |
| महादेवराव | वणी |
| गोपाळ बाळाजी | इलिचपूर |
| गंगाधरपंत | वाशिम. |

आभारपूर्वक डाक्टर लिटल यांनीं देवीखात्यास चांगली मदत देणाऱ्या गृहस्थांची यादी दिली आहे. ते गृहस्थ लोकादरास पात्र आहेत ह्मणून त्यांचीं नांवें आह्मी मोठ्या आनंदानें प्रसिद्ध करितों:—

| मिस्टर | स्थळ |
|---|---|
| गिरराव रामचंद्र तहशीलदार | चांदूर |
| नारायणसिंग " | उमरावती |
| रघुपती मोहनराव " | मुर्तिजापूर |
| ए. ए. जार्ज | उमरावती |
| विश्वासराव देशमुख | खोलापूर |
| शेरमहमदखान तहशीलदार | वाशिम |
| माणिकराव देशमुख | माटरगांव |
| तुकाराम यादव पटवारी | बोरगांव |
| शेख उस्मान शेख अहमद पटवारी | अगर |
| भगवान उदाजी पाटील | मोंगलखेड, पातुर्डा |
| शामजी हरजी पाटील | फत्तेखेलडा |
| पांडुरंग पाटील | कोहाळा |
| यादोबा पाटील | वरंवड |
| मांगो पाटील | खाडबोडी |
| यादव जानजी | " |
| सदाशिव सोनाजी | येवदें |

इंडियांतील अस्वस्थते विषयीं लार्ड हारिस यांनीं विलायतेहून आपला अभिप्राय कळविला आहे. हारिस साहेबांची कारकीर्द मुंबई इलाख्यांत प्रसिद्ध असून लोकांच्या चांगली आठवणींत आहे. त्यांचा लौकिक वर्तमान पत्रकर्त्यांनीं त्यांच्या पाठोपाठ विलायेतेंतही जाहिर केला. हिंदु मुसलमानांचें बंड त्यांच्या वेळीं प्रथम प्रभास पट्टण व मुंबई येथें झालें. साहेबांचा अभिप्राय वर्तमानपत्रकर्त्याविषयीं जोराचा आहे आणि तो ऐन वेळेवर उजेडांत आला हें लार्ड सांडहर्स्ट यांच्या फायद्याचें झालें. वर्तमानपत्रकर्त्यांनीं अराजनिष्टेला प्रेरणा करणारे लेख लिहिण्याबद्दल सरकारानें फौजदारी खटले केले ह्मणजे सरकारचा पराभव होणें कांहीं चांगलें नाहीं. लार्ड हारिस साहेबांनीं एका प्रकाशकावर फिर्याद केली व खालील कोर्टांत आरोपी सजा झाली तथापि मुंबई हायकोर्टानें कायद्यानें अपराध होत नाहीं असें कळविलें. तसा प्रकार नामदार टिळक यांच्या खटल्या संबंधानें होऊ नये ह्मणून सर्व प्रकारची खबरदारी मुंबई सरकारनें अगोदर घ्यावी ह्मणून ही अनुभवपूर्वक सूचना लार्ड हारिस यांनीं लार्ड सांडहर्स्ट यांस अप्रत्यक्ष पाठविली असावी असा आमचा समज आहे. सरकारी खलबतें पुष्कळ होऊन हा खटला सुरूं करण्यास प्रारंभ झाला आहे. सरकारनें आपल्या प्रजे पैकीं एका विद्वान, राजनिष्ठ, व लोकहितवादी नरश्रेष्ठांस कायद्याच्या जाळ्यांत पकडण्या विषयीं प्रयत्न करणें अगदीं लांछनास्पद आहे. उभय सरदार नातूंस जुन्या १८२७ सालच्या झोटिंगशाहीच्या वेळच्या एका कलमाच्या आधारें सरकारनें कैदेंत ठेविलें ही गोष्ट तरी महाराणी सरकारच्या प्रतापाला, वैभवाला, व न्यायबुद्धीला शोभत नाहीं. पण सत्तेपुढें शहाणपण नाहीं !

---

इंडियांतील लोकल बोर्डीच्या कारभाराविषयीं सरकारी अभिप्राय प्रसिद्ध झाला आहे. हल्लीं मुनसीपालिटीच्या हद्दी बाहेरील स्थानिक स्वराज्याची व्यवस्था चालूं आहे तिचा उगम स्थानिक सुधारणा करण्यासाठीं स्थापलेल्या सरकारि लोकसंस्थामध्यें आहे; परंतु जेव्हां सन १८७१ सालीं लार्ड मेयो साहेबांनीं सर्व उत्पन्न (इंपिरिअल) राष्ट्रफंडांत घेतलें आणि त्यापैकीं कांहीं भाग इलाखे सरकारास तोडून दिला तेव्हां स्थळोस्थळींच्या गरजा दूर करणाऱ्या कांहीं खात्यांचा खर्च इलाखे सरकारावर पडला आणि त्यामुळें राष्ट्रफंडांतून या कामाप्रीत्यर्थ मिळालेल्या रकमेला भर घालण्यासाठीं आणि स्थानिक सुधारणा करण्याला भांडवल उभारण्यासाठीं कांहीं नवीन उपाय योजण्याची जबाबदारी इलाखे-सरकारावर अत्यंत जोरानें पडली. १८७१ पूर्वीं खानगी वर्गण्यांनीं हा कार्यभाग होत असे परंतु लार्ड मेयो साहेबांच्या व्यवस्थेमुळें स्थानिक सरकाराला नवीन कर बसवून नवीन फंड उभारणें भाग झालें. निरनिराळ्या स्थानिक सरकारांनीं जे नवीन कर बसविले ते कर सुप्रसिद्ध आहेत. जमिनीच्या साऱ्या बरोबरच लोकल पट्टी, जागल पट्टी, शाळा पट्टी, इत्यादि पट्ट्या वसूल करण्याचा परिपाठ पडला इतकेंच नाहीं तर या करांचा बोजा साऱ्याच्या रुपया मागें पांच पैसे किंवा अशाच तत्वावर लादण्यांत आला आहे. स्थानिक सरकाराला राष्ट्रीय सरकारानें ठरीव रक्कम प्रांतिक राज्यकारभारासाठीं तोडून दिल्यामुळें स्थानिक सरकारच्या उत्पन्नाच्या मर्यादा खुंटल्या आणि त्यामुळेंच नवीन स्थानिक कर बसविण्यास लार्ड मेयो साहेबांच्या कारकिर्दीत पासून सुरुवात झाली. मद्रास, मुंबई, बंगाल, वायव्य प्रांत, आणि पंजाब, या इलाख्यांत स्थानिक लोकसंस्थेची योजना पुष्कळ जुनी आहे तथापि खरी लोकल बोर्डाची स्थापना लार्ड रिपन साहेबांच्या कारकिर्दींत झाली. सन १८८२ सालीं लोकल बोर्डाच्या स्थापने विषयीं मुख्य मुख्य तत्वें राष्ट्रीय सरकारानें प्रांतिक सरकारास घालून दिलीं तथापि त्यांच्या धोरणानें सर्व तपशिलांच्या गोष्टी सुयंत्रित मांडण्याचें काम स्थानिक सरकारावर सोंपविलें होतें; आणि या साला पुढील लोकल बोर्डांत प्रतिनिधी निवडण्याचें तत्व अंमलांत आलें. लोकल बोर्डाची रचना जुन्या खेडेगांवांच्या पंचायतीच्या धोरणावर आहे तथापि सर्व खेडेगांवाचा परस्पर संबंध तालुका बोर्डांत एकवट केला आहे आणि सर्व तालुका बोर्डाचीं सूत्रें जिल्हा बोर्डाच्या साम्राज्या खालीं एकत्र केलीं आहेत. जिल्हा बोर्ड, तालुका बोर्ड वगैरे मुलकीचा जिल्हा, तालुका, खेडेगांव इत्यादि विभागांवर बसविलीं आहेत आणि सर्व अंमल मुलकी अधिकाऱ्यांच्या हातांत ठेविला आहे. लोकल बोर्ड लोकसंस्था आहे-तथापि त्यांत सरकाचा हात सर्व प्रकारें पोंचतो आणि वास्तविकपणें सरकारी अंमलदारच लोकप्रतिनिधींच्या सल्ल्यानें सर्व कारभार चालवितात. लोकप्रतिनिधींचा अधिकार जितका जोरदार पाहिजे तितका मद्रास, मुंबई, बंगाल वगैरे इलाख्यांत चालत नाहीं तेव्हां वऱ्हाड प्रांतांत लोकप्रतिनिधींच्या अधिकाराची मातबरी क्षुल्लक असली तरी कांहीं आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. वऱ्हाडांत पूर्वी जें लोकल फंड खातें होतें त्या खात्या ऐवजीं लोकल बोर्डाची स्थापना झाली. बिरार रूरल बोर्डाचा कायदा सन १८८५ सालीं झाला. वऱ्हाडांतील जिल्हा बोर्ड व तालुका बोर्ड या मधील सरकारतर्फे नेमलेल्या सभासदांची संख्या बोर्डातील सभासदांच्या संख्येच्या निम्पटी पेक्षां अधीक नसावी असें मुख्य तत्व आहे.

सर्व इंडियांत लोकल बोर्ड १०९३ आहेत त्या पैकीं मद्रास प्रथमस्थानीं असून ४६४ बोर्ड आहेत. वऱ्हाडांत एकंदर तालुका व जिल्हाबोर्ड मिळून २७ आहेत. सर्व देशाच्या लोकल बोर्डाखालीं लोकसंख्या १९,३०,९८,९०० आहे. वऱ्हाडांत सरकारी अधिकारी ५१ असून ४८० सभासद बिन-सरकारी आहेत.

लोकल बोर्डाचीं कार्यें बहुतकरून सर्व प्रांतांत सारखींच आहेत; आणि त्यांची व्याप्ती फक्त लोकांच्या स्थानिक गरजा पूरतीच आहे. ही कार्यमर्यादा प्रांतिक सरकारानें नेमस्त केली आहे आणि पैशाच्या सवलती प्रमाणें ती आकुंचितही होत असते. लोकल बोर्डाची मुख्य कार्यमाला अशी आहे:—

(१) दळणवळण—नवीन रस्ते बांधणें रस्ते दुरुस्त ठेवणें, त्यांच्या बाजूला झाडें लावणें इत्यादि. जे मुख्य दळणवळणाचे रस्ते ते पब्लिक वर्कस खात्याकडे आहेत तथापि अलिकडे कांहीं रस्ते नित्याच्या व्यवस्थेसाठीं बोर्डाकडे देण्याची व्यवस्था चालूं आहे.

(२) वैद्यकखातें—दवाखाना स्थापणें, त्यांची व्यवस्था ठेवणें वगैरे. मद्रासेकडे हास्पिटल असिस्टंट यांस वैद्यक शिकविण्याचें वर्ग देखील बोर्डाच्या ताब्यांत आहेत. वऱ्हाडांत हीं कामें सरकारमार्फत होतात.

(३) आरोग्यरक्षण, गटार, पाण्याचा पुरवठा-तलाव, विहिरी वगैरे बांधणें, पिण्यास पाणी स्वच्छ पुरविणें, आणि इतर सफाईचीं कामें करणें.

(४) देवीखातें— मद्रास, मुंबई व बंगाल या इलाख्यांतून देवी खात्याच्या कामाची व्यवस्था बोर्डाकडे आहे.

(५) विद्यादान—प्राथमिक शिक्षणाची अभिवृद्धी करावी. शाळा, त्यांची व्यवस्था परीक्षा, वगैरे गोष्टी सुयंत्र चालवाव्या. मद्रासेकडे शाळांस ग्रांट देणें देखील बोर्डा कडे सोंपविलें आहे. बंगाल्यांत माध्यमिक शाळा देखील बोर्डाकडे देण्या विषयीं अधिकार त्या सरकारच्या हातीं आहे.

(६) दुष्काळ निवारणाचीं कामें— दुष्काळ पडला ह्मणजे तन्निमित्तक कामें लोकल बोर्डाच्या सत्तेखालीं पुष्कळ प्रांतांतून चालतात. परंतु वायव्यप्रांत, पंजाब व वऱ्हाड या प्रांतांमध्यें सरकारनें सांगितलेलीं कामें बोर्डास चालवावीं लागतात.

(७) सार्वजनिक कामें—बाजार; धर्मशाळा, व इतर सार्वजनिक उपयोगाची कामें कशीं व कोणी करावीं याचा निर्णय बोर्डांच्या कायद्यांत आहे. प्रांताप्रांताचे नियम निरनिराळे आहेत.

(८) कोंडवाडा—कोंडवाड्याची व्यवस्था पुष्कळ प्रांतांतून बोर्डाकडे आहे.

(९) साधारण अधिकार— वरील कार्यमालेशिवाय लोकांचा सुरक्षितपणा, आरोग्य, सुख किंवा सोय हीं वाढविणारी सार्वजनिक कल्याणाची गोष्ट करण्या संबंधानें लोकल बोर्डास सर्व प्रांतांमध्यें अधिकार आहे.

या शिवाय निरनिराळ्या प्रांतांतून कांहीं विशिष्ट कामें बोर्डाकडे सोंपाविलीं आहेत. जसें, मुंबई इलाख्यांत नमुन्याची शेती करणें व इतर शेतकीची सुधारणा करणें हें बोर्डाकडे आहे. बंगाल, वायव्यप्रांत व पंजाब या मध्यें बोर्डाकडून शेती विषयक जत्रा व प्रदर्शनें होत असतात. वऱ्हाडांत ही जत्रे संबंधाचे अधिकार बोर्डाकडे आहेत. पंजाबांत कालव्याचीं, बंधाऱ्याची वगैरे कामें बोर्डाकडे आहेत. आसामांत जिल्हा पोस्टाचें काम बोर्ड करवितें. बंगाल्यांत स्थानिक रेलवे व ट्रामवे यांचे कारभार बोर्ड चालवितें.

बोर्डाच्या उत्पन्ना विषयीं व खर्चा विषयीं माहिती पुढील अंकीं देण्याचा विचार आहे.

---

हल्लीं अकोल्यास व जिल्ह्यांतून कालरा बराच झपाट्यानें सुरूं आहे व मृत्यूही त्या मानानें जास्तीच होतात याचें कारण योग्य औषध व योग्य उपचार यांची कमतरता असावी असें आह्मांस वाटतें. कारण अकोल्यास रा० रा० व्यंकटेश कृष्ण देसाई यांनीं पांच सात रोग्यास इंग्लिश औषधोपचार करून अनुषंगिक व्यवस्थाही काळजीनें ठेविल्यामुळें अगदीं मरणोन्मुख झालेल्या रोग्यांस देखील आराम झाला. ह्यांनीं औषधें उपयोगांत आणिलीं तीं:— ट्रेचर कंपनी कडील कालरा टिनकचर, आणि क्लोरोडाइन ब्रांडींत मिसळून केलेला खुराक. हीं औषधें देण्याचें प्रमाण रोग्याच्या स्थितीवर अवलंबून आहे.

तथापि या औषधांचा संग्रह सर्वांनीं करून त्यांचा उपयोग यथाशास्त्र करावा. साधारणपणें ह्या उपद्रवांत खालील गोष्टी ध्यानांत ठेविल्या पाहिजेत:—

( अ ) रोग्यास पाणी किंवा अन्न देतां कामा नये. पाण्याचा शोष पडल्यास वावाडिंगामध्यें तापवलेलें पाणी संवेच्या पळीनें वरचेवर देऊन रोग्याची समजूत करावी.

( ब ) वांती होत असल्यास पोटावर काळजा जवळील खळगीच्या बाजूनें मोहरी वाटून तिचा लेप लावावा. वांती न थांबल्यास शेवग्याच्या अंतरसालीचा देखील उपयोग करावा.

( क ) उबदार वस्त्रप्रावरण ठेवून अंग शेकावें व ऊब राखणारीं पूड चोळावी.

( ड ) पोटांतील अग्नि प्रज्वलित करणारें औषध असावें. इंग्रजी औषध नसलें तरी मराठी औषध ह्मणजे मोहाचें अस्सल फूल थोडें अधिक प्रमाणावर दिलें तरी चालेल. देवलाल या औषधाचाही उपयोग केला तरी चालेल.

( इ ) रोग्यास क्षुधेनें व्याकूळता आली तरी सात्विक अन्न फार हलकें, व सूक्ष्म प्रमाणानें द्यावें.

औषधोपचार चालूं असतांना रोग्याची इच्छा फारशी पाहूं नये. मनांत भित्रेपणा व कावरेबावरेपणा न ठेवितां वरील औषधोपचार बेलाशक सुरू करावे. निव्वळ ब्रांडीनें क्लोरोडाईन शिवाय बरोबर कामगिरी बजावली जात नाहीं ह्मणून सोपा उपाय ह्मणजे माहाचा अस्सल अर्क बेलाशक द्यावा. त्यापासून कालऱ्याच्या रोगामध्यें कधीं अपाय घडत नाहीं. डाक्टर किंवा वैद्य मिळण्यास विलंब लागतो ह्मणून हे उपाय आह्मी सर्व लोकांच्या उपयोगा साठीं दिले आहेत. कधीं कधीं वैद्य किंवा डाक्टर वरील प्रकारचीं औषधें कमी प्रमाणानें देतात ह्मणून कित्येक प्रसंगीं प्राणहानी होते. हल्लींच्या रोगावरील जाहिरातींल रामबाण गोळ्या वगैरे कांहीं स्वताच्या अनुभवा शिवाय घेऊं नयेत ही सूचना आह्मी मुद्दाम करीत आहो. वर प्रसिद्ध केलेला औषधोपचार अनुभवानें चांगला ठरला आहे ह्मणून आह्मी तोच लोकांच्या माहिती साठीं दिला आहे. अर्थात असे उपाय चालूं असतांना डाक्टराची किंवा वैद्याची मदत मिळेल तर नामी होईल.

---

**The Berar Samachar**

MONDAY AUGUST 30 1897

The law of sedition is replete with numerous comments from several quarters. The prosecution of the Hon'ble Mr. Bal Gangadhar Tilak has brought the law under accurate and learned criticism. We however do not find therein much to unlearn our old views nor do we see much to recommend to the acceptance of the general public. The common-sense-view of the whole matter is plain enough. We would condemn a writing as seditions which has the force of urging people to throw off the British suzereinty. All other writings however revolting to the ideas of the people or however subversive of the general notions of tender sympathies towards the British Sircar fall short of the real elements of the offence.

The Anglo-Indian papers are more seditious in their criticisms of the law of sedition. They condemn out—right their Native rivals in all walks of life. Whatever aims a blow to their authoritative bureaucracy is an act of disloyalty pure and simple. All will come in within the definition of this disaffection towards the Government. It is immaterial as to whom the Government prosecutes. But such a law must be suicidal in its effects and will; if in full play, undermine nations and kingdoms. We would protest against such views because they are the current coin of the day. A protest is the only weapon with us and we shall wield it to the utmost of our powers. We hope to gain victory in the hearts of the righteons English people.

The Kesari's seditious paragraphs will have little weight in our minds. The pieces are as innocent as history and philosophy of history can be. If a speaker like the Hon'ble Mr. Tilak philosophises on the events of the times of Shivaji and that too on an occasion of celebrating the coronation-day of the prime founder of the Maratha Kingdom we shall read his throughts in the serene and eloquent manner of the speaker himself. To our plain mind, the alleged paragraphs do not contain an iota of sedition. We cannot hope to get rid of the probable decision of High Court. But a prosecution savours of persecution when the law is to realize its ends purely on the strength of the views and *idols* of a set number of jurors. The Hon'ble Mr. Bal Gangadhar Tilak owes his education and his good name to the British Government. He is a splendid product of the western education. But his grandeur vanishes when the sword of the Government hangs over his head. We well remember his reply to the Bombay Gazette that he will pass his days even at Andamans provided that daily paper proposes to crucify the noble dead of the past—we mean Lord Macaulay and Carlyle.

If no adjournment be granted at the request of the Hon'ble Mr. Tilak we presume that the memorable trial will commence on Monday next. Sir Lepel Griffin will at least grant us that Mr. Tilak is neither a venal nor an irresponsible writer. We shall go a step further along with him and say that the altar of liberty will be desecrated and justice will be affronted when such a honourable gentleman is brought before the highest tribunal on a charge of sedition. No raking up of legal theories will avail the prosecutors and the Government will be chagrin to gather *vapoury* figs from thistles. The Times of India commits the sin of sedition when the learned editor shrewdly suggests that India is like a magazine where the Kesari's sedition acts like a spark. We could not help laughing at this extreme exasperation but we are sure that the British Raj is firm and secure in the stronghold of loyal and devoted Indians. We hope the storm will soon disappear and we shall join hands with the Anglo—Indian journalists with the motto "All is well that ends well."

---

In Berar, the lot of a pleader is envied most of all. We do not know the reasons for this upshot of human feelings. A pleader's profession promises a sort of independenc life. But often he has to humour the temper of a judge or magistrate. He has to serve well the cause of his client in point of strict honesty and morality. His liability is for unprofessional conduct. What constitutes such a conduct has been laid in the recent notification of the Gazette of India. The law regulating the practice of pleadership in Berar was rather general in its terns. It is now modified so as to admit the full particulars of an unprofessional conduct. The notification is to the following effect:—

"(T) 'Tout' means a person who procures the employment in any legal business of any legal practitioner in consideration of any remuneration moving from such practitioner, or proposes to a legal practitioner to procure his employment in any legal business in consideration of such remuneration."

2. In rule 27, for the words "for fraudulent or grossly improper conduct in the discharge of his professional duty, or for any other reasonable cause," the following shall be submitted namely:—

"(*a*) who takes instructions in any case, except from the party on whose behalf he is retained, or some person who is the recognized agent of such party within the meaning of the Code of Civil Procedure, or some servant, relative, or friend authorized by the party to give such instructions, or

(*b*) who is guilty of fraudulent or grossly improper conduct in the discharge of his professional duty, or

(*c*) who tenders, gives, or consents to the retention, out of any fee paid or payable to him for his services, of any gratification for procuring, or having procured, the employment in any legal business of himself or any other pleader, or

(*d*) who directly or indirectly, procures, or attempts to procure, the employment of himself as such pleader through or by the intervention of any person to whom any remuneration for obtaining such employment has been given by him, or agreed or promissed to be so given, or

(*e*) who accepts any employment in any legal business through a person who has been proclaimed as a a tout under rule 41, or

(*f*) for any other reasonable cause."

---

## वऱ्हाड

हवामान—पाऊस थोडथोडा पडत आहे. पाऊस अधीक होण्याचीं चिन्हें आहेत. हवेंत उष्मा विशेष भासतो. अजून थंडपणा किंवा गारवा वाटत नाहीं. पटकीचा उपद्रव चालूंच आहे. धान्याचे भाव न उतरल्यामुळें दुष्काळग्रस्त लोक मरणाच्या द्वारीं बसले आहेत.

आलिशान रेसिडेंट मि. फ्रेडन यांची स्वारी गेल्या १८ वे तारखेस सिमल्यास जाण्या साठीं निघाली आहे. व्हाइसराय साहेबांशीं ही मुलाखत वऱ्हाडच्या राज्यकारभाराच्या खर्चा संबंधानें व दुसऱ्या कांहीं महत्वाच्या विषयासंबंधानें विचार करण्या करितां होणार आहे.

बाळापूर तालुक्यांतील नांदखेड येथील आनी नांवाच्या एका ७० वर्षाच्या वृद्ध बाईनें विहिरींत उडी टाकून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. प्राण देण्याचें कारण असें कीं तिच्या दोघा मुलांनीं तिला खायला प्यायला दिलें नाहीं व सुनेनें फार छळले त्या बाईस एक दिवसाची साधी कैद आत्महत्येच्या प्रयत्नाबद्दल देण्यांत आली.

आकोल्याचे सिव्हील आफिसर हल्लीं दुष्काळ निमित्त तालुक्यानिहाय फिरत आहेत.

अंदुऱ्याचे पाटील रा. रा. गणपतराव देवराव देशमुख यांस वृद्धापकाला मुळें संग्रहणीच्या उपद्रवानें गेल्या २१।८।९७ रोजीं देवाज्ञा झाली. हे आपल्या गांवीं महाशूर वाघ होते. त्यांचा लौकिक त्यांचे चिरंजिव राजश्री खुशालराव चालवितील अशी आह्मास उमेद आहे.

अकोट तालुका बोर्डाची कचेरी अकोटाहून तेल्हाऱ्यास बदलली आहे आणि तेथें रा. रा. देवराव जयकृष्ण यांच्या देखरेखी खालीं बोर्डाचें काम चालेल.

मि. मजिदखा वल्लद फत्तेखा इनामादार काटेपूर्णा येथील नदींत बुडून मेले. गृहस्थ तरुण होता आणि पांच रुपयाच्या पैजे साठीं नदींत पोहण्यास त्यांनें बुडी मारली तों तळाशी गेला तो वर आला नाहीं.

तारीख २६ एप्रिल पासून २४ आगष्ट पर्यंत ४०१ मनुष्यास कालरा झाला आणि त्यापैकीं २२० मेले. त्या नंतर काल पर्यंत दररोज मरणाचें प्रमाण वाढतच आहे. ईश्वरी नेमानेम !

---

## आकोला बाजारभाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ९६ रुपये |
| जवारी | १३० रु० |
| गहूं ( कांठे ) | १४२॥ रु० |
| ,,( बनशी ) | १५९ रु० |
| चणे | १३९ रु० |
| तेल | ७॥ रु० मण |
| तूप | ९॥ मण |
| सोनें | २९!॥ तोळा |
| चांदी | ७२ |

---

### नोटीस

नोटीस बेशमी भोलाराम बालाप्रसाद रहाणार कसबे रिसोड यांसः—

खालीं सही करणार याजकडून पुन्हां नोटीशीनें कळविलें जाते कीं नोटीस तारीख २६।७।९७ इसवीच्या वऱ्हाड समाचार वर्तमान पत्रांतून दिली त्यांत तुमचेकडून आमची गहाणखताबद्दल रकम घेणें आहे ती रुपये १०० व याचें व्याज सन १८८४–८९ सालापासून घेणें आहे त्या पैकीं तुह्मी रुपये आह्मास दिले ते रुपये १६॥-॥ सोळा रुपये आठ आणे सहा पै चा हवाला दिला ते तुमच्या खात्यांत सोळा रुपये आठ आणे सहा पै जे तुह्मी दिले ते तसेचे तसेच जमा आहेत. आतां आपल्यास आह्मी तारीख २६ जुलई सन १८९७ इसवीस जी नोटीस दिली त्यांत सोळा रुपये आठ आणे सहा पै चे ठिकाणीं १६९॥-॥ एकशे एकून सत्तर आठ आणे सहा पै हें चुकीनें लिहिलें गेलें व तसेंच नोटीशिमध्येंही चुकीनें त्याच प्रमाणें छापलें गेलें. ह्मणून तुह्मास मुद्दाम पुन्हां या नोटिशीनें कळविलें आहे ह्मणून त्याजद्दबलचे नफानुकसानीचे कोणत्याही प्रकारानीं आह्मी जबाबदार नाहीं. ह्मणून दिली नोटीस सही. ता० २९ माहे अगष्ट सन १८९७ इ०

[ सही ]

उदेराम गंगाराम रहणार मोप
ता० वाशीम यांचे तर्फे मुनथमल जुताराम मुक्काम
मोप दस्तुर खुद.

---

## वर्तमानसार

पुण्यास एक शाळा मास्तर व एक लेकचरर यांस पुण्याच्या खुनाच्या प्रकरणांत गेल्या १३ वे तारखेस पकडलें होतें. पुन्हां शानिवारीं आणखी पंधरवाड्याची मुदत माजिस्ट्रेटांनीं पोलिसास दिली.

अफगाणिस्तानचे अमीर अबदुल रहिमान यांच्या इंग्रजसरकाराशीं चालू वर्तणुकीसंबंधानें आज बरेच दिवसांपासून संशय आहे व तो दिवसेंदिवस अधीक दृढ होण्याची चिन्हें दिसूं लागलीं आहेत. अद्याप अमिरावर कायदेशीर आरोप ठेवण्यासारखें जरी कांहीं कारण पुढें आलें नाहीं, तरी सरहद्दीवर इंग्रज सरकारांस २९००० लष्कराची जय्यत तयारी करावी लागली आहे व अमिरास हल्लींच्या सरहद्दीवरील धामधुमीसंबंधानें सूचना पत्र लिहावें लागलें आहे. पण त्याचा उपयोग किती होईल तें आतांच खातरीनें सांगवत नाहीं. कारण वायव्य सरहद्दीवर टोकी, स्वाट, मालाखंड, पेशावर येथील दरींतील तायफेवाले लोकांनीं जी बंडाळी केली होती, त्यांची खोड इंग्रजसरकारनीं चांगली मोडली आहे; व ते आतां पुन्हां इंग्रजसरकारासमोर लढण्यास येतील असें दिसत नाहीं. असें असतांही इंग्रज सरकारांनीं ह्या सरहद्दीवर सैन्य पाठविण्याची जी धामधूम चालविली आहे त्यावरून ह्यांत कांहीं तसेंच नाजुक कारण असावें असें सहज वाटतें. अमिराची व त्याच्या प्रजेची हल्लींची वर्तणूक अस्वस्थता उत्पन्न करणारीच दिसूं लागली आहे. रशियांतील एका वजनदार पत्रानें असें प्रसिद्ध केलें आहे कीं, इंग्लंड अफगाणिस्तान यांमध्यें लवकरच लवकरच लढाई होईल.-राशियन पत्राचें हें लिहिणें व इंग्लंडाशीं आज कित्येक वर्षांपासून असलेले रशियाचें वर्तन, लक्षांत घेतलें ह्मणजे अफगाणिस्तानच्या अमिरासंबंधानें जो संशय आहे त्यास अधीक जोर येतो. शिवाय अलीकडे टर्कीच्या बादशहास आपल्या आश्रयाखालीं घेण्याची खटपट, टर्कीचें इंग्लंडाशीं चालू वर्तन व अफगाणिस्तानच्या अमीराचा टर्कीशीं जडलेला संबंध इत्यादि गोष्टी व हल्लींची धामधूम लक्षांत घेतली ह्मणजे रशियन पत्रांतील बातमींत पुष्कळ तथ्य असावें असें वाटूं लागतें; व टर्कीप्रमाणें अफिगाणिस्तानच्या अमिरालाही आंतून रशियाचें अंग असेल असा सहज भास होतो. जोंपर्यंत इंग्लंड टर्कीशीं मित्रत्वानें होतें, तोंपर्यंत अफगाणच्या सरहद्दी संबंधानें कांहींच काळजी वाहण्याचें कारण नव्हतें, परंतु तो प्रसंग हल्लीं राहिला नाहीं. अमीर अबदुल रहिमान याचे वर्तनांत अद्याप स्पष्ट दिसण्या सारखा फरक दिसून आला नाहीं, तो राजकीय बाबतींत चांगला माहीतगार असून हिंदुस्थान सरकार व त्यांजमध्यें सर्व गोष्टी मान इतमामासह अद्याप होत आहेत. तथापि लॉर्ड राबर्टस यांची भेट घेण्याचें अमिरानें नाकारलें त्याच वेळीं ह्याच्या वर्तनाबद्दलची परीक्षा झाली होती. त्यावेळीं हिंदुस्थान सरकारांनीं पुष्कळ शांतता धरली व त्यांचा परिणाम सर हेनरी डुरांड यांस काबुलांत इंग्रज सरकार तर्फें बंदोबस्ताच्या चांगल्या गोष्टी करितां आल्या. त्याप्रमाणें हल्लीं अफगाणिस्थानवरील सरहद्दीच्या बळकटीकरितां हिंदुस्थान सरकारांनीं जी धामधूम चालविली आहे ती अगत्याची आहे असें जरी खरें, तरी हें प्रकरण पुढें कोणत्या थरास जातें याकडे सर्वांचें लक्ष लागणें साहजिक आहे. कारण ह्या सरहद्द संरक्षणाचा सर्व खर्च हिंदुस्थानच्या तिजोरीवर पडणार. अर्थात अफगाणिस्तानचे अमीर हे एक या देशांत दुष्काळांत तेराव्या महिन्या प्रमाणेंच होणार.

नबाब सैयद अमीर हुसेन यांस बंगाल सरकारच्या कायदेकौन्सलांत सभासद नेमलें.

जावा व दिमक येथें कालेराचा जोर फार वाढला आहे.

इतालींतील विस्युवस नामक ज्वालाग्राही पर्वतांतून गरम राखेचे ढीग उडूं लागले आहेत व कित्येक ठिकाणीं लावा नापक रसही मोठ्या प्रवाहानें पडूं लागला आहे.

ल्यांकाशायर रेजिमेंटची दुसरी बटालीयन ता० १९ रोजी हिंदुस्थानास येण्याकरितां कुच करणार आहे. घोडेस्वार, रेजिमेंम, आरगाईल यांजकारितां लागणारें भारदारी सामान व जनावरें हीं इंग्लंडांतून रवाना होणार आहेत.

शहापुरास एका मारवाड्यानें तराजुचे बुडास दुह्रा पैसा चिटकवून रेशीम विकण्याचा बरेच दिवसांपासून क्रम चालविला होता; परंतु त्या मारवाड्याचा मारवाडी कावा उजागरात येऊन त्यावर खटला चालू झाला आहे.

काशीहून कलकत्यास जाणारी गंगेतील आगबोट सुरूं झाली आहे, त्रिलोचनाच्या पलीकडील गोलाघाटापासून दररोज साडेनऊ वाजतां हा धुवाकस निघतो आणि रात्रीं बारा वाजतां दररोज येतो. या धुवाकसाचे कलकत्या पर्यंतचें भाडें साडेचार रुपये आहे, आणि रेलवेचें भाडें साडेसहा रुपये आहे.

स० वि०

औरंगाबादेस एक दाई बाळंत झाली आणि तिचें मूल जन्माला येतांच नाहींसें झालें. बाळांतीणही दुसरें दिवशीं वारली. पिशाच जन्माला आलें होतें, तें निघून गेलें अशी लोकांची समजूत झाली आहे.

दाढ्या काढून टाकल्या–उत्तर हिंदुस्थानांतील आणि बंगाल्यांतील कांहीं हिंदु दाढ्या राखीत असत. पण अलीकडे कलकत्यास हाणमार झाल्या पासून हिंदु भिऊन गेले असून आपणालाही दाढीवरून मुसलमान समजून पकडून नेतील ह्मणून त्यांणीं दाढ्या काढून टाकल्या.

साडेचार फूट खोल पुरलेला मुर्दा मातीस मिळेपर्यंत ३-४ वर्षें लागतात, एक फूट खोल पुरल्यास दीड वर्ष लागतें व वरती नुसती माति लोटल्यास एक वर्ष लागतें असें शोधा अंतीं समजलें आहे.

मोत्यांचें तारूं—ल्यूरिन येथील एका जवाहिऱ्यानें मोत्यांचें एक लहान तारूं बनविलें आहे, त्याचें शीड सोन्याच्या पत्र्याचें करून त्यावर बारीक हिरे लाविले आहेत. सुकाणू पाचेचें आहे. व हें तारू हास्तिदंताचें बैठकीवर उभें केलें आहे.

लढाईचा विमा—आयुष्याचा विमा, आगीचा विमा, तारू बुडाल्याचा विमा वगैरे विमे होतात हें सर्वांना माहित आहेच, पण हल्लीं लढाईचा ही विमा निघाला आहे. इंग्लंडचें जर्मनी, फ्रान्स व राशिया या पैकीं कोणाही बलिष्ठ राज्याशीं युद्ध झालें असतां शेकडा पौंडां प्रमाणें व तुर्कस्थान ट्रान्सव्हाल खेरीज करून दुसऱ्या युरोपियन राष्ट्राशीं युद्ध झालें तर शेकडा ५ गिनी प्रमाणें व इतर कोणाही राजाबरोबर युद्ध झालें तर शेकडा ८ गिनी प्रमाणें विमा उतरण्यास एक कंपनी तयार आहे.

धा० वृ०

मनुष्याप्रमाणें जनावरांचेही दांत दुखतात, कधीं कधीं त्यांच्या दाढाही उठून त्यापासून पराकाष्ठेचा त्रास होतो. एका सुप्रसिद्ध प्राणिशास्त्रनिपुण डाक्तरचें असें ह्मणणें आहे कीं, सगळ्या जनावरांत हत्तीच्या दांताइतकें कठीण दुखणें दुसरें कोणाचेंहि नसेल. हत्ती ला कोणतेंही दुःख होवो तें त्यास अतिशय अशक्य होतें. हत्तीच्या अंगीं सहन करण्याची शक्ती आतिशय कमी असते. जर हत्तीच्या दांताला एखादे वेळेस कांहीं इजा झाली आणि ती कोणी जर बरी केली इतकेंच नव्हे, पण त्यामुळें त्याचा संबंध दांत साखळदंड लावून ज्याणीं खालीं पाडून कोणी उपटून काढला, तर तो त्याचा अगदीं एखाद्या गुलामा प्रमाणें बंदा नौकर होऊन जन्मभर त्याच्या अगदीं आज्ञेत राहतो. या विषयीं एक चमत्कारिक उदाहरण घडून आलें तें असें:—

बंगाल प्रांतांत एका हत्तीच्या दांताला कांहीं इजा झाली होती. त्यामुळें तो इतका त्रासून गेला होता कीं, खाणेंपिणें देखील त्यानें अगदीं सोडून दिलें होतें नंतर त्या हत्तीच्या मालकांनें एका शस्त्रवैद्याकडे त्याला नेऊन त्याचा तो दुखरा दांत उपटून काढला त्या वेळेस तो हत्ती एखाद्या कोंकरा प्रमाणें त्या डाक्टरच्या पुढें गोंडा घोळूं लागला. आपल्या सोंडेनें त्याला कुरवाळूं लागला आणि वरचेवर त्याच्या गळ्यावर आपली मान ठेवून आपली कृतज्ञता दर्शवूं लागला.

माशांसही भाषा आहे— ज्यांत पुष्कळसे मासे आहेत अशा तळ्यामध्यें बुडबुडे आलेले पाहिले ह्मणजे पुरें समजावें कीं आंतील मासे एकमेकांशीं बोलत आहेत. आपणांस त्या माशांशीं संभाषण करणें शक्य नाहीं हें खरें, परंतु माशामाशांत एकमेकांशीं बोलण्यास कांहींना कांहीं तरी शब्द असून ते शब्द भिन्न भिन्न आहेत, इतकें एका प्राणिशास्त्रवेत्यानें ध्वनिस्रावक यंत्राच्या सहाय्यानें सिद्ध केलें आहे. हे शास्त्रवेत्ते आपल्या एका स्नेह्यास बरोबर घेऊन एका लोखंडी पिंजऱ्यांत बसले व भूमध्य समुद्राच्या कांठीं असलेलें ब्रांकालकोन नांवाच्या शहराजवळ किनाऱ्यांशीं तो पिंजरा तळीं घातला. त्यांनीं आपल्या बरोबर विजेनें प्रकाश करण्याचें यंत्र व एक ध्वनिवाहक यंत्र व एक पोटोग्राफाचें यंत्र नेलें होतें. त्यांचे बरोबर कांहीं आरसेही होते व हे आरसे नेण्याचा हेतु हा कीं, प्रकाशाचें परावर्तन करून मासे तिकडे येतील असें करावें. एखादा मोठा थोरला मासा दिसूं लागला कीं आरसा अशा रीतीनें फिरवीत कीं, त्या माशास त्याचें पूर्ण प्रतिबिंब त्या आरशांत दिसावें. अशा रीतीनें प्रतिबिंब पाहतांच ते मासे अतिशय संतापून जात व कांहीं चमत्कारिक ध्वनि काढीत. हे सर्व ध्वनि ध्वनिग्राहक यंत्रांत धरून ठेविले. त्याच प्रमाणें पुष्कळ जातींच्या माशांचे निरनिराळ्या वेळचे ध्वनि असेच संग्राहित केले. व त्यांची तुलना करून पाहतां निरनिराळे ध्वनि निरनिराळ्या विकारांचे दर्शक आहेत, अर्थात् माशांसही भाषा आहे अशी खात्री झाली.

क०

आशिया खंडाची लोकसंख्या ८२५९५४००० युरोपाची ३५,७३,७९,००० आफ्रिकेची १६३९३३०००; अमेरिकेची १२१७१३०००; ओशियानिया आणि ध्रुव प्रदेश ह्यांची ७५००४०० आस्ट्रेलियाची ३२,३०,००० आहे.

बेळगांव येथील शिंपी लोकांच्या पुढाऱ्यांनीं आपसांत सभा करून या उप्पर दारू व मांस कोणीही भक्षण करूं नये. सर्वांनीं शुचिर्भुतपणानें वागावें, यज्ञोपवीत धारण करून सोवळ्यानें भोजन करावें असा ठराव करून गेल्या पौर्णिमेस सर्वांनीं जानवीं घातलीं व सोवळ्याकरितां मुकट्यांची खरेदी झाली.

मि. हिंडमन् ह्यांणीं हिंदुस्थानांतील ब्रिटिश राज्याचे विरुद्ध विलायतेंत लिहिलेल्या एका लेखाचा फैलाव हिंदुस्थानांत न होऊं देण्याबद्दल हल्लीं इंग्रजी पत्रांतून चर्चा चालली असून तत्संबधानेंच हिंदुस्थानचा कैवार घेणारें इंडिया पत्र बंद करावें, अशी ही शिफारस इंग्लिशमन व पायोनियर पत्रांत आली आहे.

सन १८३८ सालीं इंग्लंडांतील शाळांच्या हजेरीपटावर ८,४५,००० मुलें होतीं. सध्यां संख्या ५३,२५,००० इतकी आहे. सध्यां इंग्लंडांत शिक्षकांची संख्या १,३८,-७४३ आहे.

फक्त न्युयार्क शहरांत ४,२९६ शिक्षक आहेत. यांत पुरुष शिक्षक फक्त ३०० आहेत.

विलायतच्या कांहीं पलटणीस हिंदुस्थानांत जाण्याचा हुकूम झाला.

अतिवृष्टीमुळें क्वेटांच्या शेजारीं रेलवेचा बराच रस्ता वाहून गेला.

प्रशियाची फौज ४,५३,!७१ असून यांत १८,०३२ हपीसर व ७२,२५२ घोडे आहेत.

आफ्रिकेंत आणखी एक फार सोन्याची खाण सांपडली आहे. आणखी अशाच कांहीं खाणी सांपडल्या तर सोनें चांदीच्या भावानें विकूं लागेल.

कुर्ड लोक पार्शियन हद्दीवर सालमा येथें हल्ले करीत असून दोन अर्मेनियन खेडीं पार करून ख्रिस्ती व मुसलमान अशा २०० लोकांची कत्तल केली असें सांगतात.

टोची व्हालीकडे तारायंत्राची तार तोडण्याचें काम चालूंच आहे.

रावळपिंडी येथें रिझर्व फौजेचा भरणा करण्यांत आला आहे.

मुंबई व पुणें येथून आणि दुसऱ्याही कित्येक ठिकाणाहून बेगळाल्या पलटणी, सामानसुमान, हपीसर, डाक्टर, दवाखाने, वगैरेंची रवानगी स्पेशल ट्रेनींतून होत आहे.

सिकंदराबादेहून इंपेरियल फौजेंतूनही कांहीं फौज रवाना होत आहे.

शत्रुच्या जमावांत अफगाण हद्दींतले पुष्कळ लोक आहेत असें सांगतात.

पेशावर येथें आमचें सरकार विशेष बंदोबस्त करीत आहे.

दंगेखोर अफ्रिदी वगैरे लोकांत ६० हजार लढाऊ लोक असून त्यांतलें बरेच लोक इंग्रजी पलटणींत तयार झालेले आहेत असें सांगतात.

ठा० अ०

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.